

स. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ५२५५

REFBK-0006378

# हृदयाची कमाई

— उमाकांत भंडे —

दा. क्र.
~~६२२८~~
६३७८

# भटक्याची कमाई

उमाकांत भेंडे

★

REFBK-0006378

ईस्ट अँड वेस्ट बुक हाउस
बडोदें

एकमेव विक्रेते—रामकृष्ण बुक डेपो, गिरगांव, मुंबई

मूल्य २–०–०

प्रकाशक
भानुकांत पागेदार
ईस्ट अँड वेस्ट बुक हाऊस, बडोदें

मुखपृष्ठावरील चित्र चित्रकार वि. र. बाम यानीं तयार केलें आहे.

सर्वाधिकार सुरक्षित

आ वृ त्ति १ ली

हें पुस्तक २८ पौंडी स्वदेशी कागदावर छापलें आहे
व ग्रेट फेस इंग्लिश बॉडी टाईप वापरला आहे.

मुद्रक
द्वा. भ. कर्णिक, बी. ए., एल्एल् बी.
न्यू टाईम्स प्रिंटरी लि., मुंबई.

सप्रेम समर्पण

आईस



# भटक्याची कमाई

उमाकांत भेंडे

# अनुक्रमणिका

★


निवेदन ... ... ९
प्रस्तावना ... ... ११

## भावरेखा

१ गाडींतील गमती ... १९
२ माझीं आवडतीं सौंदर्य-स्थळें ३०
३ घरोघरचीं दुःखें ... ३८
४ एकेकाचा स्वभाव ... ४७
५ खादाड लोक ... ५७
६ विक्षिप्तपणा ... ६६

## व्यक्तिरेखा

७ छोटीं माणसें ... ७५
८ फॅमिली डॉक्टर ... ८२
९ रामा गडी ९०
१० श्री. विठ्ठलराव घाटे ... ९८
११ श्री. माडखोलकरांचें रमणीय गृहजीवन ११०
१२ अब्दुल गफार खान ... १२६

# निवेदन

माझ्या पायावर भोवरा आहे अशी माझ्या आईची माझ्याविरुद्ध तक्रार आहे. तक्रार खरी आहे. पाय फुटल्यापासून मी भटक्या आहे, आजचा माझा पेशा भटक्याचाच आहे आणि पुढंहि मी भटक्याच राहणार. राहायला राहुटी, भटकायला गाडी आणि रोज नवा देश–नवं जग–असलं भटकं जीवन मला अत्यानंद देतं. कोणाची महत्त्वाकांक्षा खूप पैसा मिळवावा अशी असते, कोणी विद्वान् म्हणून चमकायला पाहातो; मला जगानं 'भटक्या' म्हणून ओळखावं अशी माझी मनापासून इच्छा आहे.

भटक्या म्हणून जें पाहायला मिळालं, अनुभवायला मिळालं, तें मधून मधून लिहिलं. म्हणूनच मी या माझ्या भावरेखा–व्यक्तिरेखांना 'भटक्याची कमाई' हें नांव दिलं आहे.

माझ्या भटक्या जीवनांत ज्या घटना घडल्या, ज्या अनुभूति संपादिल्या, जें अनेकविध सौंदर्य चाखलं तें माझ्या हेंगाड्या, वेड्या वाकड्या भाषेंत मांडलं. या लिखाणाला नाही आधी, नाही अंत; नाही यांत साहित्य, नाहीं लालित्य. व्यक्तिगत अनुभूतींचा रांगडा. बेंगरुळ आविष्कार सापडेल तुम्हाला या भटक्याच्या कमाईंत.

श्री. गजाननराव माडखोलकर मला 'भटक्या'ला आपला मित्र म्हणतात. मोठेपणा आहे हा त्यांचा. त्यांनी स्नेहभावानं प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

'न्यू टाईम्स प्रिंटरी लिमिटेड' छापखान्याचे श्री. अनंत विठ्ठल जुवेकर व श्री. द्वारकानाथ भगवंत कार्णिक, बी. ए., एल्. एल्. बी.

यांनी मनावर घेतलं नसतं तर या महर्गतेच्या काळांत पुस्तक निघणं कठीण होतं. या मित्रद्वयांच्या उपकारांतून सुटणं कठीण आहे.

मुखपृष्ठावरील चित्र माझे मित्र श्री. वि. र. बाम यांनी काढून दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

पुस्तकाची छपाई-प्रत तयार करणं, प्रूफं तपासणं वगैरे अत्यंत जिकिरीचं काम माझे तरुण कवि-मित्र श्री. मा. कृ. पारधी, बी. ए. यांनी मोठ्या खुशीनं आपल्याकडे घेतलं. हें जबाबदारीचं काम त्यांनी अविश्रांत श्रम घेऊन पार पाडलं आहे. त्यांच्या या स्नेह-बुद्धीचं मला फार कौतुक वाटतं.

दाराब हाउस,<br>फॉर्जेट क्रॉस लेन,<br>मुंबई २६

उमाकांत भेंडे

# प्रस्तावना

नऊ वर्षांपूर्वींची गोष्ट. त्या दिवशीं आषाढी एकादशी होती. मी बाराच्या सुमारास 'महाराष्ट्र' कचेरींतून घरीं परत आलों आणि जिना चढून माडीवर जातों, तों डोळ्यांवर काळसर भिंगाचा चष्मा घालून टेबलाजवळ उभ्या असलेल्या तरुण शालीन गृहस्थांनी मला स्मितपूर्वक नमस्कार केला.

'आपणच बेंडे ना? विठ्ठलरावांनी लिहिलं होतं मला—' मी त्यांना उलट नमस्कार करून म्हटलें.

'हो—'

'आपल्या नाटिकेवरली टीका मी नुकतीच वाचली—'

'ते नाटिकाकार 'बेंडे' निराळे. मी 'भेंडे' आहे. माझा वाङ्मयाशीं कांहींसुद्धां संबंध नाहीं. मी ब्लॅकी अँड सनचा प्रवासी प्रतिनिधि आहे—' त्यांनी हंसत हंसत खुलासा केला.

नऊ वर्षांपूर्वी आपला साहित्याशी कांहींहि संबंध नाहीं असें पहिल्या भेटींत मला सांगणाऱ्या माझ्या मित्राच्या या छोटेखानी पुस्तकाला मी आज प्रस्तावना लिहीत आहे.

पण, श्री. भेंडे यांनी त्या वेळीं मला स्वतःसंबंधी जें सांगितलें, तेंच एका अर्थानें अजूनहि खरें आहे. 'साहित्यिक' या शब्दानें ज्या 'वृत्ती'चा बोध सामान्यतः होतो, त्या 'वृत्ती'चा कोणताच ढंग किंवा दिमाख त्यांच्या ठिकाणीं नाहीं. 'प्रवासी प्रतिनिधि' असें जें आपलें वर्णन त्यांनीं त्या दिवशीं मजजवळ केलें, त्या वर्णनाची समर्पकता हें पुस्तक वाचतांना कोणाच्याहि प्रत्ययाला येईल. या पुस्तकांत मुख्यतः प्रवासांत पाहिलेल्या किंवा प्रतिनिधि म्हणून परिचित झालेल्या स्थळांचीं आणि व्यक्तींचीं वर्णनेंच आपल्या दृष्टीस पडतात.

आणि श्री. भेंडे यांची सगळी अभिजात रसिकता या वर्णनांत ओतप्रोत भरलेली असल्यामुळेंच मला हें त्यांचें पुस्तक इतकें रोचक वाटलें.

'प्रवासी प्रतिनिधि' या शब्दांनीं स्वतःचें वर्णन करणाऱ्या या लेखकाच्या रसिकतेला 'अभिजात' हें विशेषण मी लावलेलें पाहून श्री. भेंडे यांना न ओळखणाऱ्या वाचकांच्या मनाला तरी धक्का बसल्याशिवाय राहणार नाहीं. कारण, 'अभिजात' हा शब्द उच्चारतांच जें पांडित्याचें जडगंभीर वातावरण आपल्या मनाभोंवतीं उत्पन्न होतें तें या फिरत्या मुशाफराच्या लेखणींत कोठून दिसणार? शंका अगदीं रास्त आहे; व प्रस्तुत पुस्तकांतील एकाहि लेखांत पांडित्याचा आळ श्री. भेंडे यांच्यावर कोणी घ्यावा असें एकहि अवजड अवतरण आढळणार नाहीं.

पण, अभिजात रसिकता ही काय केवळ विद्वत्तेनें कमावतां येणारी चीज आहे? ती जर केवळ पांडित्यांतून पैदा होणारी चीज असती, तर कलेचा काथ्याकूट करणारे वावदूक किंवा तिची उपासना करणारे साहित्यिक हे पुष्कळदा इतके अरसिक, इतक्या संकुचित दृष्टीचे आणि क्षुद्र मनाचे कां आढळते? रसिकता हा मनाचा धर्म आहे; व तें मन जितकें संस्कारक्षम, जितकें सुसंस्कृत आणि जितकें उदार, तितकी त्याची रसिकता अभिजात असते.

श्री. भेंडे यांचा हाच आत्मीय गुणविशेष त्यांच्या पहिल्या भेटींत माझ्या मनांत भरला. आपला वाङ्मयाशी कांही संबंध नाही असें जें त्यांनी मला सांगितलें, तें एवढ्याचपुरतें खरें होतें कीं, ते वाङ्मयाचे धंदेवाईक व्यासंगी, व्यवसायी किंवा वावदूक नाहींत. एरवी त्यांचें इंग्रजी आणि मराठी ललित वाङ्मयाचें वाचन चांगलें सखोल असून, या दोन्ही भाषा ते सारख्याच लाघवानें बोलतात–लिहितात हा अनुभव मला त्याच दिवशीं आला. या चोखंदळ वाचनाला धंद्याच्या निमित्तानें आसेतुहिमाचल केलेल्या प्रवासांतील चतुरस्र

निरीक्षणाची जोड मिळालेली असल्यामुळें त्यांच्या संभाषणांत काय किंवा पत्रांत काय एक प्रकारची अवीट रंगत येते. विशेषतः त्यांच्या गप्पा तर फारच मिष्टास आणि मार्मिक असतात. त्या गप्पांना उपमाच द्यावयाची झाली, तर ती त्यांच्या आतिथ्याची देतां येईल. मात्र गप्पा मारतांना ते कितीहि रंगांत आले, तरी त्यांचें मर्यादेचें भान सुटत नाही. काळसर भिंगाआड स्वतःला दडवून जगाकडे पाहणाऱ्या त्यांच्या त्या मिस्किल डोळ्यांत व्यंजनेची जी काय वात्रट चमक मधून मधून खेळेल तेवढीच. जुन्या प्रतिष्ठित घराण्यांत वाढलेल्या सुसंस्कृतांच्या ठिकाणीं रुबाब आणि आदब, स्वाभिमान आणि शालीनता यांचा जो मोहक मिलाप झालेला असतो, तो जसा त्यांच्या वागण्यांत तसाच बोलण्यांतहि अनुभवाला येतो. स्वतःचें वर्णन ते केव्हा केव्हा कुचेष्टेने 'फॉरसाइट' म्हणून करतात. पण, गॅल्सवर्दींच्या 'फॉरसाइट्स्' मध्यें जी द्रव्यदृष्टि मध्यमवर्गीयांची रुक्ष हिशेबी वृत्ति दिसून येते, तिचा लवलेशहि त्यांच्यांत नाहीं. उलट, प्रवासांत आलेल्या नानाविध अनुभवांचें मर्म आपल्या वृत्तींत मुरवून त्यांनी स्वतःच्या जन्मजात सुसंस्कृतपणाला एक प्रकारचें कलात्मक उदार स्वरूप आणलें आहे.

त्यामुळें त्यांचा स्नेह आणि सहवास हा माझ्यासारख्या बैठें, एकांगी जीवन कंठणाऱ्या माणसाला जर शिक्षाप्रद वाटत असला, तर त्यांत नवल कसलें? ना धड विद्यालयीन संस्कार घडलेले, ना धड आधुनिक शास्त्रें आलोडिलेलीं, ना धड देशाटन केलेला, असा मी—त्यांच्या मार्मिक शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'एक गांवढळ बेंगरूळ माणूस'—त्या मला आपले नाना प्रकारचे अनुभव मोठ्या मिष्टास वाणीने सांगून आणि नाना दर्जाचे मानवतेचे नमुने दाखवून त्यांनीं माझी दृष्टि किती तरी व्यापक केली. त्यांच्याबरोबर मी उत्तर हिंदुस्थानांत प्रवासाला यावें म्हणून त्यांनीं जंग जंग पछाडलें. पण माझ्या व्यवसायबद्धतेमुळें मला तें जमलें नाहीं. परंतु तो योग जरी आला

नाहीं तरी माझ्या लिहिण्यांत चौरसपणा यावा म्हणून जितकें कांहीं त्यांना सांगणें, सुचविणें आणि शिकविणें शक्य होतें तितकें त्यांनीं मला निरपेक्ष स्नेहबुद्धीनें शिकविलें आहे. 'कांता' कादंबरींत मला पाश्चात्य पद्धतीच्या खान्याचें वर्णन करावयाचें होतें. तशा प्रकारच्या खान्याला जरी मी क्वचित् एकादे वेळीं गेलेला असलों, तरी मांसान्नाला स्पर्शहि करावयाचा नाहीं असा माझा नियम असल्यामुळें, त्या पद्धतीच्या खान्याचा क्रम आणि स्वरूप हीं दोन्हीहि कधीं माझ्या नीट ध्यानांत आलीं नाहींत. ही माझी अडचण जेव्हा मी श्री. भेंडे यांना सांगितली तेव्हा त्यांनी एक दिवस मुकाट्याने माझ्यासाठी ग्रँडनमध्ये पाश्चात्य थाटाच्या उत्कृष्ट शाकाहारी जेवणाची व्यवस्था केली. त्यांनी एवढी दक्षता घेतली खरी; पण माझ्या स्वभावसिद्ध बेंगरूळ-पणाने अखेर त्यांच्या सफाईदारपणावर मात केलीच. 'कांता' कादंबरींत आलेल्या खान्याच्या वर्णनांत 'सूप'चा क्रम कसा चुकला आहे, हें प्रसिद्धच आहे. अशी किती तरी गमतीदार उदाहरणें मी सांगूं शकेन. पाश्चात्य शिष्टाचारांचे ते मुरब्बी असल्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा बिनमोल फायदा मला अनेकदा झालेला आहे.

श्री. भेंडे हे जगाकडे रसज्ञाच्या सौंदर्यान्वेषी दृष्टीने पाहतात. 'माझीं आवडतीं सौंदर्यस्थळें' या लेखांत त्यांनी असें म्हटलें आहे कीं–

> 'माणसाला तीन प्रकारची आवड असते, हव्यास असतो, भूक असते–सृष्टिसौंदर्य, मानवी सौंदर्य आणि अद्भुतता. मला या तिन्ही प्रकारच्या आवडी मनसुराद लुटायला मिळाल्या आहेत. आसेतुहिमाचल प्रवास करण्याची मला संधि मिळाल्या-मुळे सृष्टिसौंदर्याचे अनेकविध मासले मी चाखले आहेत; मानवी सौंदर्याचे दैवी नमुने पाहिले आहेत; आणि ज्या ज्या वेळेला हिंदुस्थानच्या सीमेकडे येऊन मी ठेपलों आहे, त्या त्या वेळेला 'पलिकडे काय?' या ऊर्मीमुळे अनेक भडक कल्पनाचित्रें

माझ्या डोळ्यांसमोरून पावसाच्या सरीप्रमाणे सरसरा हालली आहेत. सृष्टिसौंदर्य, मानवी सौंदर्य आणि अद्‌भुतता हे माझे सदाचे सोबती आहेत. त्यांची माझी फारकत करा–माझ्या जीवनांतील आनंद, जिवंतपणा आणि उत्साह नाहीसा होईल.'

मात्र ही त्यांची सौंदर्यजिज्ञासा पढीक, कृत्रिम किंवा अहृदय नाहीं. 'घरोघरचीं दुःखें', 'फॅमिली डॉक्टर', 'रामा गडी', 'छोटीं माणसें' वगैरे प्रस्तुत संग्रहांतील हृदयंगम लेखांत त्यांच्या सूक्ष्मदर्शी मनाची जी कोमलता दिसून येते, ती कोमलता हा खरोखरी त्यांच्या सौंदर्यजिज्ञासेचाच एक भाग होय. दुसऱ्याला टाकून बोलणें किंवा तोडून टाकणें या दोन्ही गोष्टी त्यांना साधत नाहींत; व त्यामुळे पुष्कळदा त्यांना मनस्ताप होतो. पण अशा वेळीं ते हसतमुखाने सगळा त्रास सोसतात. तीन वर्षांपूर्वी ते आमच्या एका मुस्लिम मित्राच्या लग्नासाठी सुंदरसा अहेर घेऊन मुंबईहून मुद्दाम भर उन्हाळ्यांत नागपूरला आले होते. लग्न सूर्योदयाच्या सुमारास झालें. आम्ही दोघेहि लग्नाला हजर होतों; व वरपक्षाचे प्रतिष्ठित वऱ्हाडी या नात्याने काजीच्या नोंदवहींत आम्ही साक्षीदार म्हणून सह्याहि केल्या. लग्नानंतर थोड्या वेळाने खाना होईल, अशी आमची अपेक्षा. पण लग्न झालें तांबडें फुटण्याच्या वेळीं आणि खाना सुरू व्हावयाला झाली कडकडीत मध्यान्ह. पण, श्री. भेंडे यांची स्नेहबुद्धि इतकी सोशीक की, नागपूरच्या गोंड राजाच्या पडक्या किल्ल्यांतल्या जुनाट गलिच्छ वस्तींतले ते पांच सहा तास त्यांनीं मोठ्या मजेंत गप्पा मारीत काढले. स्वतःच्या उंची मिजासखोर राहणीचे चोचले ते अशा वेळीं नडूं देत नाहींत; व आपल्या रसाळ गप्पांनी ते कोणताहि कंटाळवाणा प्रसंग सरस करून सोडतात.

त्यांच्या गप्पांतली ही सरसता आणि सहृदयता प्रस्तुत पुस्तकांतल्या स्थलवर्णनांत भरपूर अनुभवाला येते. आमच्या गृहजीवनांतल्या रम्यतेचें जें रसभरित वर्णन त्यांनी केलें 'धनुर्धारी'तून होतें, त्यांत त्या

गृहजीवनाच्या रम्यतेपेक्षा त्यांच्या सहृदयतेचाच भाग खरोखरी जास्त होता. यजमानाने आपल्या मगदुराप्रमाणें कोंड्याची भाकर पानांत वाढावी आणि यांनी ती दिलदारपणाने मांडा म्हणून चुरून खावी, असें जर त्यांच्या स्वभावाचें वर्णन मी केलें तर तें अतिशयोक्तीचें होणार नाही. किंबहुना, मी खुद्द त्यांनाच एकदा गमतीने म्हटलें होतें की, 'उमाकांत, तुम्ही ज्या घरीं पाहुणे म्हणून जाल त्या घराच्या बगीच्यांतल्या पडवळीला द्राक्षाचे घोस लटकतील आणि चिंचवणीला अमृताची चव येईल.'

त्यांचा स्वभाव जसा दिलदार, तशीच अभिरुचि उदार आहे. त्यामुळेच श्री. विठ्ठलराव घाटे आणि सरहद्द गांधी यांच्यासारख्या अगदी भिन्न कोटींतल्या व्यक्तींचीं स्वभावचित्रें ते इतक्या समरसतेनें सुंदर रेखाटूं शकले. 'घरोघरचीं दुःखें', 'फॅमिली डॉक्टर', 'रामागडी', विक्षिप्तपणा' वगैरे त्यांच्या लघुनिबंधांच्या विषयांचा नवीनपणा हाहि त्यांच्या उदार आणि कोमल अभिरुचीचाच निदर्शक आहे. अर्थात्, या साऱ्या प्रसंगांनुसार केवळ हौसेने लिहिलेल्या लेखांत लालित्य किंवा साहित्य म्हणून ज्याला म्हणतात, तें कित्येकांना कमी आढळेल. परंतु, जगाकडे आणि जीवनाकडे पाहण्याची सौंदर्यान्वेषी पण सानुकंप अशी जी दृष्टि या सर्व लेखांतून प्रतीत होते, ती मात्र आपल्यांत अगदी विरळ आहे; व त्यामुळे या पुस्तकांतील बहुतेक सारे लेख आपआपल्या परीने हृदयंगम किंवा चटकदार वाटतात. मग त्यांत कलेच्या मीनाबाजारांतलें लालित्य आणि साहित्य नसेना का!

पण श्री. भेंडे हे तरी आपल्याला 'साहित्यिक' कुठे म्हणवतात? 'प्रवासी प्रतिनिधि' हीच त्यांची मुख्यतः या लेखांतली भूमिका नाही काय? त्या मुशाफरींतल्या गप्पाष्टकांची मजा या छोट्या पुस्तकांत वाचकांना खास लुटावयाला मिळेल.

शान्ता-निवास, नागपूर शहर<br>
२ जुलै, १९४३.

ग. त्र्यं. माडखोलकर

# भा व रे खा

# गाडींतील गमती : १

आगगाडीच्या डब्यांत गमती होऊं शकतात हें कित्येकांना सांगितलं तर खरं देखील वाटणार नाही. आगगाडीचा प्रवास म्हणजे त्रास, दगदग आणि भांडणाचा सुकाळ, असाच असतो नाही बरेच जणांचा अनुभव? मला स्वतःला प्रवासाचा त्रास झाला आहे, दगदग वाटली आहे; पण गाडीच्या डब्यांत ज्या विलक्षण घडामोडी मीं पाहिल्या आहेत, जे विनोदी प्रसंग माझ्यासमोर घडले आहेत, ज्या गमती मीं अनुभवल्या आहेत, त्यांपुढे प्रवासाची यातायात कांहीच वाटत नाही. गाडींतील गमतींचा आस्वाद पुनःपुन्हा मिळावा म्हणून गाडींतच 'मठी' ठोकून राहण्याची माझी तयारी आहे. फक्त रेल्वेनं मला फुकट पास मात्र द्यावा.

जसा हमरस्ता, तसा गाडीचा डबा. रस्त्यांत निरनिराळे लोक त्यांच्या नानाप्रकारच्या वेषांत इकडे तिकडे फिरतांना दिसतात. त्यांतील कांही बावळट दिसतात, कांही बिलंदर दिसतात, कांही डांबरट असतात, तर कांही मोठे हुशार वाटतात. तसंच डब्यांत तुम्हांला एक 'छोटंसं जग' दिसतं. या जगांत मोठ्या जगांतील

विविधता, विषमता, रंगढंग, नखरेलपणा, बिलंदरपणा, लबाडी, हुशारी, सगळं कांही दिसतं. फक्त हमरस्त्यावरील विशाल धावत्या जगांत आपणहि धावत असल्यामुळं आपल्या मनांत उमटणारीं दृश्यं पुसट असतात; उलट गाडींत थोडा वेळ सहप्रवासी म्हणून आपण एकत्र आल्यामुळं आपल्या मनावर होणारे परिणाम, आपल्या मनःफलकावर उमटणारीं चित्रं, कायमचीं असतात.

आपल्या शेटाणीकडे कोणी पाहिलं रे पाहिलं कीं त्याच्याशी भांडण उकरणारा मारवाडी, 'माझ्या त्या पेटींत जडजवाहीर आहे. अगदी रात्रभर मला पहारा ठेवला पाहिजे. तुम्हांलाच म्हणून सांगतों हो जरा. बोलूं नका हं दुसऱ्या कोणाला'—म्हणून प्रत्येकाला आपलं गुपित सांगणारा भोलानाथ, गडबडींत सेकंड-क्लासमध्ये चढून घाबरटपणें माझ्या वळकटीवर बसणारा गरीब बिचारा बिनतिकिट्या, त्याचं टकमक बघणं, त्यामुळं आम्हां सर्वांची तिरपिट, 'कांही घाबरूं नका. माझ्याकडे पिस्तूल आहे. फक्त पेटींतून बाहेर मात्र काढा' म्हणून सांगणारे आमचे भित्रे सह-प्रवासी, भस्मासुरासारखा अजस्र देहधारी पठाण, त्याची कुंभकर्णी झोप, त्याचं तें भयंकर घोरणं-ढग आपटल्यावर जसा आवाज होतो तसा स्फोट व्हायचा त्याचे ओठ एकमेकांवर आपटल्यावर—अशींहि अनेक मजेदार, गमतीदार दृश्यं कोण बरं विसरूं शकेल ?

पण यापेक्षाहि अघटित घटना गाडींतल्या 'लहानशा जगांत' होत असतात. मुंबईहून एकदा आम्ही निघालों त्या वेळीं एका सेकंडच्या डब्यांत चार प्रवासी होते. एक होते सरकारी नोकर, मी एक व्यापारी प्रतिनिधि, मिलिटरी ऑफिसर एक आणि एक साधु. साधुमहाराज चांगले लांबरुंद, राजबिंडे आणि अतिशय

बोलके होते. इंग्रजी फार फक्कड बोलत होते ते. त्यांनी डब्यांतील आम्हां तीन अबोल प्राण्यांची ओळख करून घेतली आणि अनेक रसाळ गप्पा मारल्या.

शेवटीं ते 'बिनतिकिट्यांवर' घसरले. या वेळीं सरकारी नोकर, मी, ते मिलिटरी ऑफिसर, सगळेच आम्ही बिनतिकिट्यांच्या बाजूनं बोलूं लागलों. आम्हीं अनेक कारणं दाखविलीं लोक बिनतिकिटानं प्रवास कां करतात याचीं. पण स्वामीजींचं म्हणणं एकच–प्रत्येकानं पैसा खर्च करून तिकीट घेतलंच पाहिजे, मगच त्यानं गाडींत पाय ठेवावा.

आमचा हा वादविवाद रंगांत यायला आणि एक टिकेट-एक्झामिनर आमच्या डब्यांत यायला एकच गाठ. त्यानं स्वामिजींच्या बाजूनं निर्वाळा दिला. 'तडाके ओढले पाहिजेत या फुकट्यांच्या पाठीवर,' तो म्हणाला.

त्यानं तिकिटं तपासण्यास मागितलीं. आम्हीं सर्वांनी दाखविलीं. स्वामिजी फक्त राहिले. टिकेट-एक्झामिनरनं त्यांच्या-समोर तिकिटासाठी हात पसरला.

'I haven't got a ticket.' स्वामीजी संथपणें म्हणाले.

'What ?' तिकेट-एक्झामिनर खेकसले.

आम्हांला मोठा अचंबा वाटला.

'You see,' स्वामीजी म्हणाले, 'We are Saints and Prophets. Rules and regulations intended for common people cannot be applied to us.'

स्वामीजी सहानुभूतीसाठी आमच्याकडे पहात होते.

'Then you ticketless Saints and Prophets have place in jail. Get out !' तिकेट-एक्झामिनर चेवून म्हणाला. त्यानं स्वामीजींच्या बगलेला हात घातला.

स्वामीजींना उतरणं भाग पडलं. रेल्वे-पोलिसनं या ईश्वरी दूताच्या देहाचा ताबा घेतला.

जेव्हा स्टेशनवरून गाडी सुटली तेव्हा आम्हीं तिघा प्रवाशांनी एकमेकांकडे पाहिलं. कां कोणाला माहीत—आम्हांला सारखं हसूंच येऊं लागलं. 'What a funny incident ?'. मिलिटरी ऑफिसर म्हणाले. 'किती मजेदार अनुभव !' मींहि मनांतल्या मनांत तेंच म्हटलं.

याच्या उलट कित्येक वेळां अतिगंभीर प्रसंगहि या गाडींतल्या लहानग्या जगांत रंगतात. ज्या वेळेला हे प्रसंग घडतात त्या वेळीं ते गंभीर भासतात. पण मागाहून त्यांची आठवण झाली कीं खूप हसूं येतं.

आम्ही एकदा लाहोरहून पेशावरला थर्डनं जात होतों. शहाण्या माणसानं दिल्लीहून पुढे तिसऱ्या वर्गानं प्रवास करूं नये. आम्ही मूर्ख म्हणून थर्डनं निघालों. गर्दी मी म्हणत होती. आठदहा माणसं तर उभींच होतीं. वरच्या बाजूच्या सामान ठेवण्याच्या जागीं एका बाजूला एक पठाण झोपला होता. दुसऱ्या बाजूला सामानच सामान लागलं होतं.

या पठाणाची मजा—

दोन दोन मिनिटांनी तो उठे आणि खालच्या बाजूला थुंके. कोणाची पर्वा त्याला वाटत नव्हती. बेदरकारपणें त्यानं आपलं काम चालू ठेवलं होतं. मीं तें त्याचं भयंकर कृत्य पाहिल्यावर फार गरम झालों. पण त्याच्या अवाढव्य शरीराकडे पाहिल्यावर गप्प बसण्याशिवाय मला गत्यंतर नव्हतं. त्याच्या एका थापेनं मी परलोकवासी झालों असतों. इतर कोणीहि त्याला कांही बोलेना. मला वाटलं-असाच रात्रभर याचा हा कार्यक्रम चालू राहिला तर डब्यांत पाण्याचा पूर यायचा आणि या गंगेत आम्ही धुवून

निघायचे ! गाडी लाहोरहून सुटल्यावर अर्धा तासाच्या आंत मात्र जोरानं कुरबूर सुरू झाली. आणि एका पंजाब्यानं दटावून त्या पठाणाला सांगितलं कीं, खाली थुंकू नकोस. पठाणानं एकदम चढेल स्वरांत थोड्या शिव्या दिल्या आणि उत्तरादाखल तो पचकन् पुन्हा थुंकला. दुसऱ्या पाच सहा जणांनी अगदी अदबीनं सांगितलं, दोघांनी संतापून सांगितलं; पण त्याचं आपलं तें पचापच थुंकणं चालूच होतं. सगळा डबा आता गरम झाला होता. जो तो मोठमोठ्यानं बडबडत होता. त्या पठाणाला नाना तऱ्हेचा दम दिला जात होता. त्याचं उत्तर एकच–'पच्'.

पठाण झोपला होता त्याच्या खालच्या बाकावर एक सुंदर, हसतमुख, वामनमूर्ति तरुण बसला होता. तो हा सगळा प्रकार अगदी शांतपणें पहात होता. डब्यांतील सर्व लोक चिडले होते, भडकले होते, तरी हा शांत होता. याच्या चर्येवर हास्य विलसत होतं. पठाण भडकून अद्वातद्वा बडबडत होता. आता त्याला हेंहि भान राहिलं नव्हतं कीं आपण कोणाच्या अंगावर थुंकूं. शेवटीं व्हायचं तें झालंच. त्या तरुणावर पठाणाची थुंकी पडली. त्याबरोबर तो तरुण गृहस्थ ताडकन् उठला. त्यानं त्या पठाणाच्या मानेला हात घातला आणि तें जाड धूड खाली ओढलं. तो पठाण उलटासुलटा खाली पडला. त्याच्या छातीवर तो तरुण पटकन् बसला. आणि त्यानं त्या पठाणाला चार जबरदस्त चपराका लगावल्या. मग सगळ्यांना चेव आला. माझ्या व्यतिरिक्त सगळ्यांनी त्या पठाणाला चांगला चोप दिला. माझं वर्तन गांधींच्या सत्‌शिष्याला शोभण्यासारखं होतं.

बिचारा तो पठाण ! त्याची रग आता पुरी जिरली होती. तो हतबल झाला होता. तो गुपचूप उठला आणि वर जाऊन

एका बाजूला तोंड करून झोपला. तो इतका वरमला होता कीं, आपली लाज झाकण्यासाठी त्यानं चादर आपल्या सर्वांग अंगावर ओढून घेतली. प्रेतवत् तो आता पडून राहिला.

मीं साहजिकच त्या तरुण गृहस्थाचं हार्दिक अभिनंदन केलं. इवलंसं शरीर असून पराक्रम मात्र त्यानं मोठा केला होता. आपल्यापेक्षा शक्तीनं दसपट जास्त माणसाशी दोन हात करून त्यानं त्याला लोळविला होता. अजब होती त्याची ती करामत!

'You see, I am a professor,' तो मला म्हणाला. 'मला या तंटाबखेड्यांचा मोठा कंटाळा आहे. पण कोणी अति ओढून धरायला सुरवात केली कीं मग त्याला दहा रावणाचं बळ असलं तरी मी मगरमिठी मारीन. हा भुक्कड पठाण तर लिचपिचीत आहे. त्याचं गठडं वळायला दोन मिनिटंसुद्धा जास्त होतीं!'

मी हसत म्हणालों, 'साहेब, मी तुमच्यापेक्षा दुप्पट सशक्त आहे. पण आपल्यानं कांही हें धाडस झालं नसतं.'

'कांही नाही हो, आजपासून लक्षांत ठेवा नियम–पठाण अवाढव्य दिसतो. पण त्याला जरा खुराक द्या तुमच्या हाताचा. तो सुतासारखा नरम येईल.' प्रोफेसरसाहेब म्हणाले.

बाकी दिसला खरा नरम आलेला! कारण तो हालचाल न करतां सताड झोपून होता. पण म्हणून कांही मी प्रोफेसरसाहेबांचा उपदेश पाळणं शक्य नाही. कारण मला खात्री आहे कीं असल्या द्वंद्वांत आमचा 'खीमा' होऊन जायचा.

तिसऱ्या वेळची सर्वच घटना अपूर्व होती. ती एका निमिषार्धांत घडली. आणि अशी कांही चमत्कारिक होती कीं मला त्या घटनेची आठवण झाली कीं अंगावर शहारे येतात.

या वेळीं बडनेराला नागपूरकडे जाणाऱ्या मेलमध्ये मी चढलों. सेकंडच्या एका डब्यांत आम्ही दोन उतारू होतों. एक मी आणि दुसरे गृहस्थ एक प्रॉटेस्टन्टधर्मीय प्रचारक. गृहस्थ मोठा उमदा वाटला मला. तत्त्वज्ञानापासून कामशास्त्रापर्यंत सर्व विषयांवर त्यानं अतिशय गोड शब्दांत आपले विचार व्यक्त केले. माझेहि नाना विषयांवरील विचार अगदी शांतपणें ऐकून घेतले. पण मी म्हणतों ती विचित्र घटना एका मधल्या स्टेशनवर अचानक घडून आली.

एक गर्भश्रीमंती थाटाची बाई आमच्या डब्यांत शिरली. ती आपलं सामान आंत घेणार तोंच आमच्या प्रॉटेस्टन्ट धर्मप्रचारकांना एकदम कसला झटका आला कोणास ठाऊक, ते उठले आणि त्या बाईला त्यांनी एकदम दृढालिंगन दिलं. बाईची ओरड, त्या धर्मप्रचारकाचं विकट हास्य आणि मला त्या दोघांचं नातं काय याचं गूढ. त्यामुळं काय करावं तें सुचेना.

पण डोळ्यांसमोर होत होता तो प्रकार मात्र भयंकर होता. डब्यांतील ओरड ऐकून आजूबाजूची मंडळी धावत आली. बाईला त्या धर्मप्रचारकाच्या मिठींतून आम्हीं सोडविली. 'पोलिस,' 'स्टेशनमास्तर', म्हणून एकच ओरड सुरू झाली. पण हे लोक येण्यापूर्वीच धापा टाकीत टाकीत एक गलेलठ्ठ इसम आमच्या डब्यांत घुसले. अजूनहि कांही मंडळी त्या धर्मप्रचारकावर हल्ला करीतच होती. त्या सर्वांना हात जोडून तो म्हणाला, 'आपली माफी मी तर मागतोंच, पण या बाईची तर–माझं डोकं त्यांच्या पायांवर ठेवून अगोदर मी सपशेल माफी मागतों.' खरोखरीच त्यानं त्या बाईला साष्टांग नमस्कार घातला. उठून उभा राहिल्यावर पुढं त्यानं बोलायला सुरवात केली, 'मंडळीनो, हे एक

अतिशय सज्जन गृहस्थ आहेत. आमच्या मिशनमध्ये यांना मोठी सन्मानाची जागा आहे. पण एकाएकी आठ दिवसामागं यांचं डोकं फिरलं आहे. आणि तेव्हापासून हे बाई दिसली कीं तिला आलिंगन द्यायला धावतात. या डब्यांत एखादी स्त्री-उतारू येईल आणि तीहि अशा भलत्याच स्टेशनला, असं मला वाटलं नव्हतं. पण या इथं आल्या आणि मघाचा भीषण प्रकार घडला. वेडाच्या भरांत यांच्या हातून हा अनन्वित प्रकार झाला आहे. वेड्याच्या इस्पितळांतच त्याला मी घेऊन जात असल्यामुळं, उगीच मध्येंच मात्र आम्हांला रागाच्या भरांत उतरवून ठेवूं नका.'

त्या गृहस्थाचं बोलणं इतकं कळकळीचं होतं कीं, सगळ्यांनीच आम्ही 'चक् चक्' असे उद्गार काढून त्याला सहानुभूति दाखविली. ती बाईसुद्धा सुस्वभावी. कारण ती शांतपणें दुसऱ्या डब्यांत निघून गेली. त्यामुळं पोलीस, स्टेशनमास्तर येण्यापूर्वींच बहुतेक तें प्रकरण मिटलं होतं.

फक्त त्या जाडगेल्या गृहस्थांनी त्या धर्मप्रचारकाचे हातपाय मात्र दोऱ्यांनी करकचून बांधून टाकले. आणि तशा स्थितींतच चार हमालांनी उचलून त्याला नागपूर स्टेशनवर मोटारमध्ये डांबला.

डोळ्यांसमोर गोष्ट घडली म्हणून विश्वास ठेवावा लागतो. नाही तर त्या धर्मप्रचारकानं माझ्याशी ज्या गप्पा मारल्या होत्या त्यांवरून त्याला वेडा म्हणणं चुकीचं ठरलं असतं, एवढं होतं त्याचं सुसंबद्ध बोलणं. त्याला वेडा म्हटलं असतं तर मलाच कोणी तरी वेडा ठरवलं असतं. पण स्त्रीला मिठी मारण्याचं त्याचं काय अजब कोडं होतं-देवच एक जाणे तें !

या नंतरची एक गम्मत मला आठवते. ती थोडी विनोदी, थोडी फाजील अशी आहे. रतलाम ते इंदूरचा प्रवास. त्या छोटेखानी गाडींत, छोटा डबा पकडण्यासाठी मी इथं तिथं फिरलों. आणि एक बंद डबा दिसला म्हणून दरवाजा उघडून आंत शिरतों तर एक तरुण हिंदी जोडपं आंत बसलेलं. एक मन सांगायला लागलं आपण दुसरीकडे जावं म्हणून. दुसरं म्हणायला लागलं— ' बस ना इथंच. झालं काय जोडपं असलं म्हणून?' तेव्हा मी बसलोंच त्या डब्यांत, आणि त्यामुळं हिरमुसली ती मंडळी.

गाडी सुरू झाल्यावर आमचे तरुण सहप्रवासी हिंदींत म्हणाले, ' काय, कुठपर्यंत निघालांत ? '

मीं म्हटलं, ' साहेब, माफ करा. मला हिंदी येत नाही. आपला प्रश्न इंग्रजींत विचारा. '

' कां? आपण मद्रासकडचे का ? ' त्यानं इंग्रजींत विचारलं.

मला हिंदी चांगलं समजत होतं. मी मद्रासी नव्हतों. तरी पण, काय माझ्या अंगांत संचरलं होतं कोणास ठाऊक. दिलं झालं ठोकून 'होय' म्हणून.

त्याबरोबर तो आपल्या तरुणीकडे वळून हिंदींत म्हणतो, ' सालेको कुछ हिंदी आता भी नही, तो हम मजा लुटेंगे. '

आणि ही मजा काय, तर त्यांनी अभिजात हिंदीमध्ये शाब्दिक प्रणय सुरू केला. त्यांचे जे शृंगाररसपरिपूरित संवाद सुरू झाले ते इतके उत्तान होते कीं त्यांमुळं मला गुदमरून जाण्याची पाळी आली. मला त्यांच्या भाषणांतील शब्दन्‌शब्द समजत होता. आणि त्यांना वाटत होतं कीं या फडतूस मद्राशाला काय समजणार आपल्या इष्काचा रंग !

एकान्त, विशेषतः प्रणयी स्त्रीपुरुषांचा एकांत, आणि त्या वेळीं चालणारीं कवनं–कूजनं, न ऐकणं बरं! पण मीं तो प्रसंग माझ्यावर ओढवून घेतला होता. त्यामुळं मौनव्रत स्वीकारून, डोळे मिटून जें कानांवर पडेल तें ऐकायला मला तयार राहणं क्रमप्राप्त होतं.

शेवटीं इन्दूर स्टेशन आलं. मला वाटलं–ठीक झालं. यापुढं तरी बिचाऱ्यांना एकांत–खरा एकांत–डब्यांत मिळेल.

‘ क्यौं साहाब, मिजाज तो ठीक है न ?’ माझे एक जानी दोस्त स्टेशनवर आले होते, ते म्हणाले.

‘ बिलकुल. ’ मी म्हणालों, ‘ आपका कारोबार कैसा चल रहा है ?—’

पण माझं वाक्य पुरं होण्यापूर्वींच डब्यांतील तरुणीनं किंचाळीच मारली. पदर हातभर लांब ओढून तिनं आपलं तोंड झाकून घेतलं. आणि माझ्याकडे पाठ करून ती विलक्षण हातवारे करीत आपल्या नवऱ्याला म्हणाली, ‘ साहाब तो हिंदी जानते हैं. आफसोस की बात है. हम लोग क्या क्या बात कर रहे थे–श् श्— ’

तिची ती किंचाळी ऐकल्याबरोबर मी चरकलों. आणि तिच्या तोंडाची चर्पटपंजरी सुरू झाल्यावर तर मी स्टेशनाबाहेरच पळालों.

‘ अरे काय, खोडीबीडी केलीस कीं काय त्या बयेची ?’ माझ्या मागनं धावत आलेला माझा मित्र म्हणाला.

‘ बाबा, मागाहून सगळं कांही सांगतों. माझं सामान अगोदर घेऊन ये. नाही तर त्या प्रणयी जोडप्याला त्याचा अहेर करावा लागेल मला. ’

माझ्या मित्राला जेव्हां खरी हकीकत कळली तेव्हा तो खो खो हसूं लागला. आणि जेव्हा मी त्या तरुण जोडप्याच्या संवादाचीं तपशीलवार वर्णनं देऊं लागलों तेव्हा साहेब खोदून खोदून प्रश्न विचारूं लागले. चावट लेकाचा !

पण तेव्हापासून अनेकदा मी रतलाम ते इंदूर प्रवास केला आहे. बसतों मात्र अशा डब्यांत कीं जिथं राठस बाप्पेच बाप्पे सापडतील.

अशा आहेत या गाडींतील गमती ! प्रवासाचं सुख आपण ज्या स्थळीं उतरतों तें स्थळ आवडण्या–नावडण्यावर अवलंबून असतं. आणि गाडींतलं सुखदुःख आपण जो डबा निवडतो त्यावर अवलंबून असतं. त्या छोट्या डब्यांत विविध रंग, अनेक रस, नाना प्रकारचे ढंग, मनुष्य जातीच्या स्वभावाचे विलक्षण नमुने; विनोदी, गंभीर घटना--सर्व सर्व कांही अनुभवायला, चाखायला, अवलोकन करायला मिळतात.

विशाल जगापेक्षा या गाडीच्या डब्यांतील छोट्या जगांतच मला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या आहेत. म्हणूनच माझी अशी मागणी आहे कीं, मला एक रेल्वेचा फुकट पास द्यावा, म्हणजे मी सदैव माझी ‘ मठी ’ गाडीच्या डब्यांतच ठेवीन.

—नोव्हेंबर १९४१, यशवंत

★

## माझीं आवडतीं सौंदर्यस्थळं : २

माझ्याकडे मुंबईला नवा पाहुणा अथवा पाहुणी आली कीं मी त्यांना आग्रह करकरून अपोलो बंदर, राजाभाई टॉवर, मरीन ड्राईव्ह, चौपाटी, हँगिंग गार्डन, महालक्ष्मीचा समुद्र, राणीचा बाग, वरळीची नवी चौपाटी, सर्व कांही दाखवितों. या निरनिराळ्या स्थळीं गेल्यावर माझ्या पाहुण्याकडे 'अशी हीं आमचीं मुंबईचीं छानदार स्थळं आहेत', असंही मिठास वर्णन करतों. अनेक वेळां या दिव्यांतून मला जावं लागलं आहे. पण यत्किंचितहि न त्रासतां मीं हीं स्थळं माझ्या या बाहेरगांवच्या मित्रमंडळींना दाखविलीं आहेत, आणि त्यांचीं गोडगोड वर्णनं त्यांना दिलीं आहेत. अशीं मुंबईला भेट देणारीं कांहीं माणसं म्हणतात देखील मला—'मुंबई पाहावी तर ती तुमच्या संगतींत. फार उत्तम वाटाडे आहांत बुवा तुम्ही.'

पण अंदरकी बात अशी आहे कीं, हीं सगळींच स्थळं मला मुळींच आवडत नाहीत. सदासर्वदा जिथं बजबजपुरी, सदान्कदा जिथं गर्दी आणि वर्दळ, नेहमी जिथं माणसांची झुंबड, त्या स्थळांचा निदान मुंबईत तरी मला कंटाळा येतो. चौपाटीवर जा,

तिथं माणसांची ही गर्दी. मग तिथं एकमेकांकडे टक लावून पाहाण्यांत, नाहीं तर फिरत्या व्यूहांतून रस्ता काढण्यांत नाकीं नऊ येतात. मरीन ड्राईव्हवर फिरायला जायचं म्हणजे लष्करांतील slow march ची कवाईत प्रथम शिकून घेतली पाहिजे. हीच परिस्थिति महालक्ष्मीला आणि अपोलो बंदरावर. नाही म्हणतां नव्या चौपाटीवर थोडी कमी गर्दी असते. पण तिथं श्रीमंत लोक झक्क पोशाख करून रुबाबानं फिरत असतात. त्यामुळं फिरणं राहतं एका बाजूला; आणि या श्रीमंत लोकांकडे तरी लक्ष वेधतं नाही तर पलिकडच्या रस्त्यानं जोरानं जाणाऱ्या मोटारगाड्यांकडे पाहून डोकं भिरभिरायला लागतं.

तिन्ही त्रिकाळ आवाज, घरघर, माणसांची अहोरात्र भीड आणि ये–जा, अनेक वाहनांची वर्दळ. अशा या मुंबईत मला तरी सायंकाळीं एखाद्या निर्मनुष्य, निवान्त अशा स्थळीं जाऊन बसायला फार आवडतं. मुंबईच्या धकाधकीच्या चक्रांतून संध्याकाळीं मोकळं झाल्यावर मन सांगतं–आता अशा ठिकाणीं चल कीं जिथं शांत वातावरण सापडेल, जिथं चिटपाखरूहि नसेल आणि जिथं निसर्गाचीं चित्रं मनाला रिझवितील, हृदयाला आनंदवितील आणि श्रांत शरीराला उबारा देऊन पुनश्च दुसऱ्या दिवशींच्या रामरगाड्याला लागणारा उत्साह आणि शक्ति देतील.

तुम्ही म्हणाल–अशीं एकान्त स्थळं मुंबईत कशीं मिळतील ? बरोबर आहे तुमचा प्रश्न. मलाही प्रथम असंच वाटत असे कीं या मुंबईच्या गडबड्या वातावरणांतच आपला जन्म जाणार आणि मरणही येणार. पण एक दिवशीं म्हटलं–पाहूं या तर खरं मुंबईत कांही निवान्त स्थळं सापडतात का ? आणि आश्चर्य हें कीं बरेच दिवस पुष्कळ शोध करून थकल्यावर माझ्या रहात्या घराजवळच

अशीं दोन स्थळं मला मिळालीं. ज्या दिवशीं प्रथम मी या स्थळीं जाऊन पोहोचलों, त्या दिवशीं स्वर्गच हातीं मिळाल्याचा मला आनंद झाला.

ऑल्टमाँड रोडवरून तुम्ही सरळ वर जा. शेवटीं तुम्हाला 'हा रहदारीचा रस्ता नाही' अशी पाटी लागेल. दबकाल तुम्ही, पण कांही घाबरूं नका. सरळ पुढे चला. उजाड जागा वाटेल ती सगळी. जिकडे तिकडे पसारा दिसेल तुम्हांला पिकल्या पानांचा. पण थोडं पुढं सरा. दगडाचा बंधारा आढळेल त्या ठिकाणीं. आणि तेथून सभोवार तुमची नजर फिरूं द्या. मनाला सात्त्विक आनंद देणारं अत्यंत प्रसन्न वातावरण सभोवार तुम्हांला दिसेल! निसर्गाचं अप्रतिम सौंदर्य तुम्हांला प्रतीत होईल. आणि विशेष हें कीं, तुमचं हें निसर्गाशी हितगूज अगदी एकान्तांत तुम्हांला करायला सापडेल. जीं दृश्यं हँगिंग गार्डनवरून तुम्हांला दिसतील तींच येथून दिसतील खरीं. पण येथल्या अनुभूतींत विशेष आनंद आहे. कारण इथं तुमच्या समाधीचा भंग कोणी करूं शकत नाही. सार्वजनिक स्थळीं गेल्यावर नेहमी आढळणारी भिरभिर, जमलेल्या लोकांची किरकिर आणि टवाळीचं टेहळणं याचा तुम्हांला इथं ताप होणार नाही. क्वचित् प्रसंगीं या जागीं एखादं युरोपियन जोडपं प्रेमी गप्पांत चूर झालेलं तुम्हांला दिसेल. अथवा एखादे वेळीं जवळच्याच बंगल्यांतील एखादा बटलर शेजारच्या बंगल्यांतील आयाशी गुलगुल गोष्टी करतांना सापडेल. पण हेंहि क्वचित्च. बहुतेक कोणीही इथं तुमचा एकान्त भंग करणार नाही.

या स्थळाकडून एक लहानसा अरुंद रस्ता जातो. तुम्ही कारमायकेल रोडवर येतां. पुढं सरळ चला. अगदी शेवटीं एक

कुंपण लागेल. पडलेल्या कुंपणावरून हळूच पलिकडे चला. तुम्ही गामाडिया हिल रोडवर याल. तिथं तुम्हांला मरीन ड्राइव्ह-वर जसा बंधारा आहे तसा दिसेल. तडक वर चढा आणि समोवार नजर फेका. मनोहर देखावा दिसेल तुम्हाला—तो वरळीचा समुद्र, समुद्रांतील मामा हज्जामची मशीद, रेसकोर्स आणि हॉर्नबी वॅलार्डचा विस्तीर्ण रस्ता, त्या रस्त्यावरून जाणाऱ्या त्या वेगवान् गाड्या, नेहमींच्या परिचयाचीं दृश्यं आहेत हीं मुंबईकरांचीं. पण या गामाडिया हिलवरून तीं पाहण्यांत विशेष मौज वाटते, विलक्षण गुदगुदल्या होतात मनाला. कारण तीं पाहात असतांना आजूबाजूला कोणाचा उपसर्ग नाही, कोणाची वचवच नाही.

अशीं छुपीं निवान्त स्थळं मुंबईत अनेक असतील. पण मला मात्र हीं दोन सापडलीं म्हणून नेहमीच अत्यानंद होतो. कारण मुंबईत दुर्मिळ असा एकान्त, कधीहि न सापडणारं निवान्त वातावरण मला या ठिकाणीं सापडतं.

हेंच वातावरण, हाच एकान्त, पण त्यांत अवर्णनीय अशी निसर्ग-शोभेची विशेष भर गोमंतकांत फेरफटका करतांना उपभोगायला मला मिळाली आहे. मंगेशीच्या मागल्या बाजूच्या टेकडीवरून जीं निसर्गाचीं धावतीं दृश्यं मीं पाहिलीं आहेत त्यांची आठवण झाल्यावर अजूनहि माझ्या मनांत आनंदी आंदोलनं सुरू होतात. कलांगूटच्या समुद्रकिनाऱ्यावर बसून समुद्रावरचीं जीं हालतीं दृश्यं मीं पाहिलीं आहेत, त्यांचं स्मरण झालं कीं आजही माझ्या मनांत आल्हादक हेलकावे उत्पन्न होतात.

निवान्त स्थळाची मला अत्यंत आवड आहे, म्हणजे मी माणूसघाण्या आहे अशी मात्र समजूत करून घेऊं नका. कुलू अथवा कांग्रा दऱ्यांतून फेरफटका करतांना निसर्गाचं वातावरण

मला धुंद करतंच, पण तेथल्या लोकांत मिसळण्यांत मला विशेष गम्मत वाटते. या दऱ्यांतील त्या लुसलुशीत मुली, विशाल माणसं आणि त्यांच्या अंगावरील वस्त्रांचे ते बेछूट रंग—त्या रंगीबेरंगी वातावरणांत उन्मनस्क होऊन जातो माणूस. विशेषत: सणासुदीला कांग्रा किंवा कुलू दऱ्याखोऱ्यांचा तुम्ही फेरफटका करा. त्या वेळीं इंद्रधनुष्याचे सारे रंग उधळलेले दिसतील तुम्हांला तिथं. जगांतील अप्रतिम देहसौंदर्य सापडेल. तुम्हांला पाहायला आणि चोहोकडे चाललेलं अखंड नृत्य पाहून तुम्ही बेभान होऊन जाल.

कांग्रा वा कुलू दऱ्यांतून फिरतांना मी सृष्टिसौंदर्यापेक्षा मानवी सौंदर्यालाच जास्त भुरळून जातों. तेथील लोकांची रंग-संगति मला मोहून टाकते. त्यांचं शरीरसौष्ठव, तेथील गुलाबी यौवन माझ्या शरीरांत उत्तान संवेदना उत्पन्न करतात.

असंच लाहोरच्या अनारकलींतलं मानवी वातावरण माझ्या मनाची जबरदस्त पकड घेतं. माझे पंजाबी मित्र मला नेहमी म्हणतात, ' अरे बाबा, लाहोरांत मॉल रोडवरच्या एलफिन्स्टन नाही तर दुसऱ्या एकाद्या हॉटेलमध्ये उतर ना. त्या सदा गजबजलेल्या अनारकलींतल्या 'स्टँडर्ड'मध्ये कशाला उतरतोस ? ' पण स्टँडर्ड हॉटेलसाठी कांही मी अनारकलींत जात नाही, तर अनारकलीसाठी स्टँडर्डमध्ये उतरतों.

आणि दहा दहा तास कांहीहि काम न करतां माझ्या खोलीच्या खिडकींतून मी सारखा बाहेर अनारकलींतील मानवी वातावरणाकडे पहात असतों. अनारकलींत घाण आहे, अनारकलींत गिचमीड गर्दी आहे; पण याच अनारकलींत मानवी सौंदर्याचे जे नमुने पाहायला सापडतात, विविध रंगांची

जी उधळण दिसते, यौवनाची तकाकी आणि खुमारी जी दृग्गोचर होते, ती पाहण्यासाठी इतर वाटेल त्या अडचणी सोसायला मी तयार आहे.

अनारकलींतून कित्येक वेळां वीज चमकून जाते, तर अनेकदा टवटवीत फुलं इतस्ततः फिरतात. हे गुलाब, कमळं, पारिजातक, सूर्यफुलं, पाहिलीं कीं वाटतं–जन्माला यावं पण अनारकलींत एकदा तरी राहून डोळ्यांचं पारणं फेडावं. स्त्रियांच्या सौंदर्याला इथं जशी वाण नाही तशी रुबाबदार, सशक्त आणि नीटस माणसंहि इथं विपुल. अमोघ वातावरण आहे हें. अनार म्हणजे डाळींब. त्यांतील दाणे जसे टप्पोरे, लालूस आणि भरघोस तशीच येथील मंडळी. इथं कुठून होणार निसर्गाची आठवण! इथं मन गुंगणार मानवी सौंदर्याच्या फुलत्या बागेंत.

रावळपिंडीवरून दिवसाच्या गाडीनं पेशावरला जायला मला फार आवडतं. कारण ती वळणावळणानं जाणारी गाडी अशा प्रदेशांतून जात असते कीं ज्या प्रदेशांत अद्भुतता आहे, जादू आहे. केव्हा उजाड जमीनच तुम्हांला दिसते, तर केव्हा गर्द झाडी. केव्हा कड्यावर वसलेलं टुमदार शहर, तर केव्हा एखादा स्वच्छ, शीतल तलाव. केव्हा सुंदर, सुबक शेत, तर केव्हा छानदार खेडं. केव्हा खळखळणारं पाणी, तर केव्हा निर्मनुष्य पण उन्हाच्या तिरपीनं तकाकणारा लांबच लांब डांबरी रस्ता.

आणि प्रत्येक स्टेशनवर गाडी उभी राहिली कीं जेलवजा तें स्टेशन, धिप्पाड पठाणांची गाडी पकडण्याची धडपड, बुरख्यांतल्या नवजवान कामिनी, हातांत बंदुका आणि छातीवर छऱ्यांचा पट्टा बांधून इतस्ततः फिरणारे पहाडी खेडुत–सगळं भव्य, विशाल काम असतं हें. आमच्या बोरीबंदरचा नटवेपणा,

नाजूकपणा किंवा खुजटपणा इथं नाही. अचाट, अवाढव्य आणि विराट् विश्व आहे हें उत्तरेकडचं.

सायंकाळीं चारपांचच्या सुमारास पेशावर! कां तें मला सांगतां येत नाहीं, पण पेशावरला पाय लागले कीं विलक्षण सुखसंवेदना माझ्या मनांत उत्पन्न होतात. पेशावरांत जें एक मध्ययुगीन वातावरण आहे तें मनाची जबर पकड घेतं. बसले आहेत खूपसे पठाण ‘चारपाय’ घालून गप्पा ठोकीत, ओढताहेत मनमुराद हुक्का, त्यांच्या त्या खडबडीत पुस्तु भाषेंत ते भांडताहेत कीं प्रेमानं बातचीत करताहेत हें सुद्धा कळणं कठीण. जरा तुमचा टांगा उभा राहिला कीं जमले तुमच्या आवतीभोवती. ना धंदा ना उद्योग. आणि असे फाडफाडून बघतील तुमच्याकडे कीं तुम्ही कितीहि धट्टमुट्ट असलां तरी टरारून जायचे अगदी!

पण या मध्ययुगीन रोमांचकारी वातावरणापेक्षा मला जास्त आकर्षण वाटतं त्या पेशावर–काबूल रस्त्याचं. ती सडक–पण ती सडक अशी आहे कीं हिंदुस्थानची सीमा तिथं संपते. तिच्या सीमेवर टोळ्यांचं साम्राज्य आहे. त्यापलिकडे खैबरघाट, पुढे अफगाणिस्तान आणि त्यापुढे अनेकविध मुलुख.

कित्येक वेळां मी ह्या सडकेवर जाऊन एका कोपऱ्यांत या रस्त्याकडे फक्त पहात बसलों आहे, लांब लांब फिरलों आहे. या सडकेवरच्या इस्लामिया कॉलेजच्या सुंदर इमारती न्याहाळीत राहिलों आहे. पलिकडच्या आफ्रिडी टोळ्यांच्या प्रदेशाकडे भीति, कुतुहल, उत्सुकता अशा संमिश्र भावनेनं दृष्टिक्षेप टाकीत बसलों आहे. आणि केव्हा केव्हा याच सडकेवर बसून हिंदुस्थानच्या पलिकडच्या अनेक मुलुखांबद्दल रम्य कल्पना केल्या आहेत.

तें कल्पनामय वातावरण–किती अद्भुत, किती सुरेख आणि मनोहर असतं तें! अरेबियन नाईट्स्‌मधील वातावरण सुद्धा त्यापुढे फिकं पडेल.

पाहिलेल्या जगापेक्षा न पाहिलेल्या जगाबद्दलच माणसाला– विशेषत: माझ्यासारख्या भटक्या वृत्तीच्या माणसाला–विशेष आकर्षण वाटतं. या अज्ञात जगाबद्दल अनेक प्रकारच्या कल्पना करण्यांत त्याचं मन नुसतं रमून दंगून जातं, बेभान होतं! म्हणून पेशावरची ती मला अज्ञात अशा देशाकडे जाणारी सडक--तें एक माझं अतिप्रिय सौंदर्यस्थळ आहे.

माणसाला तीन प्रकारची आवड असते, हव्यास असतो, भूक असते--सृष्टिसौंदर्य, मानवी सौंदर्य आणि अद्‌भुतता. मला या तिन्ही प्रकारच्या आवडी मनमुराद लुटायला मिळाल्या आहेत. आसेतुहिमाचल प्रवास करण्याची मला संधि मिळाल्या-मुळं सृष्टिसौंदर्याचे अनेकविध मासले मीं चाखले आहेत, मानवी सौंदर्याचे दैवी नमुने पाहिले आहेत. आणि ज्या ज्या वेळेला हिंदुस्थानच्या सीमेवर येऊन ठेपलों आहे, त्या त्या वेळेला 'पलिकडे काय?' या ऊर्मीमुळं अनेक भडक कल्पनाचित्रं माझ्या डोळ्यांसमोरून पावसाच्या सरीप्रमाणं सरासरा हाललीं आहेत.

सृष्टिसौंदर्य, मानवी सौंदर्य आणि अद्भुतता हे माझे सदाचे सोबती आहेत. त्यांची माझी फारकत करा–माझ्या जीवनांतील आनंद, जिवंतपणा आणि उत्साह नाहीसा होईल.

मार्च १९४२, यशवंत

★

## घरोघरचीं दुःखं : ३

त्या दिवशीं मी फार जड मनानं घरीं आलों. माझ्या डोळ्यांसमोर जो प्रकार घडला त्यामुळं माझ्या मनाला जबरदस्त धक्का बसला. माझ्या अगदी जवळच्या नातेवाइकांकडे मी गेलों होतों. त्या गृहस्थाची पत्नी एकदम माझ्यासमोर अद्वातद्वा बडबडत आली. तिचे ते हातवारे, भरमसाट बरळणं, तारवटलेले डोळे पाहून मी घाबरून गेलों अगदी. त्यानंतर आणखी कांहीं वळानं तिनं नवऱ्याला, आईबापांना, सगळ्यांनाच शिव्या द्यायला सुरवात केली. वास्तविक त्या बाईचा मूळ स्वभाव भारी शालीन, मनमिळाऊ; मूळची ती मितभाषी. पण त्या वेळेला ताळतंत्र सोडून तिनं तोंडाचा सपाटा सुरू केला होता; आणि वाटेल ते अभद्र शब्द ती तोंडानं उच्चारीत होती.

तो भयंकर प्रकार पहात असतांच मला तीन वर्षांपूर्वीचा तिचा लग्न-दिवस आठवला. त्या वेळीं ती किती सुंदर, गोड दिसली; आज ती किती भकास, भयंकर दिसत होती. त्या वेळेला किती आनंद झाला होता, किती हुरूप वाटत होता ! कारण तिला फार चांगलं स्थळ मिळालं होतं.

तिच्या लग्नांत दोहोकडून पाण्यासारखा पैसा खर्च करण्यांत आला. त्या वेळचा तो थाटमाट, झगमगाट पाहून, 'फार छान कार्य केलं बुवा,' म्हणून सगळेजण म्हणाले.

पण बरोबर तीन वर्षांनी हा प्रकार घडला, आणि मी जड मनानं घरीं आलों. कारण जे बडे डॉक्टर तिला तपासण्यासाठी आणले होतें त्यांनी ती वेडी झाली असं निदान केलं. माझं मन मला सांगायला लागलं–ती कायमचीच वेडी झाली !

सगळं कांही सुरळीत चाललं असतां असं हें अचानक कां घडून यावं, याचा जेव्हां मीं विचार करतों तेव्हा तेव्हा उलगडाच होत नाही. दैवाचा घाला म्हणायचा आणि गप्प बसायचं !

दुसऱ्या एका घरचा माझा अनुभव याहिपेक्षा भयंकर आहे. एका संस्थानांतील हें एक सुसंपन्न घराणं. आई, बाप, मुलगा आणि मुलगी. घरांत आबादी आबाद. चोहोकडे मानमान्यता. मुलगा आणि मुलगी सुलक्षणी आणि सुशील. आईबापांना जावई आणावा म्हणून अनिवार इच्छा झाली. एक सुंदर स्थळ मिळालं. दबाजांत लग्न झालं. सगळ्यांच्या हौशी फिटल्या. त्या कुटुंबांत आनंदी आनंद दरवळला.

पण किती थोडे दिवस ! एक वर्ष पुरतं झालं नाही. मुलगी एकच दिवस आजारी झाली, आणि धनुर्वातानं रातोरात उडाली. आईबापांची भेटसुद्धा झाली नाही. खेडेवजा एका गावांत हा प्रकार घडल्यामुळं ठीकशी डॉक्टरी मदतहि मिळाली नाही. अनेकांना जेव्हा ही अतिदुःखद वार्ता कळली तेव्हा ती खरी वाटेना. कारण मुलगी धडधाकट, सदा आनंदी आणि मोठी आशावादी. आयुष्यांत आपल्याला खूप खूप कांहीतरी करायचं

आहे अशी सदा हृदयाशी महत्त्वाकांक्षा बाळगणारी. पण एका दिवसांत भरकन उडून गेली, आणि आपल्या आईबापांना तिनं जगांतून उठवलं.

मुलांसाठी म्हणून बिचारे दुःख गिळून पूर्ववत् राहूं लागले. पण हृद्रोग हा महाभयंकर असाध्य रोग. फार दिवस गेले नसतील तोंच एक दिवस आईनं 'राम' म्हटलं.

आता राहातां राहिला खिळखिळा बाप, आणि वयाच्या तेराव्या वर्षी दुःखाची भयंकर झळ लागलेला पोरका मुलगा.

परवाच माझी या दुर्दैवी पित्याशी एका हॉटेलांत गांठ पडली. सुरवातीला त्यांनी जसं कांहीच झालेलं नाही असं दाखवायला म्हणून थट्टामस्करी सुरू केली. पण या विनोदी संभाषणांत चारदां त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि पांचव्यांदा त्यांना राहवेच ना. ते भडभडून रडूं लागले.

केवळ मुलासाठी-एकुलत्या एक पोरासाठी-ते जीव धरून राहण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्यांच्या शरीराची दुर्दशा, मनाची नाजुक स्थिति याचा विचार माझ्या मनांत आल्यावर एकदम मला वाटलं-'ह्या गृहस्थानंसुद्धा पटकन् डोळे मिटले तर'-तर मग तो मुलगा! त्याचं काय होईल? सुन्न झालं माझं डोकं, उदास झालं माझं मन!

एक दैवाचा फटका लागतो, पण काय होते ही एखाद्या सुखी कुटुंबाची स्थिति! इकडची दुनिया तिकडे होते; ज्या ठिकाणीं सुरम्य, मनोहर आणि सुखकर वातावरण नांदतं तिथं घनघोर अंधःकार पसरतो.

अशी ही दुःखाची छटा, मला वाटतं, घरोघर पसरलेली आहे. कांहींच्या वांटणीला ही दुःखाची पुंजी जास्त प्रमाणांत येते,

तर कांहींच्या कमी. पण जगांत असं एकादं तरी कुटुंब सापडेल का कीं, ज्याच्या घरावर दु:खाची सावली कधीच पडली नसेल?

एकदा इंदूरला मला एक असं जोडपं भेटलं कीं ते स्वत: आनंदी तर होतंच पण त्यांच्याशी ज्यांचा सहवास व्हायचा त्यांनासुद्धा ते आनंदी करून सोडायचं. साठ-पासष्टीकडे आलेले तो पुरुष आणि स्त्री. पण किती मिठ्ठास त्यांचं भाषण, किती अंत:करणपूर्वक त्यांचं आदरातिथ्य. काव्य-शास्त्र-हास्य-विनोद यांचा तर नुसता पूर वहायाचा त्यांच्याकडे.

या जोडप्याच्या निर्मळ आणि आकर्षक सान्निध्यांत माझा जो काळ गेला तो मी कधीहि विसरणार नाही. हास्य आणि आनंद यांचा भरपूर आस्वाद त्यांच्या सानिध्यांत मला मिळाला. दु:खानं पोळलेल्या माणसांना त्यांच्याकडे आणलं असतं तर त्यांनाहि या गोड जोडप्यानं त्यांचं दु:ख विसरायला लावलं असतं इतकं त्यांच्या आनंदी वृत्तींत चुंबकत्व होतं. रड्या माणसाला त्यांच्या सहवासांत ठेवलं असतं तरी हसत हसत तो आपल्या घरीं परत गेला असता.

मला वाटलं—जगांत आहेत अशीं माणसं कीं ज्यांना दु:खाची झळ लागलेली नाही. मी एक दिवशीं मुद्दामच सुखदु:खाचा विषय काढला या जोडप्याकडे. त्यांनी नेहमीप्रमाणं चतुर आणि विनोदी उत्तरं देऊन मला हसवून हसवून चीत केलं. पण या वेळीं मीं ठरविलं होतं कीं खणपटीस बसून विचारून घ्यायचं या म्हाताऱ्या जोडप्याकडून की, त्यांच्या आयुष्यांत एखादी ठिणगी पडून कधी दु:खाची आग भडकली होती किंवा नाही.

सरळच मीं प्रश्न केला म्हातारेबाबांना—'बाबा, तुमचा विनोद बाजूला ठेवा. मिठ्ठास बाता आपण मग मारूंया. सरळ प्रश्नाला

उत्तर द्या. तुमच्या आयुष्यांत असा एकहि दुःखद प्रसंग आला नाही का कीं ज्यामुळं थोडा वेळ तरी तुमची आनंदी वृत्ति कोमेजली–थोडा वेळ तुमचा विनोदी स्वभाव गंभीर बनला ?'

'अहो, आम्ही प्रसंगातीत माणसं आहोंत असं समजा. म्हणजे मग दुःखद प्रसंग येणारच कसे आमच्यावर ?' म्हातारेबाबांनी पुन्हा विनोद पेरायला सुरवात केली. 'गीतेंत स्थितप्रज्ञाचं वर्णन दिलं आहे ना कीं ते कोठल्याहि प्रसंगांना न डगमगणारे असे असतात म्हणून—वृत्तींत फेरबदल होऊं न देणारे म्हणून ? आमची जात याहूनहि निराळी आहे. आम्ही मुळीं प्रसंगातीतच आहोत.' हॉ हॉ करून म्हातारेबाबा मोठमोठ्यानं हासले.

म्हातारेबाबा वळत नाहीत असं पाहिल्यावर मी आजीबाईकडे वळलों. त्यांनाहि तोच प्रश्न विचारला. त्याहि हंसल्या–'असंहि असूं शकतं हो कीं माणसावर अतिप्रसंग आले कीं तो दुःखातीत होत असेल. अतिदुःखामुळंच त्याची वृत्ति आनंदी होत असेल.'

'वा आजीबाई !' मी म्हणालों, 'तुम्ही तर आम्हांला नवीनच तत्त्व शिकविलंत–दुःखानं माणसाचा अंत पाहिला कीं माणसांत आनंदी वृत्तीचा जन्म होतो. म्हातारेबाबांनी माझ्या प्रश्नाला कलाटणी दिली. तुम्ही अर्धसत्य तरी बोललां आहांत. अतिप्रसंग तुमच्यावर आले आहेत ही तुमचीच कैफियत. बोला आता, हे अतिप्रसंग कोणते ? मला विनोद नको. मिष्ठास भाषा नको. सरळ सरळ जबाब पाहिजे.'

मी आजीबाईला शब्दांत छान पकडली. शाब्दिक वादविवादांत मीं जिंकलं त्या जोडप्याला, म्हणून आनंद झाला मला. त्या धुंदींत सत्य शोधण्याचा माझा प्रयत्न चालू आहे ही गोष्ट मी विसरलों.

माझ्या शेवटच्या प्रश्नाचा काय परिणाम झाला तेंहि चटकन् माझ्या लक्षांत आलं नाही.

पण परिणाम फार भयंकर झाला होता. कारण माझ्या लक्षांत येण्यापूर्वींच म्हातारी आंत निघून गेली होती, आणि म्हातारेबाबांचा चेहरा पांढरा फटफटीत पडून त्यांच्या डोळ्यांत आसवं थबकत होतीं.

येथपर्यंत मजल येईल अशी माझी कल्पना नव्हती. मी म्हटलं, ‘म्हातारेबाबा, माफ करा. सत्य कळावं म्हणून मी सवाल केला. आपल्याला त्यापासून दुःख झालेलं दिसतं. आताचं आपलं वर्तन आपल्या नेहमीच्या आनंदवृत्तीला विसंगत असं आहे.’—

त्यांनी मला पुढं बोलूच दिलं नाही. ते म्हणाले, ‘आपण तरुण आहांत, त्यामुळं एखादी गोष्ट छेडूं लागलांत म्हणजे फार खोलांत शिरतां. आता खरं सांगण्याशिवाय गत्यंतर नाही, म्हणून सांगतोंच. पण हें सत्यकथन करण्याची पाळी आली नसती तर फार बरं झालं असतं.’ म्हाताऱ्यानं आवंढा गिळला आणि पुढं बोलायला सुरवात केली—

‘आम्ही जबलपूरचे राहणारे. आम्हांला एकंदर चार मुली आणि तीन मुलगे. सगळा कारभार सुरळित चालला होता. चार मुलींचीं लग्नं झालीं होतीं. नातवंडं पाहून आम्हांला आनंद वाटत होता. एक मुलगा एम्. ए. पर्यंत शिकला. दुसऱ्यानं व्यापारांत पैसा केला. तिसरा शिकत होता, मोठा गुणी होता. सुख, सुबत्ता आणि समाधान या त्रयीनं आमचं घर अगदी फुललं होतं. पण आंब्याचा मोहर जसा हवेंत फेर झाला म्हणजे गळून पडतो तशी एकाएकी क्षयाची वावटळ आमच्या घरांत शिरली, आणि माझ्या चार मुली आणि तीन मुलगे गप्पदिशीं गेले. नातवंडं तरी रहावीं. पण तीं सुद्धा एकापाठून

एक गेलीं. आता एक शिल्लक आहे. पण सध्या तोहि पछाडला आहे. त्याला औषधोपचार करण्यासाठी आम्ही येथे मुक्काम केला आहे. तो वांचेल अशी आशा नाही, पण प्रयत्न करतों आहोंत. खरंच, अतिप्रसंग आले कीं माणूस रडावं कीं हसावं हें न समजल्यामुळं केव्हा रडतो, केव्हा हंसतो. तुम्ही आमच्या सान्निध्यांत आलांत तेव्हा हंसण्याची तल्लफ होती आमची. दुःखाचा डोंगरच आमच्यावर कोसळल्यावर कुठं राहणार आमच्या डोळ्यांत आसवं ? आटलीं तीं केव्हांच, आणि लागलों आम्ही हसायला. पण त्या हसण्यापोटीं मात्र दुःखाची ज्वाळा धगधगत आहे. तुमच्यासारख्या मंडळींनं आमच्या दुःखाची सदा आठवण करून दिली कीं एक दिवस ही ज्वाळा भडकणार आणि आम्हांलाहि भस्म करून टाकणार.'

अशी ही दुःखाची ज्वाळा आहे. ती सारखी चेतत आहे आणि जगभर घरोघरीं सुखी जीवांना होरपळून काढत आहे. ह्या ज्वाळेच्या तावडींतून, मला नाही वाटत, कोणी सुटत असेल. प्रत्येक माणसाला या नाही त्या कारणानं अश्रु ढाळण्याचा प्रसंग येतोच. ही ज्वाळा प्रत्येक माणसाचं हृदय जाळून काढते. कोठे कायमचं वेड लागलेलं माणूस, कोठे कोणी अक्षय बिछान्याला टेकलेलं, कोठे अपघातानं विकृत झालेलं मनुष्य घरचं आनंदमय वातावरण उदास करून टाकतं; तर कोठे भर तारुण्यानं मुसमुसलेला वडीलधाऱ्या माणसांच्या उरल्यासुरलेल्या आयुष्याचा आधार एकाएकी गळून पडतो, आणि भरल्या घरची घडी विसकटून टाकतो.

आणि हा घाला इतका अनपेक्षित, अचानक आणि जिव्हारीं असतो कीं, त्यामुळं आणखीन कित्येक जीव आयुष्यांतून संपूर्ण उठतात.

तरीपण मला कौतुक वाटतं माणसाच्या आशावादीपणाचं. इतक्या यातना भोगाव्या लागतात, इतकीं दु:खं अनुभवावीं लागतात, इतक्या हृदयाला भेगा पडतात; तरी पण तो आयुष्याशी झगडत असतो, दु:खाला निर्भयपणें तोंड देत असतो—अनेक अडचणींना केव्हा केव्हा पुरून उरतो, दुस्तर परिस्थितीला न डगमगतां तोंड देऊन, हृदय खचलं, शरीर सामर्थ्यहीन झालं, तरी आसवं गिळून बळेंच हंसतो.

लहानपणींचं मुलांचं हसणं निराळं. तें मनोहर, मुग्धमधुर आणि दिलसाफ असतं. पण आयुष्याच्या धकाधकीच्या दिव्याला तोंड देऊन खिळखिळा झालेला मनुष्य हासतो तेव्हा त्या हास्यांत एक प्रकारचा भकासपणा, भेसूरपणा भासतो. त्या म्हाताऱ्या जोडप्याच्या तोंडावर चमकणारं तें विदारक हास्य–त्याची निर्मिति आत्यंतिक दु:ख झाल्यावरच होत असते. आणि असलं हें भयंकर हास्य आपणांला हजारों लोकांच्या चेहऱ्यावर दिसतं. हे चेहरे पाहिले कीं मनुष्यजात दु:ख भोगण्यासाठीच निर्माण झाली आहे, हें पटतं.

पण हें दु:ख भोगतां भोगतांच मनुष्यजात या दु:खाचं निराकरण करण्याचेही प्रयत्न करीत आहे. हें दु:ख कमी करण्यासाठीच शास्त्रज्ञांनी आतापर्यंत अनेक असाध्य रोगांवर रामबाण उपाय शोधून काढले आहेत. अजूनहि त्यांचे प्रयत्न या दिशेनं चालू आहेत. पण माणसाच्या जीवनांतील दु:खरूपी खग्रास ग्रहण नाहीसं होईल का?

हल्लीच मीं एका अमेरिकन पुस्तकांत एक गोष्ट वाचली. इजिप्तमध्ये एका अगदी गरीब घराण्यांतील एका मुलीस असाध्य रोगानं पछाडलं. तेथील एका चिकित्सक डॉक्टरानं ती मुलगी

तपासल्यानंतर त्या मुलीचे प्राण वांचविण्यासाठी रेडियोवर अमेरिका, युरोप व इंग्लंड येथील भिषग्वर्यांना विनंति केली कीं, 'अशी एक मुलगी अशा अशा रोगानं पछाडली आहे. तिला वांचवण्यासाठी मदत करा.'

चोहोकडून विमानानं मदत आली. औषधं, इंजेक्शनं, प्रत्यक्ष डॉक्टरहि इजिप्तला धावून आले. ती मुलगी वांचली. एका घरावरचा दुःखरूपी ढग न कोसळतां आला तसा निघून गेला.

दुःखावर जय मिळविण्यासाठी माणसाची जी धडपड चालू आहे, तिचं ही गोष्ट म्हणजे एक प्रतीक आहे. निदान एका घरचा अंधःकार टळून त्या ठिकाणीं तेजोमय वातावरण पसरलं यांतहि समाधान मानायला हरकत नाही.

असा एक दिवस उगवेल का, कीं ज्या वेळीं त्या इजिप्शियन कुटुंबांतील सुखमय वातावरण सर्व मानव जातीला लाभेल? असा एक दिवस येईल का, कीं ज्या वेळीं 'घरोघरचीं दुःखं' या ऐवजीं 'घरोघरचीं सुखं' या विषयावर एक लेख लिहितां येईल?

डिसेंबर १९४१, यशवंत

*

# एकेकाचा स्वभाव : ४

हिंदुस्थानच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रवास केल्यावर प्रांतांप्रांतांतील लोकांचे जे स्वभावविशेष पहायला सापडतात, ते पाहिले म्हणजे गम्मत वाटते मनुष्यस्वभावाच्या विविधतेची आणि विचित्रपणाची. वास्तविक हिंदुस्थान हें एक राष्ट्र. पण ह्या राष्ट्राच्या विराट स्वरूपामुळं या देशांत हवा-मानाच्या, राहणीच्या, रीतिरिवाजाच्या आणि स्वभावाच्या हजारों छटा दृष्टोत्पत्तीस पडतात. मला वाटतं, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, या देशांतील लोकांच्या 'राष्ट्रीय' स्वभावाचं एक वेळ थोडक्यांत दिग्दर्शन करतां येईल. पण हिंदुस्थानचा राष्ट्रीय स्वभाव–National character–वर्णन करा म्हणून कोणाला सांगितलं तर, बरंच डोकं खाजवूनसुद्धा त्याला समर्पक वर्णन करतां येणार नाही.

वायव्य सरहद्द आणि बलुचिस्तानच्या बाजूला चला. तुम्हांला धिप्पाड, चिवट, ताकदवान्, ताडमाड उंच, हत्तीसारखीं भक्कम माणसं सापडतील. आपल्या देशांत हीं अशीं भव्य बलवान् माणसं पाहून मोठा अभिमान वाटतो. असं वाटतं कीं, युरोपिय-

नांनासुद्धा लाजवतील हीं माणसं त्यांच्या अजस्र प्रकृतिमानामुळं. पण युरोपियनांचा बांधा ह्या लोकांकडे असला, शरीर–सामर्थ्य असलं तरी युरोपियनांचं बुद्धि–सामर्थ्य, त्यांची अभिरुचि, त्यांची शास्त्रपारंगतता, त्यांची सुसंस्कृतता यांच्यांत नाही. इथून तिथून हे लोक अडाणी आणि आडमुठे. हे लोक बोलण्यांत ताठर, डोक्याचे गरम, पांच मिनिटांत हमरीतुमरीवर येणारे, प्रत्यहीं सहजासहजीं खून करणारे असे आहेत. पण 'राष्ट्र' म्हणजे काय याची यांना कल्पना नाही. जुटीनं यांच्या हातून काम होणं अशक्य. आणि बिघडले म्हणजे स्व व पर प्राणांवर उदार असले तरी 'शौर्य' म्हणजे काय याची यांना सुसंस्कृत कल्पना नाही. म्हणूनच सामुदायिकरीत्या परकीयांच्या नेतृत्वाखाली हे कदाचित् पराक्रम गाजवितील, पण एकांडे शिलेदार या नात्यानं यांच्या हातून अरेरावीच जास्त व्हायची; व शौर्याऐवजीं हकनाहक प्राणहानी मात्र वाटेल तेवढी.

सर्वसाधारणरीत्या पंजाब्यांबद्दलसुद्धा असंच म्हणतां येईल कीं, सामुदायिकरीत्या ते पट्टीचे शिपाईगडी आहेत, पण वैयक्तिकदृष्ट्या साधारणतः प्रत्येक पंजाबी भित्रा असतो. तसं बघायला गेलं तर सुदृढ प्रकृतीबद्दल यांनाहि ईश्वरी वरदान. पण वैयक्तिक कृतींत हेहि नबळेच. मात्र वायव्य सरहद्दीकडील लोकांपेक्षा पंजाबी केव्हाहि जास्त सुसंस्कृत, आणि वागणुकीला बरेच बोजड असले तरी तसे मिठ्ठास. भडक रंगाची यांना फार आवड. 'अनारकली'तून तुम्ही फेरफटका करा नाही तर मॉलरोडवर एक चक्कर मारा. तुम्हांला भडक रंगाचे पोशाख घातलेले देखणे पुरुष आणि आकर्षक साड्या नेसलेल्या सुंदर स्त्रिया इतस्ततः फिरतांना दिसतील. वेषभूषेची अजब आवड

आहे या पंजाब्यांना. तसे खाण्यापिण्याच्या बाबतींत तुम्हांला कधीहि हार जाणार नाहीत हे लोक. खातील त्या जिनसा फक्कड असायच्याच हमखास. लज्जत खुमासदार आणि दर्जाहि एकदम उत्तम. पंजाब्याकडे तुम्ही कधींहि जा, त्याचा आग्रह खात्रीनं असायचाच—'कांही तरी खाऊन चला.' पंजाब्यांची बुद्धिमत्ता तशी कमीच, पण धूर्त अगदी पहिल्या प्रतीचे. आपला डाव साधण्यासाठी वाटेल तो फासा टाकतील. प्रसंगीं धाकदपटशाहि करतील. वागणूक बरीच बोथट. आचारांत सुसंस्कृतता फारशी सापडायची नाही, आणि साध्या गोष्टीवरूनसुद्धा वर्दळीवर यायला यांना उशीर लागत नाही. हिंदुस्थानच्या दृष्टीनं यांच्याकडे पाह्यलं तर, मला वाटतं, असंच म्हणावं लागेल कीं बलूची, पठाण, वगैरे उत्तरेकडील लोकांबरोबर हे पंजाबी आपल्या देशाची लष्करी सेवाच उत्तम रीतीनं करूं शकतील. उद्या हिंदुस्थानचा स्वराज्य-लढा सशस्त्र लढण्यांत आला तर या उत्तर हिंदुस्थानांतील लोकांनाच आपल्या जिवाचा होम करावा लागेल आणि हेच लोक तो होम अद्वितीय शौर्य गाजवून करूं शकतील.

संयुक्त प्रांतांत तुम्ही आलांत कीं तुम्हांला सनातनी वातावरण दिसून येईल. या सनातनत्वांत अर्थात् ढोंग हें आहेच. चांगलीं विद्वान माणसं सुद्धा या प्रांतांत जुनाट रूढींना चिकटून राहिलेलीं दिसतात. त्यामुळं परकीयांना समाधानकारक आदरातिथ्य मिळणं कठीण. लोक अतिशय लाघवी आणि छद्मी. यांच्या अंतःकरणाचा ठाव लागणं कठीण. कांही शहरांतील अपवाद सोडून दिले तर स्त्रिया बहुतांशीं अगदी अज्ञान

आणि मागासलेल्या आहेत. यामुळं केव्हा केव्हा ह्या संयुक्त प्रांतांतील कांही लोक बरेच विकृत भासतात. बऱ्याच जणांची पद्धत ही कीं स्वार्थ साधण्यासाठी ते तुमच्या गळ्यांत पडतील, पण झीज मात्र फारशी सोसणार नाहीत. आधुनिकत्व यांच्यांत अजून फारसं शिरलेलं नसल्यामुळं दिसायला हे फारच गबाळे दिसतात आणि त्यांत पानाच्या अखंड रवंथामुळं जास्तच विद्रूप भासतात. बुद्धीची चमक चांगल्यापैकीं, धंदा-रोजगारांत महान् उद्योगी, एका दृष्टीनं फारच धार्मिक—पण यांच्या कृतींत मात्र यांचा धर्म बहुधा सापडायचा नाही. यांचं जेवणखाण फारसं चवदार नाही. सणासुदीच्या दिवशीं घरीं मिष्टान्नं बनविण्याऐवजीं हे लोक बाजारी मिठाई आणून त्यावर हात मारतील. बोलण्यांत 'तकल्लुफ' जास्त. अगदी गार करतील तुम्हांला गोड शब्दांचा वर्षाव करून. पण हा सुक्या शब्दांचा मार. त्यांत बिलकूल ओलावा नाही—अंत:करण नाही.

त्या मानानं बंगाली लोक अंतःकरणाचे मोठे चांगले. यांचा आत्मा काव्यमय, बुद्धीची चमक दांडगी, आणि अंत:करणाचा उमाळा त्याहूनहि श्रेष्ठ. त्यामुळंच नवीन कांही चळवळ सुरू झाली कीं आपल्या देशांत तिचं जोरकस आंदोलन प्रथमतः बंगाल्यांत दृष्टोत्पत्तीस येतं. बंगाल्यांत उत्कट संवेदना, अंत:करणाची ऊर्मिलता, ओज, स्वार्थत्यागाची स्वयंस्फूर्त पराकाष्ठा, बुद्धीची विद्युत्-प्रभा, इतर प्रांतांपेक्षा जास्त प्रकर्षानं दिसून येतात. तसे लोक विलासप्रिय, कलाप्रिय आणि आलस्यप्रियहि; पण वेळ आली तर वाटेल तें दिव्य करतील.

बंगाल्यांत वरचा वर्ग बेफाट पुढे गेलेला तर खालचा वर्ग कमालीचा मागे राहिलेला आढळतो. हा खालचा वर्ग म्हणजे मध्यम

स्थितींतला वर्ग असल्यामुळं या वर्गांत एक प्रकारचा दिखाऊपणा आणि कर्मठपणा दिसून येतो. साधारणतः लोकांची प्रवृत्ति मात्र शिक्षणाकडे आणि आधुनिकतेकडे. या पुरोगामीपणामुळंच बंगाल उद्योगधंद्यांत, शिक्षणक्षेत्रांत, शास्त्रीय शोध वगैरे बाबतींत आघाडीवर आहे. लोक दिसायला गबाळ, बलूनसारखे फुगलेले आणि तोंड फुगवून बोलणारे. खाण्यापिण्याच्या बाबतींत आधाशी, नेहमी बुरसलेले, आणि पान-तंबाखू वगैरे व्यसनाला लालचावलेले.

सिंधवर पंजाबची सावली पडली आहे. पंजाब्यांसारखेच हे लोक मिष्टान्न आणि भडक रंगाचे भक्त आहेत. पण पंजाबची क्षात्रवृत्ति मात्र यांच्यांत फारशी नाही. हे व्यापारी बच्चे आहेत. व्यवहारज्ञानांत पटाईत आहेत. व्यापारासाठी वाटेल तें साहस करणारे लोक आहेत. दिसायला पंजाब्यांसारखेच गाजरासारखे. खाण्यापिण्याच्या बाबतींत भीमाचा आहार आहे यांचा. जवाहीर, रेशमी कापड आणि Curios हा धंदा जवळ जवळ यांच्याच मक्त्याचा. व्यापारी क्षेत्रांतील एका विशिष्ट मार्गानं त्यांची सरशी सोडली तर त्यांच्याबद्दल विशेष कांहीच लिहितां येण्यासारखं नाही.

व्यापारी वृत्तीचे यांच्या जोडीचे भाईबंद म्हणजे गुजराथी-काठेवाडी लोक. मला तर नेहमी असं वाटतं की सगळ्यांत बिलंदर लोक हिंदुस्थानांत असतील तर ते हे होत. व्यापार यांच्या पांचवीला पूजलेला आहे. मधुर वाणी ही यांना ईश्वराची खास देणगी आहे. यांच्या स्वभावांतील लवचिकपणा कांही विलक्षण आहे. व्यवहाराला हे लोक हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि प्रांतांतील लोकांना हार जाणार नाहीत. गुजराथी सोळा वर्षांचं पोर घ्या. त्याला व्यवहार चांगला कळतो. कोठे 'लग्गा' साधतां येईल तें फार चांगलं समजतं. या गुजराथी-

काठेवाडी लोकांच्या अभूतपूर्व व्यापारी मर्दुमकीनं त्यांनी जी लक्ष्मी जवळ केली आहे तिच्या जोरावर ते इतर क्षेत्रांतहि तेजस्वीपणें चमकूं लागले आहेत. त्यांच्या व्यापारी मर्दुमकीच्या जोरावर राजकारण त्यांच्या हातांतलं बाहुलं बनून बसलं आहे. मला गुजराथी–काठेवाडी लोक फार आवडतात. कारण व्यवहाराला ते छान. दोन शब्द ऐकून घेतील, दोन शब्द बोलतील; पण सौदा कधीच बिघडविणार नाहीत. यांचा स्वभावहि असा घडलेला आहे की, ते कुठल्याहि प्रकारची आढ्यता मिरविणार नाहीत. नेहमी आपल्याकडे कमीपणा घेतील, लाचार बनतील; तुम्हांला खूष ठेवण्याचे निरनिराळे मार्ग शोधून काढतील. तुमच्यावर अनेक उपकार करून ठेवतील. तुम्हांला पटेल ती भाषा बोलतील. आणि शेवटीं जें 'ध्येय' साधायचं तें साधतील. गुजराथ्याची चिकाटी अजब आहे. आणि त्याची व्यापारी वृत्ति तर अगदी पहिल्या प्रतीची आहे. गुजराथी, काठेवाडी धर्माला विसरत नाही, पण वेळ आली तर धर्माला बगल मारायलाहि कमी करीत नाही. त्याला यशापयशाची कदर वाटत नाही. तो जास्तींत जास्त पैसा कसा मिळेल यासाठी दाही दिशा प्रयत्न करतो. मिळाला डल्ला तर ठीकच आहे, नाही तरी निराश न होतां पुन्हा प्रयत्न चालूच. गुजराथी लोक लक्ष्मीचे इतके अतर्क्य आणि अगम्य खेळ खेळतात कीं त्याबद्दल कल्पना करणंहि शक्य नाही. हे लोक लाखो रुपये कमावतात, हजारो घालवितात. पण पैसा गेला म्हणून त्यांचा तोल सुटत नाही. त्यांचा 'नवा डाव' सुरू असायचाच.

रंगेलपणाहि यांच्यांत भरपूर आहे. घरीं सौख्य, सौंदर्य आणि सुबत्ता असूनहि हे लोक बाहेरख्यालीपणा केल्यावाचून सहसा

राहायचे नाहीत. दिवसभर लक्ष्मीचे खेळ खेळून मेंदूची जी पिळणूक झालेली असते, डोक्याला जो शीण आलेला असतो, तो घालविण्यासाठी कांहीतरी आडवाट पत्करल्याशिवाय त्यांना मानसिक शांतता आणि स्थिरता मिळत नसेल, त्याला ते तरी काय करणार ? 'दिवसभर सट्टेबाजी केल्यानंतर जी सायंकाळीं ग्लानी येते ती आम्हांला वेड्यापिशासारखी करून टाकते', असं मला कित्येक भाटिया दोस्तांनी सांगितलं आहे. ह्या ग्लानीला औषध एकच–बाहेरख्यालीपणा. पण त्यामुळं यांच्या घरच्या व्यवहारांत अंतर पडतं असं मात्र नाही. कौटुंबिक सुखाच्या आड या मंडळींचा बाहेरख्यालीपणा कधीच येत नाही.

खाली दक्षिणेकडे गेल्यानंतर एकच गोष्ट मनाची पकड घेते. ती म्हणजे दक्षिणेकडच्या लोकांची बुद्धिमत्ता. त्रावणकोर, कोचीन, मद्रास,–कुठंहि तुम्ही दक्षिणेकडचा दौरा काढून अवलोकन करा. तुम्हांला दिसून येईल कीं या लोकांचं वैशिष्ट्य म्हणजे त्यांची हुषारी. पण बहुतेक लोक अतिशय हुषार असून-सुद्धा अल्पसंतोषी. पांचपंचवीस रुपये मिळाले कीं यांना आनंद. बहुतेकांचा धंदा म्हणजे नोकरीपेशा. नोकरीसाठी सर्व देशभर वणवण करीत फिरतील. हे दक्षिणेकडील लोक कुठं सापडत नाहीत ? उत्तरेकडे, दक्षिणेकडे, पश्चिमेकडे, पूर्वेकडे, कुठंहि जा– त्यांनी सारा देश व्यापून टाकला आहे. राहणी अगदी साधी– फारच गरिबीची, महात्त्वाकांक्षा एवढीच की आपल्या ऑफिसांत वर वर चढायचं, पै पै करून पैसा साठवायचा, नोकरी करायची, पोट भरायचं. विलक्षण काटाकाट करून पैसा जोडायचा हें साधारणतः दक्षिणेकडील प्रत्येकाचं ब्रीद असतं. या नोकरीच्या विलक्षण वेडामुळं त्यांनी आपल्या उत्तम बुद्धिमत्तेचा खरोखरीच

दुरुपयोग केला आहे. स्वाभिमान, महत्त्वाकांक्षा यांना आपल्या आयुष्यांत चाट दिल्यामुळं त्यांच्या हातून 'आपला अतिआज्ञाधारक सेवक' यापलिकडे भरीव अशी कांहीच कामगिरी होत नाही.

राहतां राहिला आमचा महाराष्ट्र समाज. हा माझाच समाज असल्यामुळं मला या समाजाचे गुण दिसण्याऐवजीं दोषच प्रकर्षानं दिसतात. आमच्यांत आकुंचितपणा फार. कोणांत मिसळायला नको आम्हांला. आम्ही आमच्या–आमच्यांतसुद्धा मिसळत नाही. आमच्यांत छिद्रान्वेषी दृष्टि जास्त. एकी नाही, एकमेकाला एकमेकांची मदत नाही, जो तो आपआपला सवता सुभा सांभाळणार.

दुसऱ्या प्रांतांतील एक गृहस्थ एकदा महाराष्ट्रांतून फिरत होता. मीं त्याला विचारलं 'काय हो, कसे काय वाटतात आमचे महाराष्ट्रीय आपल्याला ?'

तो म्हणाला—

"महाराष्ट्राच्या शीलाबद्दल मला आदर वाटतो. त्याची कर्तृत्वशक्ति अगाध आहे. बुद्धिमत्ताहि चांगल्यापैकी आहे. पण माफ करा हं मी स्पष्ट बोलतों म्हणून, मला महाराष्ट्रीय माणूसघाणे वाटतात. ते तर्कट, चिकित्सक फार आहेत. निंदा करण्यांत त्यांचा फार वेळ जातो आणि विधायक कार्याऐवजीं विघातक बुद्धिच त्यांची जास्त. गोडपणा त्यांच्यांत बिलकूल नाही. विलक्षण घुमे. हेंच पहा ना—गाडींत, बसमध्ये भेटले कीं त्यांच्याशी आम्ही बोलणार तेव्हा हे तुटक तुटक आमच्याशी

बोलणार. गम्मत म्हणून सांगतों—महाराष्ट्रीय भेटला आणि त्याची ओळख झाली कीं साधारणत: ठराविक प्रश्नाची तो सरबत्ती करतो. पहिला प्रश्न—' काय, आपण कोठे असतां नोकरीला ?' उत्तर—' आहे अमुक तमुक ठिकाणीं '. दुसरा प्रश्न—' काय मिळतं आपणांला ?' उत्तर—' मिळतात शे दीडशे '. तिसरा प्रश्न—' कांही मागं टाकतां कीं नाही ?' उत्तर—' हो तर, पांच -पंचवीस रुपये पडतात बँकेंत '. चौथा प्रश्न—' ठीक, ठीक. कांही मुलंबाळं ?' उत्तर—' आहेत तीन चिल्लीपिल्लीं '. ' छान !' —संपला इथं Social Contact. पुढे गृहस्थ तोंड फिरवून तरी बसेल नाही तर निघून तरी जाईल.

" समाजांत वावरतांना बोलण्याची ही कांही पद्धत नव्हे, असं मला तरी वाटतं. संभाषणाची कला तुमच्यांत अगदी नाही बुवा. आगगाडींतून जातांना जेव्हा मला डोंगराचे सुळे–त्यावर झाड नाहीं पाड नाही, हिरवेपणा नाही–वरवर आकाशांत गेलेले दिसतात तेव्हा मला महाराष्ट्रीयांची आठवण येते. या सुळक्यासारखं महाराष्ट्रीयांचं जीवन आहे. ते कसे ताठर, सुळसुळीत, बेदरकार दिसतात; तसेच महाराष्ट्रीय ताठर, अगदी साधेसुधे आणि बेदरकार वाटतात मला. त्या सुळक्यांची जशी भीति वाटते, ते सुळके जसे ऊनपाऊस–झंझावाताला तोंड देऊन टिकतात तसेच तुम्ही महाराष्ट्रीय आयुष्यांतील ऊन, पाऊस, झंझावात यांना तोंड देऊन मोठ्या प्रामाणिकपणें दिवस काढतां. पण मजा नाही तुमच्या आयुष्यांत. रंग नाही तुमच्या जीवनांत. मिठ्ठासपणा नाही तुमच्या बोलींत. ओलावा नाही तुमच्या हृदयांत. सारं रखरखीत जीवन तुमचं.'

असा आहे एकेका प्रांतांतील स्वभावाचा नमुना. प्रांताप्रांतांतील स्वभावांत किती हें वैचित्र्य आहे, किती विविधता आहे! इंद्रधनुष्यासारखे सगळे रंग आहेत या स्वभावांत. या विविधतेच्या आणि वैचित्र्याच्या बाबतींत फक्त अमेरिकेशीच आपल्या देशाची तुलना करतां येईल. अमेरिकेंत याहून अधिक सांपडतं तें म्हणजे नागरिकत्वाच्या जबाबदारीची ओळख आणि विशिष्ट महत्त्वाच्या प्रसंगीं एकी. ह्या गोष्टींची मात्र आपणाकडे विशेष वाण वाटते. या गुणांचं आमच्यांत योग्य संवर्धन होईल तो सुदिन होय.

ऑक्टोबर १९४१, यशवंत

★

## खादाड लोक : ५

मला 'भोजनभाऊ' भेंडे म्हणतात. लोकांनी ही पदवी मला बहाल करून जो माझ्यावर अनुग्रह केला आहे त्याबद्दल मला फार आनंद वाटतो. रुचकर आणि स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद मन:पूर्वक घेतां येणं हा एक मी सद्गुण समजतों. हा सद्गुण माझ्यामध्ये प्रकर्षानं आहे याबद्दल मला नेहमीच अभिमान वाटतो. भोजनभाऊंच्या जागतिक चढाओढींत कदाचित् मला शेवटचाहि नंबर मिळायचा नाही. पण माझ्या दृष्टीनं माझे 'विक्रम' कांही वाईट नाहीत.

मी एकदा तब्बल चोवीस कप मसाल्याचं दूध प्यालों आहे. एका प्रसंगीं लागोपाठ दोन तासांच्या अंतरानं मिष्टान्नाचं जेवण मनस्वी जेवलों आहें. तें असं झालं—एका गांवीं एकाच दिवशीं जेवणाची दोन आमंत्रणं घेतलीं गेलीं. त्यांपैकी एके ठिकाणीं येत नाही म्हणून सांगायचं राहून गेलं. पहिल्या ठिकाणचं भोजन यथास्थित झाल्यानंतर दुसरीकडच्या जेवणाची आठवण आली. दुसऱ्या ठिकाणीं दीड तास उशिरा जाऊन पोहोचलों. त्या घरची सगळी मंडळी खोळंबून राहिली होती. मला म्हणवेना

'मी जेवून आलों आहें' म्हणून. बसलों पानावर आणि केली सुरुवात. अस्सा जेवलों, अस्सा जेवलों की कांही पुसूं नका. तसंच, एकदा माझ्या विद्यार्थिनींपैकीं एका बहिणींच्या त्रिकूटानं असं गोड रुचकर जेवण मला दिलं, परत परत वाढण्याची इतकी कमाल केली, इतका अत्याग्रह केला कीं त्या दिवशीं मी एकाद्या धंदेवाईक भोजनभाऊसारखा जेवलों. माझ्या आहाराचा तो प्रचंड प्रकार पाहूनच कीं काय, मला या भगिनी–त्रिकूटानं पुनश्च कधीच जेवायला बोलावलं नाही.

मला हें कबूल आहे की, माझे हे भोजनी विक्रम यथातथाच आहेत. मण माझ्या स्वतःच्या दृष्टीला अजब वाटते ही भोजनी करामत. नुकताच एका गृहस्थाचा मीं स्वतःच्या डोळ्यांनी जो अगडबंब आहार पाहिला आहे, त्यामुळं मी म्हणजे दर्यामें खसखस आहे असं मला वाटायला लागलं आहे. पण मी पट्टीचा नसलों तरी साधारण भोजनभाऊ आहें यांत मला अभिमान वाटतो.

परवा आमच्या नाथाशेटनी कमालच केली. ते व माझे आणखीन कांही मित्र बाहेरगांवाहून मुंबई बघायला आले होते. म्हटलं, यांना एक नवा अनुभव द्यावा. म्हणून मीं त्यांच्यासाठी एका हॉटेलांत खाना ठरविला. तिथला एकंदर थाटमाट पाहून मंडळी बेहद्द खूष झाली माझ्यावर. चांदीच्या ताटांत सुग्रास अन्न वाढून आलं तेव्हा तर पाणी सुटलं सगळ्यांच्या तोंडांना. आणि मग या पठ्यांनी असा जोर मारला कीं एका दमांत २५–२५ पुऱ्या आणि चार चार वाट्या श्रीखंडाचा चट्टामट्टा केला. 'जेवण फारच बहारदार झालं आहे!' एक मित्र उद्गारले.

'हा, हा! जेवण लय च्यांगला झाला आहे,' नाथाशेट म्हणाले, 'पण भेंडेशेट, हे हॉटेलवाला किती पैसा घेते एक पात्राचा?'

मी म्हणालों, 'नाथाशेट, दीड रुपया घेतला माणशीं ह्या हॉटेलवाल्यानं.'

हे शब्द कानीं पडल्याबरोबर नाथाशेटनीं 'ये बॉय' करून पंचमांत हाक मारली. मी 'काय झालं' म्हणून विचारलं. पण नाथाशेट मला उत्तर देतात कशाला? बॉय आल्याबरोबर ते त्याच्याशी बोलूं लागले.

'अरे काय, आम्हीं अजून ८ आण्याचा बी जेवलों नाय. परत समदा घेऊन या. दोड दोड रुपया तुमाला देवाचा हाय. बघते काय, लवकर जावा आणि समदा आणा.'

माझं तरी पोट पूर्ण भरलं होतं. पण या नाथाशेटनी पुन्हा अस्तन्या वर चढविल्या. धोतराच्या गांठी सैल केल्या. त्यांच्या मित्रांनी सुद्धा पुनश्च हात मारायच्या उद्देशानं हात वर चढविले.

कमाल केली नाथाशेटनी आणि त्यांच्या मित्रांनी. पुन्हा प्रत्येकानं ९०–९० पुऱ्या घेतल्या. श्रीखंडाच्या भरभरून ७–८ वाट्या झाल्या प्रत्येकाच्या. शेवटीं, मालक श्रीखंडाचं रितं भांडं घेऊन आला व मोठ्या अदबीनं म्हणाला—

'साहेब, माफ करा. माझ्याकडचं श्रीखंड संपलं आहे. पण थोडा वेळ बसत असाल तर मी आणखीन् श्रीखंड बाजारांतून आणवतों. आपल्याला पूर्ण समाधान होईपर्यंत वाढणं हें माझं कर्तव्य आहे.'

मींच म्हटलं, 'नाथाशेट, पुरे आतां. जेवतच बसला तर पुढला कार्यक्रम चुकेल'.

'अरे चुकला ते चुकला. साला अजून रुपायाबी वसूल झाला नाय आणि तमे चालला कोठे?'

शेवटीं नाथाशेटना अजीजीच्या विनवण्या केल्या तेव्हा शेटजी नाइलाजास्तव उठले व त्यांनी हात धुतले. पण सारा वेळ त्या दिवशीं आणि त्यानंतर बरेच दिवस शेटजींचं पालुपद चालू होतं–'साला दोड रुपया घेते पण आमी एक रुपयाच्या बी खाल्ला नाय.'

शेटजींच्या हुकमी जठराग्नीबद्दल मला खरोखरीच आदर वाटला. पण शेटजींसारखे पट्टीचे खाणारे हे आमच्यांतले अपवादात्मक लोक होत. उलट तुम्ही पंजाबांत चला. सरास सारे लोक तुम्हांला खादाड दिसतील. साधारणत: प्रत्येक पंजाबी सकाळीं उठला कीं मुखमार्जनादि विधि आटोपल्यावर चांगली अर्धा शेर लस्सी मारून येईल. मग आठ–नऊ वाजतां चांगले जाडजूड पाव, चापूनचोपून लोणी लावून, खाईल. बरोबर अर्थातच ७–८ अंडीं. मग दोन प्रहरीं एकपर्यंत जें मिळेल तें चापायचं. तहान लागली तर फळांचा रस प्यायचा. एक वाजतां कोफ्ता, खिमा, अथवा मुरगीची लैलूट. बरोबर चांगल्या लठ्ठ लठ्ठ चपात्या. पुन्हा चारला भरभक्कम चहा व बिस्किटं, नाहीतर मासे; पुन्हा हवीं असलीं तर अंडीं. फिरायला गेलं तर पुन्हा चरणं सुरूं. रात्रौ घोस, बिरयानी, सब्जी आणि 'कुछ मिठ्ठी चीज.' कुठल्याहि पंजाब्याच्या घरीं कधीहि जा, तो तुम्हांला 'कांही खातां का?' म्हणून विचारील. अमृतसरला आम्ही एका रेल्वे ऑफिसराकडे गेलों. गृहस्थ संध्याकाळीं चार वाजतां अंडीं खात बसला होता. अंडीं तर आम्हांला त्यांनी दिलींच; पण त्याबरोबर हलवे, पेढे, डाळ व शेव खायला घातली. त्यानंतर आम्ही

फिरायला गेलों. या साठी उलटलेल्या म्हाताऱ्यानं रस्त्यांत दोनदा अंडीं विकत घेतलीं, आपण खाल्लीं आणि आम्हांला खायला घातलीं. पंजाबचा महिमा वर्णायचा म्हणजे खायच्या जिनसांची सहस्र–नामावलि तुम्हांसमोर सादर करावी लागेल.

चवदार अन्न मिळालं कीं पंजाबी गृहस्थाला नाही तिथची भूक लागते. एकदा अमृतसरला सुवर्णमंदिर पाहण्याकरता आम्ही गेलों. मुंबईचे आम्ही दोघे होतों, आणि वाटाड्या म्हणून एक पंजाबी मित्र आमच्याबरोबर होता. दोन प्रहरीं एका शीख सरदारजींच्या 'ख्याम' नामक सुप्रसिद्ध हॉटेलला उदार आश्रय द्यायचं आम्हीं ठरविलं. प्रथमत: आमचे पंजाबी दोस्त नको नकोच म्हणत होते. पण जेव्हा सरदारजींच्या माणसानं 'खिमा, कोफ्ता आणि गुडदाकपुरा' आणून ठेवला आणि दोन घांस घेतल्यावर त्या सर्व पदार्थांची जेव्हा लज्जत कळली, तेव्हा आमच्या पंजाबी दोस्तानं खाण्याचा सपाटा सुरू केला. सगळे जिन्नस त्यानं सहा किंवा सात वेळां मागविले. जवळ जवळ चाळीस चपात्या हजम केल्या. लाहोरला जेव्हा आम्ही परत आलों तेव्हा हा भट्ट जेवून इतका तट्ट झाला होता कीं गाडींत तो हातपाय ताणून निश्चेष्ट पडला.

दुसऱ्या दिवशीं स्वारीला अपचन होऊन चांगला सडकून ताप भरला. आम्हीं म्हटलं त्यांना, 'साहेब, एवढं भरण्याची काय जरूरी होती?' तर साहेब म्हणतात, 'ताप आला आणखी अपचन झालं म्हणून काय झालं? असा बिछान्यांत दोन महिने लोळेन पाहिजे तर, पण 'ख्याम' सारखं रुचकर अन्न मिळेल तर मागंपुढं पाहणार नाही आडवाउभा हात मारायला केव्हाहि, कधीहि आणि कुठंहि. आत्म्याला जशी आध्यात्मिक अध्ययनानं

शांति मिळते तशी शरीराला सुग्रास अन्न-सेवनानं शांति मिळते. माझ्या शरीराला व्यथा होत असली तरी कालच्या खाण्यानं जिह्वा मात्र पूर्ण समाधान पावली आहे.'

शारीरिक व्यथा होईपर्यंत खावं या मताचा मी नाही. अथवा अतिसेवन करावं असंहि माझं मत नाही. पण उत्तम अन्न मिळालं तें पोटभर जेवावं असं मला वाटतं. असे बरेच दुर्दैवी लोक मी पाहिले आहेत कीं त्यांना जेवण म्हणजे दिव्य वाटतं. कसं तरी ही मंडळी जेवतात आणि पानावरून उठतात. कित्येकांना असे चमत्कारिक रोग असतात कीं त्यांच्या पोटांत अन्न ठरणं कठीण. कसाबसा हे आपल्या आयुष्याचा गुजारा करीत असतात. असा एक इसम मीं पाहिला आहे कीं तो कुठंहि जेवायला गेला तरी आपली घरची शिदोरी बांधून न्यायचा आणि ती आपल्या मित्रांच्या पंक्तीला बसून खायचा. असलं हें जिणं व्यर्थ होय. ऐहिक यात्रेंत माणसाला जीं अनेक सुखं भोगायचीं असतात नी निरनिराळे आस्वाद घ्यायचे असतात, त्यांतील सुग्रास अन्न हें महत्त्वाचं सुख आहे आणि स्वादिष्ट अन्नाचा आस्वाद हा महानुभव आहे. तो ज्याला मिळत नाही तो मनुष्यकोटींत येऊन फुकट आहे.

खाण्याचे पदार्थ अगणित आणि आयुष्य फार थोडं म्हणून रोमन लोक जेवले रे जेवले कीं मुद्दाम ओकारी काढीत आणि पुन्हा पुन्हा मिष्टान्नावर हात मारीत. हा अतिरेक अर्थातच बरा नाही. पण फ्रेंच लोकांचा किस्सा खरोखरीच गिरविण्यासारखा आहे. हे लोक खाण्यापिण्याच्या बाबतींत मोठे चोखंदळ. तब्बल दोन तास जेवत बसतील, समोर आलेल्या पदार्थांच्या रुचीबद्दल तात्त्विक वादविवाद करतील, नवनवीन भोजन-पदार्थ काय काय

असावेत याबद्दल आपला बहुमोल वेळ खर्च करून विचार करतील. एकाद्या शास्त्रीय शोधकाचं कौतुक करणार नाहीत, पण खाण्याची कोणी नवीन चवदार चीज तयार केली तर त्या स्वयंपाक-विशारदाचा पुतळा सुद्धा उभा करतील! असला हा रसग्राहीपणा आपणां सर्वांमध्ये पाहिजे. असा रसग्राहीपणा, अशी उत्तम-भोजन सेवनाची इच्छा असणं ही सतेज सशक्त शरीराची आणि चैतन्यमय मनाची साक्ष आहे.

खादाडपणाचा गुण आपल्या अंगीं असला तरी त्याबद्दल फाजील अभिमान असणं मात्र वाईट. या अभिमानामुळं केव्हा केव्हा फटफजिती होण्याची वेळ येते. पेशावरचं आमचंच उदाहरण घ्या. एका मुसलमानी हॉटेलांत आम्ही उतरलों. पंजाबी लोकांचा आहार आम्हांला माहीत. पेशावरी त्यांच्यापेक्षाहि मजबूत आणि आडदांड. यांचा खुराक दांडगा असणार यांत शंका नव्हती. पण पंजाबी वातावरणांत जास्त दिवस काढले म्हणून कीं काय न कळे, आम्हांला वाटलं, आम्ही कांहीहि हजम करूं.

म्हणूनच हॉटेल बॉय जेव्हा 'आपण मद्रासी आहांत काय? डाळ–चावल आणूं का?' असं म्हणाला तेव्हा मी त्याच्यावर भडकलों. मद्रासी म्हणजे भातखाऊ; ती मला शिवी वाटली.

'मग काय आणूं?' म्हणून पुनश्च जेव्हा त्यानं पृच्छा केली तेव्हा, 'काय काय खाना तयार आहे?' म्हणून मीं त्याला दरडावून प्रश्न केला. त्यानं अनेक प्रकार सांगितले. पण मला त्यांतलं अवाक्षर देखील समजलं नाही. एका पंजाबी गृहस्थानं पेशावरांत गेल्यावर कोवळ्या बकऱ्याचं 'बर्रा' मटण

खा म्हणून सांगितलं होतं म्हणून मी दोन प्लेट 'बर्रा' मागितला, 'सब्जी' सांगितली दोन तीन प्लेट. 'चपाती किती आणूं ?' म्हणून पोऱ्यानं विचारलं. 'आण एक आठदहा' मी म्हणालों. 'बस्स, एवढ्याच!' पोऱ्या उद्गारला आणि माझ्याकडे बघून मिस्किलपणें हसायला लागला. मला त्याच्या हसण्याचं इंगित समजलं. आठ दहा चपाती दोघांना मिळून म्हणजे कागदी पेहेलवान वाटलों आम्ही त्याला! मी मनांत खजील झालों; पण उसना जोर आणून म्हणालों, 'चलो जाव, जलदी ले लाव'.

पंधरा मिनिटांत आमचा खाना आला. बऱ्र्याच्या प्लेट्सकडे प्रथमतः माझं लक्ष गेलं. वाजवीपेक्षा त्या जास्त भरल्या गेल्या असाव्यात असं मला वाटलं. 'पण आपण संपवूं शकूं' असंहि वाटलं मला. मात्र चपात्यांकडे माझं लक्ष गेलं नी मी सर्दच झालों. पत्रावळी एवढा त्यांचा अजस्र आकार आणि पुन्हा जाडजूड! एक तरी प्रत्येकीं संपेल कीं नाही अशी भीति वाटली मला.

आणि खरोखरीच जेव्हा आम्ही भोजनाला प्रारंभ केला तेव्हा बऱ्र्याची प्लेट प्रत्येकाला पावदेखील खपेना, आणि चपाती—ती अर्ध्यापेक्षा अधिक कोंबतांच येईना पोटांत. माझा मित्र माझ्याकडे टकमक पहात होता. मी त्याच्याकडे पहात होतों. आणि तो पोऱ्या आम्हां दोघांकडे टकमका पहात होता.

आम्ही दोघांनी जेव्हा हात धुतले तेव्हा तो 'बस्स हो गया साब ?' म्हणून म्हणाला आणि पोट धरून हसायला लागला. भोजनसाहित्य उचलून नेतांना सहज त्याच्या तोंडून शब्द निघून गेले 'अभी दाल-चावल लाऊं क्या ?' मी उठलों नी दार बंद करून घेतलं.

पेशावरच्या मुक्कामांत त्या दिवसापासून त्या पोऱ्याचं मिस्किल हास्य कांहीं आम्हांला चुकलं नाहीं. शिवाय, मला वाटतं, आमचा मिताहार त्यानं सगळ्या हॉटेलभर केला होता. कारण दहा दहा चपात्या हजम करणाऱ्या या पेशावरी पठाणांना आमचा अर्ध-चपातीचा आहार पाहून अचंबा वाटत होता. हे जिवंत तरी कसे राहातात याचं त्यांना आश्चर्य वाटलं असावं.

मुंबईचा मी पट्टीचा खादाड, पण पेशावरांत कुचकामाचा ठरलों. चालायचंच. मुंबईच्या भूक मेलेल्या वातावरणांत माझा जठराग्नि नेहमी प्रदिप्त राहतो. आणि माझं पोट जरी पेशावरी मोट नसलं तरी स्वादिष्ट पदार्थाला त्यांत जागा आहे, सुग्रास अन्नावर माझी मोहब्बत आहे; आणि विशेष म्हणजे, माझ्या देशांत मला भोजनी–भेंडे म्हणतात यांत मला आनंद आहे. भीमाची भूक मला असावी म्हणून मी तप केलं तरी या कलियुगांत देव थोडाच प्रसन्न होऊन मला वर देणार आहे? उलट, मी ईश्वराकडे हेंच मागतों कीं स्वादिष्ट पदार्थांची माझ्या जिभेला अक्षय लालसा राहो, खाण्यापिण्याच्या बाबतींत फ्रेंच लोकांसारखा मी सदैव चोखंदळ राहो!

१५ जुलै १९४२, समीक्षक

## विक्षिप्तपणा : ६

मोठीं माणसं जीं असतात त्यांच्यांत विक्षिप्तपणा असतो असा एक प्रचलित सिद्धांत आहे. मला वाटतं, तुम्हा–आम्हा सारख्या लहान मंडळींतहि विक्षिप्तपणा आहे.

हेंच पहा: लहानपणीं ठाकूरद्वारच्या 'काळ्या' 'गोऱ्या' रामाला जातां येतां नमस्कार केलाच पाहिजे ही आमच्या घरच्या वडील मंडळीची आम्हांला शिकवणूक. आज हा देवळांवरचा माझा विश्वास उडाला आहे. पण कित्येक वेळां ट्राम–बसमधून अगर चालत ठाकूरद्वारहून जातांना एकदम हात जोडले जातात. मग लक्षांत येतं, कीं पूर्वीची ही संवय अजूनहि स्वभावांत कायम आहे. ज्या लोकांनी मला हें महत्कृत्य करतांना पाहिलं आहे ते या वर्तनाला विक्षिप्तपणाच म्हणतात. कारण तिन्ही त्रिकाळ मी सगळ्यांना सांगतों–'माझा ईश्वरावर विश्वास नाही.'

माझा एक वकील–मित्र आहे. त्याचा विक्षिप्तपणा औरच. आम्ही फिरायला वगैरे निघालों आणि रस्त्यांत आमच्या या दोस्ताला एखाद्या गलिच्छ माणसाचा धक्का लागला की बिघडला स्वारीचा नूर.

'छे बुवा! या पाप्याचा कुठं आणखी धक्का लागला! कांही त्वचारोगबिग असायचा,' स्वारी उसळून म्हणेल. तशीच तडक घरीं जाईल. चांगली स्वच्छ आंघोळ करील. सर्व कपडे बदलील. साहेबांना असे नेहमी किती वेळां घाणेरडे लोक भेटतात आणि कित्येक वेळां ते आंघोळी करतात. कुठलाहि स्पर्शजन्य रोग त्यांना अजून झालेला नाही. तरी पण भीति मात्र अजून कायम आहे. हा त्यांचा तऱ्हेवाईकपणा आता जाणं कठीण.

कित्येक वेळां लोक असे कांही विचित्र असतात की लोकांत त्यांचं हसं झालं तरी चालेल, पण ते आपला तऱ्हेवाईकपणा सोडत नाहीत. एकदा आम्ही पांच सहा मित्रमंडळी मिळून पुण्याला गेलों. खूप खूप भटकलों. सडकून झोप येऊं लागली रात्रीं अगदी लवकर. मी दिवा मालवला, आणि 'झोपा' म्हटलं सगळ्यांना. तोंच आमच्यांतले विक्षिप्तराव उठले आणि त्यांनी पुन्हा दिवा लावला. म्हटलं, स्वारीला कांही उद्योग करावयाचा असेल. पण अर्धा तास, एक तास झाला तरी दिवा बंद होण्याचं चिन्ह दिसेना. शेवटीं स्वारी घोरायला लागलेली पाहून आमच्या एका दोस्तानं दिवा बंद केला. दोन मिनिटांत स्वारी उठली आणि पुन्हा दिवा लावला. अशी ही उघडझाक कित्येक वेळां झाली. शेवटीं आम्ही या तिस्मारखानांना शिव्या देत देत झोपी गेलों. सकाळीं उठून पाहातों तों दिवा आपला जळत होता. स्वारीला हटकारलं कीं हा काय विचित्रपणा? तर म्हणते–'दिवा नसला तर फार भीति वाटते रात्रींची!' बत्तीस वर्षांचा हा बाप्या आणि काळोखाला भितो! हसतां पुरेवाट झाली त्याचं हें स्पष्टीकरण ऐकून.

एक एक तर असे कांही कमालीचे विचित्र असतात की त्यांचं वर्तन पाहून तोंडांत बोट घालण्याची वेळ येते. एका माझ्या शिक्षक मित्राची एम्. ए. ची परीक्षा जवळ येत चालली होती. त्याला अभ्यास करायचा होता म्हणून त्याची एक शिकवणी त्यानं मला देऊं केली. ही शिकवणी एका वेश्येच्या घरीं होती.

मी म्हटलं, 'अच्छा ! मला चालेल ती शिकवणी. मग उद्या सकाळीं येऊं ? एकदा परिचय करून दे म्हणजे सुरवात करायला बरं पडेल.'

'छे ! छे ! सकाळीं नाही बुवा जमायचं. तिथं सगळ्याच वेश्या राहतात. कुणी आपल्याला पाह्यलं तर आणखी पंचाईत.' शिक्षक महाशय म्हणाले.

मी नुसता हसलों; मनांत म्हणालों–'रात्रीं गेलों तर लोक संशय घेतील कीं दिवसा ?'

शेवटीं, एकदा रात्रीं जायचं ठरलं. निघण्यापूर्वी गुरुजींनी मारुतीच्या तसबिरीला पाच दहा मनःपूर्वक नमस्कार केले.

मी म्हटलं, 'का हो, हे नमस्कार चमत्कार कशाला ?'

ते शिक्षक महाराज म्हणाले, 'ईश्वराची प्रार्थना करतों बाबा, कोणी आपल्याला पाहूं नये म्हणून. माडी चढायची आहे ना ?'

मग साहेबांनी एक पुस्तकाचा गठ्ठा उचलला. मी म्हटलं, 'हा रे बाबा कशाला ?'

तर स्वारी म्हणे, 'लोकांनीं समजावं की मी शिकवणीला जातों म्हणून.'

'शाबास !' मी म्हटलं, 'म्हणजे तुझ्या या गठ्ठयावरून तूं निष्पाप आहेस असा लोक कयास बांधणार वाटतं ? उलट एक विद्वान् मनुष्य सुद्धा वेश्येकडे जातो असं लोक म्हणाले तर !'

'ए बाबा, थट्टा नको करूंस माझी. लोकांनी तर्ककुतर्क करूं नयेत म्हणून मी माझ्या दृष्टीनं योग्य असे स्वसंरक्षणार्थ कांही उपाय योजिले आहेत. तुलाहि कांहीतरी असंच करावं लागेल. नाही तर या वेश्यांकडची शिकवणी करणं मोठं कठीण काम आहे.' शिक्षक महाशय म्हणाले.

माडी चढतांना शिक्षकवर्यांनी माझ्या छातीला हात लावला. मी म्हटलं, 'कां बाबा ?'

तर साहेब म्हणतात, 'धडधडत असेल नाही तुझी छाती ? शिकवणीसाठी माडी चढायची म्हणजे माझ्या तर रोज छातींत धडधडतं.'

मी हसलों नी म्हणालों, 'वा दोस्त! सत्कर्म करायला जातांना जर छाती धडधडायला लागली तर, मला वाटतं, एरव्ही वेश्येकडे जातांना आपली छाती फाटूनच जायची बहुतेक.'

एवढ्यांत आम्ही माडीचा शेवटचा मजला गाठला. विद्यार्थिनीची माझी ओळख करून देण्यांत आली. एकंदर अभ्यास वगैरे किती झाला आहे ह्याची छाननी करून, 'उद्यापासून सुरूं करू या' असं म्हणून आम्ही परत निघालों. त्या घरांतून बाहेर पडतांना, मला वाटतं, एक ओळखीचासा इसम आम्हांला लांबून येतांना दिसला. कदाचित् आपल्या पात्राकडे जात असणार तो. आमच्या मास्तर-साहेबांनी त्याला पाहिला मात्र—मारुतीसारखं त्यांनी उड्डाण मारलं आणि घरीं निघून गेली स्वारी. मी त्यांच्या घरीं गेलों तर साहेब मारुतीचा जप करीत बसले होते.

दुसऱ्या रात्रीं मी शिकवणीसाठी गेलों व त्या दिवशींचं काम संपल्यावर मी म्हणालों, 'उद्यांपासून मी सकाळीं आठला येईन.'

ती विद्यार्थिनी व तिची आई माझ्याकडे 'आ' करून बघूं लागली.

'पण मास्तर, आमच्याकडे येतांना कोणीं बघितलं तर ?' ती बालिश मुलगी म्हणाली, 'आमचे ते सर तर रात्रीशिवाय कधीच यायला तयार नव्हते.'

मी हसून म्हटलं, 'मास्तर, डॉक्टर, यांना कोठेहि कधीहि जायला परवाना असतो. विद्या सकाळची तोंडावर चढते म्हणून मी सकाळचा येणार आहे.'

बरींच मंडळी मीं अशी पाहिली आहे कीं ते तुम्हांला हरहमेशा सांगतील, 'ते अमूक तमूक गृहस्थ आज रस्त्यांतून चालले होते. ढुंकून देखील त्यांनी माझ्याकडे पाहिलं नाही.' कांही म्हणतात, 'आज ते राव रस्त्यांतून चालले होते. त्यांनी मला पाहून मान दुसरीकडे वळविली.' कांहीं तिस्मारखान म्हणतात, 'आज ते अमेक त्या सोम्यागोम्याशी बोलत होते. मी गेल्याबरोबर त्यांचं भाषण बंद झालं. खात्रीनं माझ्या विषयींच ते बोलत होते.'

तुम्ही असल्या इसमांना कितीहि सांगा कीं 'अहो त्या इसमानं तुम्हांला पाहिलं नसेल; अहो, चुकून त्यांनी मान वळविली असेल; खात्रीनं तुमच्याबद्दल ते दोघे इसम बोलत नव्हते,' तरी पण यांचं पालुपद कायम असायचंच. प्रत्यक्ष त्या लोकांनी येऊन जरी यांना शपथेवर सांगितलं 'आपला संशय चुकीचा आहे' म्हणून तरी हे कांही आपलं 'मिरा कहे प्रभू गिरिधर नागर' सोडणार नाहींत.

आणि ऑफिसमध्ये जातांना आपल्या बायकोला टाळून ठेवणारा तुम्ही इसम पाहिला आहे का ? अशा एका माणसाची माझी जानपछान आहे. त्याची कैफियत अशी–'अहो,

आमच्या तिला टाकून ठेवलं, मग काळजी नाही मागं तिचं कसं होईल म्हणून.'

असल्या माणसाचा मात्र तिरस्कार वाटतो. हा विक्षिप्तपणा म्हणजे जवळजवळ माथेफिरूपणा होय. असल्या माणसाला ठाण्याला पाठवून दिलं पाहिजे आधी.

पण वर वर्णन केलेलीं सगळीं माणसं त्यांच्यांतील वैचित्र्यामुळं, विक्षिप्तपणामुळं जास्त आकर्षक वाटतात. मोठीं माणसं त्यांच्यांतील लोकोत्तर गुणांमुळं आपलीं मनं त्यांच्याकडे खेचून घेतात, त्यांच्यांतील तऱ्हेवाईकपणामुळं नव्हे. उलट, छोटीं माणसं त्यांच्यांतील विक्षिप्तपणामुळं तुमचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतात. मोठ्या माणसांच्या स्वभावांत तऱ्हेवाईकपणा हा छोटासा अंश असतो, तर छोट्या माणसांचा मोठेपणा त्यांच्या विक्षिप्तपणावर अवलंबून असतो. आणि मला वाटतं, प्रत्येक छोट्या माणसांत ही तऱ्हेवाईकपणाची छटा असतेच असते. फक्त थोड्यांचं बिंग बाहेर पडून तीं दुसऱ्या अर्थानं 'लोकप्रिय' होतात, तर कांही अशा बेमालूम रीतीनं आपला तऱ्हेवाईकपणा छपवितात की जसे कांही बिलंदर चोर! बाकी सर्वांभूतीं जसा परमेश्वर तसा सर्व मानवी प्राण्यांत विक्षिप्तपणा, हें मात्र निर्विवाद सत्य आहे.

मे १९४१, यशवंत

★

# व्यक्ति रेखा

## छोटीं माणसं : ७

माझी पूर्वी अशी समजूत होती कीं मोठ्या लोकांतच अद्वितीयत्व असतं. पण समाजांत अशी कित्येक छोटीं माणसांहि असतात कीं ज्यांच्यामध्ये असाधारण अद्वितीयत्व कधी कधी दिसून येतं.

आमच्या अर्जुनरावांकडेच पाहा ना. छोट्यांतली छोटी व्यक्ति ही. जन्म महाडचा. नोकरीसाठी तरुण वयांत स्वारी एका हिंदी संस्थानांत गेली. पिंड दांडगा. त्यामुळं लगेच पोलिसांत भरती झाली. पगार असेल साधारण दहा पंधरा रुपये सुरवातीला. हडेलहप्पी स्वभाव गृहस्थाचा. त्यामुळं सगळ्या अधिकाऱ्यांची सदा खप्पा मर्जी असायची अर्जुनरावांवर. एक दोन वेळां तर आफिसरांबरोबर असे खटके उडाले कीं बहुतेक नोकरी जाऊन हातांत नारळच मिळायचा. पण नशीब शिकंदर. स्वारी बडतर्फ झाली नाही.

मात्र अर्जुनरावांस अशा आफिसरांकडे पाठविण्यांत आलं, कीं जो शिस्तीचा कडक, धडाडीचा, छातीबाज, आणि बेछूट माणसाला सुतासारखा सरळ आणणारा. अर्जुनराव तसे, तर त्यांचे

साहेब कमालीचे करडे. जोडी चांगली जमली. फौजदारसाहेबांची नेमणूक संस्थानांतील दरोडेखोरांना पकडण्याकरता करण्यांत आली, तेव्हा त्यांना खरी साथ दिली अर्जुनरावांनी. दऱ्याखोऱ्यांत, डोंगरमाथ्यावर, अरण्यांत, दूरदूरच्या खेड्यांपाड्यांत अर्जुनराव आणि त्यांचे फौजदार यांनी आपल्या मर्दुमकीची कमाल केली. दरोडेखोरांना सळो का पळो करून टाकलं; तें इतकं कीं दरोडेखोरांना फौजदारसाहेब आणि हवालदार अर्जुनराव म्हणजे कर्दनकाळ वाटूं लागले.

या महाकालीच्या भक्तांना—दरोडेखोरांना—वाटायला लागलं कीं या दोघांचा कांटा काढला नाही तर त्यांच्या जातीचा नायनाट व्हायचा. फौजदारसाहेब आणि अर्जुनराव यांना दहशत देण्यांत येऊं लागली कीं 'तुमच्या जीवाला सांभाळा.' मित्रमंडळी या दोघांना सांगूं लागली कीं 'जरा आता थांबा'. पण यांचा कार्यक्रम चालूंच.

एके दिवशीं संध्याकाळीं साहेब त्यांच्या जंगलांतील राहुटींत टेबलावर काम करीत बसले होते. बाजूच्या तंबूंत त्यांचं कुटुंब, नुकतंच बाळंत झालेलं, मुलाला घेऊन झोपलं होतं. शिपाई आपल्या तंबूंत जाऊन पडले होते. एक पहारेकरी साहेबांच्या राहुटीबाहेर गस्त घालीत होता.

एवढ्यांत बंदुकीचा धुडुम् आवाज झाला. फौजदारसाहेब धाडकन् जमिनीवर कोसळले. अर्जुनराव वाघासारखे साहेबांच्या राहुटीकडे धावले. निमिषार्धांत त्यांनी त्या सैतानाला गिरफ्तार केलं. कॅंपांत हलकल्लोळ माजला होता. साहेबांचा जीव केव्हाच गेला होता. पलीकडे साहेबांची पत्नी मूर्च्छा येऊन पडली

होती. शिपाई लोक घाबरून गेले होते. संथपणें काम चाललं होतं तें फक्त अर्जुनरावांचं. त्यानं 'सैताना'ला दोन शिपायांकडे देऊन त्याच्यावर पहारा ठेवायला सांगितलं. साहेबांच्या पत्नीची त्यांनी योग्य ती शुश्रूषा केली, व कँपांत सगळी व्यवस्था लावली.

नवीन फौजदारसाहेब आले. जुन्या गोष्टीचा सर्वांना विसर पडला. पण अर्जुनरावांना त्या गोष्टीचा विसर पडला नाही. एक वेळचा बेफाट तरुण एका दिवसांत एकनिष्ठ सेवक बनला. फौजदारांच्या मृत्यूच्या त्या काळरात्रीं अर्जुनरावांनी निश्चय केला कीं, फौजदारांच्या घराला आपण वाहून घ्यायचं.

शहरांत त्यांनी आपली बदली करून घेतली. फौजदारसाहेबांच्या घरीं त्यांनी आपली राहुटी ठोकली ती कायमची. महाडचं आपलं घरं, आपली माघारीण, आपलीं मुलं—त्या सर्वांचा जणूं त्यांना विसर पडला. नोकरी संपली की सारा वेळ त्यांचा जायचा फौजदारसाहेबांच्या घरची व्यवस्था बघण्यांत. साहेबांच्या चार मुलांचा आणि तीन मुलींचा त्यांनी सांभाळ केला. तीं अर्जुनरावांच्या अंगाखांद्यावर वाढलीं. त्यांचे लाड अर्जुनरावांनी पुरवले. तीं अति हुल्लड करूं लागली की अर्जुनरावांनी त्यांना हटकारावं, क्वचित् चोप द्यावा. त्यांच्या आजारांत त्यांची शुश्रूषा करावी, नाही नाही ती जीवापाड मेहनत त्यांच्यासाठी घ्यावी. पालक म्हणून जें जें कांही करायला पाहिजे तें सर्व करायचं त्यांनी ठेवलं नाही.

इतकंही करून पुन्हा हेच अर्जुनराव कपडे धू, भांडीं धू, हीं सगळीं साधारण गड्याचीं कामं सुद्धा करायला तयार. बायामाणसं घरीं नसलीं तर जेवणहि करायला तयार. एकूण काय,

लहान मोठी, हलकीं व उंच सगळीं कामं अर्जुनराव करायला कधी मागं नाहीत.

घरांत त्यांचा सारा कारभार संथपणें. दरारा इतका दांडगा—प्रत्यक्ष फौजदाराची बायको सुद्धा त्यांना विचारल्याशिवाय कांही करणं कठीण. सहसा अर्जुनराव घरच्या एखाद्या भानगडींत मुद्दाम मन घालायचे नाहींत. पण वेळीं प्रसंगीं 'अमूक अमूक गोष्ट अशी अशी झाली पाहिजे' असा हुकमती निर्वाळा दिल्या-शिवाय; रहाणार नाहीत. कोणी नातेवाईक कांही गडबड करण्यास आले की हे स्वस्थ. त्यांचं म्हणणं ऐकून घेतील, पण अखेर जोराचा टोला दिल्याशिवाय रहाणार नाहीत.

पण हें सर्व कार्य करतांना आपली पायरी मात्र ते विसरत नसत. कोणी आपली पायरी विसरला तर त्याला ते त्याची चोख जाणीव करून देतील. तसं बघायला गेलं तर ते नोकर समजले जात, पण वेळीं प्रसंगीं ते मालकाहूनही मालक बनत.

आणि ही त्यांची सेवा अजूनही अविरत चालू आहे. आपल्या कुटुंबांत ते जातात मधूनमधून, नाही असं नाही. पण एक पत्र आलं किंवा तार आली की धावलेच फौजदारांच्या घरीं.—अशी तळमळ. ही तगमग म्हणजे स्वामिभक्तीची पराकाष्ठा आहे.

आज अर्जुनरावाचं वय सत्तराकडे असेल. यांतील २०-२५ वर्षं तरी त्यांनी कायावाचामनेंकरून फौजदारांच्या कुटुंबाची निरपेक्ष बुद्धीनं, निःस्वार्थ वृत्तीनं सेवा केली आहे.

जगाच्या दृष्टीनं अर्जुनराव म्हणजे एक शिपाईगडी; दहा वीस रुपये मिळविणारा लुंगासुंगा मनुष्य—एक छोटा माणूस. पण कृति गृहस्थाची किती थोर! साधारण माणसांतलं अद्वितीयत्व म्हणतात तें हें असं!

नारायणराव हे आमचे दुसरे छोटे नायक. कारमायकेल रोडवरील राजेरजवाड्यांच्या एका भव्य प्रासादांत ते तुम्हांला दारावर उभे असलेले दिसतील अगर आंत प्रासादांत कांही काम करतांना सापडतील.

पगार तीस रुपये. आयुष्याला प्रारंभ शिपाई म्हणूनच. आणि उतारवयांतहि आता तोच हुद्दा. तुमची ओळख होऊं द्या कीं मग तुम्हांला नारायणरावांची लज्जत समजेल. रसाळ गप्पा मारील म्हातारा, आणि कुठल्याहि विषयावर आजचे ताजे विचार बोलेल.

निकृष्ट परिस्थितींत जन्म, दारिद्र्यमय जीवन, आणि सदैव दैवाची वक्रदृष्टि. पण हताश म्हणून झालेला नाही कधी. तोंडावर सदा हास्य चमकायचंच.

प्राचीन, अर्वाचीन, सगळे मराठी लेखक नारायणरावांच्या चांगल्या परिचयाचे. मराठी वाङ्मयांतील साऱ्या प्रवाहांची यांना संपूर्ण माहिती. तुम्ही खांडेकरांवर बोला, ते आपलीं खांडेकरांवरचीं मतं आस्ते आस्ते तुमच्या घशांत उतरवतील; फडक्यांसंबंधी गोष्ट काढा, ते मार्मिक माहिती पुरवतील 'फडके आणि त्यांचं वाङ्मय' या विषयावर; मराठी वर्तमानपत्रांतील एखाद्या चालू वाग्युद्धाबद्दल हळूच एक शब्द काढा, ते त्याबद्दल साद्यंत माहिती सांगून आपली सूक्ष्म विचाराअंतीं ठरविलेलीं मतं तुमच्यासमोर मांडतील.

आणि स्वारीचे विचार किती उदार! मिश्रविवाह झाले पाहिजेत, तरुण मुलांमुलींचे विवाह विशीनंतर झाले पाहिजेत, हिंदु समाजानं रोटीव्यवहार सर्रास सुरू केले पाहिजेत,

साक्षरतेचा अधिक अधिक प्रसार झाला पाहिजे, वगैरे वगैरे. पुरोगाम्यापेक्षाहि दोन कदम पुढे असे सारे विचार आहेत आमच्या नारायणरावांचे. हे विचार त्यांनी आचारांत पुष्कळदा आणले आहेत. उदाहरणार्थ, आपल्या पुतण्या-पुतणींचीं लग्नं, ज्ञातीकडून होणारा छळ सोसूनहि, त्यांनी विशींत प्रवेश केल्यावर करून दिलीं. रोटीव्यवहाराला नारायणराव कुठंहि कधीहिं तयार. साक्षरता-प्रसार हें तर त्यांचं दररोजचं काम आहे. त्यांच्यामुळं जितका साक्षरताप्रसार, ज्ञानप्रसार झाला असेल तितका साक्षरताप्रसार-संघानंहि केला नसेल.

अशी आहे आमची ही अर्जुनराव-नारायणरावांची जोडी. छोटीं माणसं हीं. बड्या माणसांच्या पासंगालाहि पुरणार नाहीत. पण यांची कृति किती मोठी आहे! मोठ्या माणसांत प्रतिभा असते, एक विशिष्ट प्रकारची पराक्रम-शक्ति असते. छोट्या माणसांत या गुणांचा अभाव असतो. पण या छोट्याच्या मनाची ठेवण अशी असते कीं, कित्येक वेळां मोठ्यांच्यापेक्षा यांचं कार्य अभूतपूर्व आणि अविस्मरणीय असं असतं. मोठीं माणसं युगायुगांत एक अशीं निर्माण होतात, तर छोटीं माणसं दररोजचीं आहेत. मोठ्या माणसांच्या महत्कार्यांकडे पाहून मन स्तंभित होतं, तर छोट्या माणसांच्या कृतींकडे पाहून त्यांचं अनुकरण करण्याची इच्छा होते. मोठ्या माणसांबद्दल आदर वाटतो, तर छोट्यांबद्दल प्रेम वाटतं. जगाच्या उद्धाराला मोठीं माणसं कारणीभूत होतात, तर जगाची धारणा आणि जतन हीं छोटीं माणसं करतात. मोठ्यांचं अवतारकार्य मोठं, तर छोट्यांचं चारित्र्य मोठं.

मोठेपणा हा जन्मतःच माणसांत असतो. ती एक दैवी देणगी होय. मोठ्या माणसांच्या पावलांवर पाऊल टाकून कांही मी मोठा होत नाही. म्हणूनच मी ठरवून टाकलंय् कीं छोट्यांचं अनुकरण करायचं. कारण त्यामुळं माझं नांव इतिहासजमा झालं नाही तरी, मी चारित्र्यवान् बनेन. आणि मला वाटतं, जगांत माणसाचं श्रेष्ठत्व त्याच्या उज्ज्वल चारित्र्यावरच अवलंबून आहे.

जून १९४१, यशवंत

★

# फॅमिली डॉक्टर : ८

'तुमचे फॅमिली डॉक्टर मला आवडले'—आजारी माणसाच्या समाचारास आलेल्या एक बाई त्या कुटुंबांतील माणसांकडे आपलं मत सांगत होत्या. 'एक तर मन लावून ते रोग्याची तपासणी करीत होते. रोग्याचं आणि तुम्हां सर्वांचीं मनं प्रसन्न राखण्यासाठी सारखी गम्मत जम्मत करीत होते; आणि सर्वांत आश्चर्यकारक गोष्ट मला वाटली ती ही कीं, तुमचे अडाणी, आडवेतिडवे, कांहीसे बालिश असे सारे प्रश्न ऐकून घेऊन त्यांचीं शांतपणें उत्तरं देत होते. फॅमिली डॉक्टर होण्यास अगदी लायक इसम—'

डॉक्टर आल्यापासून तों ते जाईपर्यंत मीहि त्या ठिकाणीं होतों. मी त्यांचं वागणं पाहून मोहून गेलों अगदी. त्यांच्या विनोदावर तर बेहद्द खुष होतों मी. माझंहि त्या डॉक्टरांबद्दल फारच चांगलं मत झालं. फक्त मी कांही बोललों नाही. त्या बाई मोकळ्या दिलाच्या होत्या. त्यांनी आपलं शिफारसपत्र डॉक्टरांना ताबडतोब देऊन टाकलं.

घरीं येतांना त्या डॉक्टरांबद्दलच सारे विचार माझ्या मनांत घोळत होते. त्यांनी रोग्याची तपासणी चालविली होती, तिकडे

मी बारकाईनं पहात होतों. किती कसून तपासणी होती ती! त्यांत डॉक्टरांचं मानवी जीवनावरील प्रेम व मानवी जीवन वांचविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्याचं ब्रीद प्रतीत होत होतं. आपणास तीन चार रुपयेच या तपासणीचे मिळणार याची त्यांना जाणीव असूनहि या वेळीं या अल्पशा आर्थिक मोबदल्याचा त्यांना विसर पडला होता. आपल्या शास्त्रीय उपचार-उपायांची पराकाष्ठा करून रोग्याला वाचवायचं कसं, याकडेच त्यांचं लक्ष लागलेलं दिसत होतं. रोग्याला आराम देण्यासाठी ते तळमळत होते. रोगाचा नाश करण्यासाठी रोगाचं योग्य आकलन व्हावं म्हणून त्यांची धडपड चालली होती. तपासणीच्या वेळची त्यांची चर्या पाहून त्यांच्या भूतदयेबद्दल, त्यांच्या सहानुभूतीबद्दल कोणालाहि खात्री वाटली असती.

आणि ते आल्यापासून तों जाईपर्यंत किती खेळकर वातावरण त्यांनी निर्माण केलं! आपल्या बोलण्यानं, वागण्यानं ते रोग्याला इतक्या गोड वातावरणांत रमवीत होते कीं त्यालाहि आपल्या रोगाचा विसर पडला असेल. ते येण्यापूर्वींचं तिथलं वातावरण उदास होतं. पण निमिषार्धात त्यांनी त्या भकास वातावरणांत स्थित्यंतर घडवून आणलं. किती हसवीत रमवीत होते ते! किती दिलखुलास बोलत होते ते! रोगी आणि रोग्याच्या आजूबाजूचे सारे लांब चेहरा करून बसलेले लोक हसतमुख झाले. एक प्रकारचं प्रसन्न, आशादायक, हासरं वातावरण तिथं निर्माण झालं. डॉक्टरांची निसर्गदत्त देणगी वाटली ती मला. त्यामुळं कोणताहि असाध्य रोगी बरा झाला असता.

तपासणी संपल्यानंतर डॉक्टरांवर प्रश्नांचा भडिमार सुरू झाला. कांही प्रश्न अनाठायी होते, बरेच मूर्खपणाचे होते. पण

किती संथपणें त्यांनी ते सर्व प्रश्न ऐकून घेतले! किती समर्पक उत्तरं दिलीं! त्यांच्या उत्तरांत बोचकपणा नव्हता, व्यंजकता नव्हती, टर नव्हती; केवळ रोग्यावरच्या प्रेमामुळं नि आस्थेमुळं ते प्रश्न विचारीत होते हें त्यांना माहित होतं, आणि म्हणूनच ते शांतपणें उत्तरं देत होते.

मला माझ्या फॅमिली–डॉक्टरांची आठवण झाली. आतांच्या नव्हे–लहानपणींच्या. रोगग्रस्त लोकांना निरोगी करण्यांत, व्याधीमुळं उद्ध्वस्त होणाऱ्या कुटुंबांचा आसरा परत मिळवून देण्यांत, उदास दुःखी वातावरणाला मूठमाती देऊन त्या ठिकाणीं आशाजनक, उत्साही वातावरण निर्माण करण्यांत, त्यांनी आपलं आयुष्य वेचलं. लोकांना दुराराध्य रोगांतून मुक्त करणारा हा लोकोत्तर भिषग्वर शेवटीं खासगी घरगुती आपत्तींमुळं खंगला; रोग्यांना आनंद देणारा हा डॉक्टर वैतागून निराश होऊन मेला!

वास्तविक या माझ्या आवडत्या फॅमिली डॉक्टराची कॉलेज करिअर कांही चमकदार नव्हती. मला सांगण्यांत येत असे कीं ते आठ वेळां वारी करून डॉक्टरींत, पास झाले होते. डॉक्टरी ज्ञानामध्येसुद्धा ते अतिप्रख्यात होते असं नाही. पण त्यांच्यांतील अजब गुण म्हणजे त्यांची गोड वाणी, त्यांचा हजारजबाबीपणा आणि रोग्याबद्दलची विलक्षण आस्था. या त्यांच्या लोकोत्तर गुणांमुळंच त्यांच्या दवाखान्यांत ही गर्दी नेहमी सापडायची. लोकांचा त्यांच्यावर विलक्षण भाव असायचा. त्यांचे अर्धे रोगी त्यांच्या विनोदामुळंच ताजेतवाने व्हायचे. त्यांच्या दवाखान्यांत पाऊल ठेवल्यापासून तों तो सोडीपर्यंत हास्याचा तिथे पूर वहायचा. ह्याची टोपी उडव, त्याला गुदगुल्या कर, एखाद्या लहान मुलाकडे चकण्या डोळ्यानं पहा, एकदम जोरानं शिंक–

एक ना दोन, अनेक युक्त्याप्रयुक्त्या ते योजत आणि सगळ्यांना हसवीत. शिवाय गोड गोड शब्दांचा धबधबा चालू असायचाच. हास्याच्या फवाऱ्यांनी वातावरण नुसतं धुंद होऊन जायचं. आमच्या घरच्या बाटल्या घेऊन डॉक्टरसाहेबांच्या दवाखान्यांत जायला मी राजीखुषीनं तयार असे. किंबहुना घरीं मीं किंवा इतर कोणी आजारी पडलं तर मला बरं वाटत असे. कारण, मग डॉक्टरांचं दर्शन होऊन त्यांच्या आनंदी सहवासांत थोडा वेळ तरी रमायला मिळत असे. कडू औषध पिऊन मन विटायचं, पण डॉक्टरांचा विनोद अवीट असे. डॉक्टरांची विनोदवल्ली ही त्यांच्या औषधींपेक्षा रामबाण उपाय असे.

या डॉक्टरसाहेबांनी आपल्या लोकप्रियतेमुळं पाण्यासारखा पैसा मिळविला. मुंबईत इमारती उभारल्या. पण ही त्यांची थोरवी नव्हे. त्यांची थोरवी ही कीं त्यांनी आपल्या आयुष्यांत रोग्यांना आनंद दिला, त्यांच्या जीवनांत गोडवा आणला. भूतदया, सहानुभूति आणि आस्था दाखवून पीडलेल्या गांजलेल्या लोकांना त्यांच्या व्यथा–व्याधींचा आपल्या विनोदवल्लीनं विसर पाडला आणि अनेकांना रोगमुक्त केलं.

अजूनहि या डॉक्टरांचे अनेक चाहाते आहेत. त्यांना तर हे देवदूत वाटत आणि अजूनहि वाटतात. मानवी जीवन आनंदी करण्यास त्यांना जितके श्रमसायास पडले असतील त्या मानानं त्यांना मिळालेली संपत्ति कमीच होय.

‘Teachers are born and not made’ असं आपण म्हणतों, त्याप्रमाणें ‘Family Doctors are born and not made’ असं म्हणावंसं मला वाटतं. त्यांच्यांतील ते प्रभावी

गुण उपजत असतात, निसर्गदत्त असतात. ओढून ताणून आणूं म्हटलं तर शक्य नाही.

याच्या उलट मीं असे अनेक फॅमिली डॉक्टर पाहिले आहेत कीं ते सदा दुर्मुखलेले, उदास आणि तिरसट. त्यांना प्रश्नांचीं उत्तरं द्यायला नकोत, जास्त बोलायला नको. आणि हे पिसाळले म्हणजे जमदग्नीचे अवतार. कांही असे चमत्कारिक आहेत कीं रोग्यांना बरं करण्याऐवजी आपल्या भित्रेपणानं त्यांना मारतील मात्र खास. मला एका दिवंगत फॅमिली डॉक्टरांची मजेदार गोष्ट नेहमी सांगण्यांत येई. रोग्याची तपासणी सुरू झाली कीं हेच मुळीं त्याला विचारायचे, 'काय बुवा तुम्हांला होत असावं?' रोगी जरा आजारानं जास्त बेजार असला तर, 'आता काय करूं?' म्हणून यांच्याच तोंडचं पाणी पळायचं. आणि घरीं तपासणीसाठी गेल्यानंतर परिस्थिति गंभीर दिसली तर रोगी थंड होण्यापूर्वीं यांच्याच नाड्या बंद व्हायच्या. एक डॉक्टर असे कीं ते रोग्याच्या घरीं गेल्यावर तपासणी ठेवीत बाजूला आणि त्या घरच्या कुलंगड्यांची तपासणी करीत वेळ घालवीत. एक एक भिषग्वर असे कीं अनेक घरची निंदा जातील तिथे करतील.

नुकतीच मी एका नव्या डॉक्टरसाहेबांची आणखीन् और पद्धत पाहिली. ते आपल्या शास्त्रांत निष्णात. रोगाचं निदान अचूक. पण गृहस्थ अतिशय मितभाषी, तुटक आणि गर्विष्ठ. तपासणी फार काळजीपूर्वक. विनोद नाही, थट्टा नाही. सारा गंभीर प्रकार. कांही प्रश्न विचारले की स्वारी बिथरलीच. इतकीं तुटक उत्तरं देतील कीं त्यांचा अर्थ कळणं सुद्धा कठीण.

एकदा एका असाध्य रोग्याची केस यांच्याकडे आली. तपासणी वगैरे झाल्यावर घरच्या मंडळींनं विचारलं, 'कोणता रोग आहे?'

‘तुम्हांला काय करायचं आहे रोगाशी ? मी तो पाहून घेईन.’ ताडकन् त्या अस्वस्थ मंडळीला उत्तर मिळालं. संपलाच कारभार. पुढचे सगळे प्रश्न आटोपले.

पुढे एकदा डॉक्टरसाहेब आले असतांना त्यांनी एक लहान मूल रोग्याशी बागडतांना पाहिलं. तिथं ते कांहींच बोलले नाहीत. पण एका त्रयस्थाकडे ते ओकले–‘स्पर्शजन्य रोग आहे आणि हे लोक रोग्याकडे मुलांना पाठवतात, आपण स्वतः त्याच्याकडे वाटेल तसे बसतात.’

जेव्हा हे डॉक्टरांचं वक्तव्य त्या घरच्या मालकांना कळलं तेव्हा मात्र त्यांचं पित्त खवळलं. आतापर्यंत डॉक्टरांच्या सगळ्या विक्षिप्तपणाकडे त्यांनी काणाडोळा केला होता. कारण त्यांच्या परीक्षेवर विश्वास होता. पण आता मात्र त्यांनी डॉक्टरांची खरडपट्टी काढली. ते म्हणाले, ‘डॉक्टरसाहेब, माफ करा मला. आमच्या घरच्या मंडळीकडे एका शब्दानं रोग काय आहे, काय नाही, याबद्दल सांगत नाही; आणि अनभिज्ञतेमुळं आमच्या हातून चूक घडली तर दुसऱ्याकडे जाऊन निंदा करतां, आम्हांला नांवे ठेवतां. एक तर घरच्या या आजारीपणामुळं आम्ही बेजार झालों आहोंत, आणि त्यांत तुम्ही ही असली बडबड इतरत्र करून आमच्या मनाला डागण्या देतां. त्यापेक्षा शांतपणें आमच्या वेड्यावाकड्या प्रश्नांचीं उत्तरं देऊन आमचं समाधान केलं, आम्ही कशा रीतीनं वागायला पाहिजे याची माहिती फोड करून आम्हांला सांगितली तर आम्हांला बरं वाटेल, आमचा जीव खाली पडेल. आग विझविण्यासाठी आलेल्या लोकांनी आग भडकवावी तशापैकी तुमचं वर्तन आहे. म्हणूनच एक वेळ मी डॉक्टरी शास्त्रांत साधारण पण रोग्याची चांगली काळजी

घेणाऱ्या आणि शंकाकुशंकाचं योग्य समाधान करणाऱ्या मायाळू डॉक्टराकडे जाणार आहे.'

वैद्यशास्त्रांतील एका निष्णात डॉक्टरला या मंडळींना सोडावं लागलं, तरी पण त्यांनी केलं तें योग्यच केलं. जो डॉक्टर आपल्या गोड शब्दानं रोग्याला रिझवत नाही, घरच्या मंडळींची काळजी आपल्या कनवाळू वाणीनं कमी करीत नाही, दुःखी परिस्थितीमुळं विचारल्या जाणाऱ्या त्यांच्या अजाण प्रश्नांना समर्पक आणि समाधानकारक उत्तरं देत नाही तो फॅमिली डॉक्टर होण्यास मुळीं लायकच नाही.

असले तिस्मारखान आणि तिरसट भिषग्वर फॅमिली डॉक्टरच्या भूतदयाप्रेरित पेशाला काळीमा लावत असले तरी या पेशांत दुसरे अनेक देवदूत आहेत कीं ज्यांच्यामुळं रोगी माणसं आणि त्यांच्या घरची मंडळी यांना त्यांच्या हवालदिल परिस्थितींत सुखाचे क्षण मिळतात. हे देवदूत नसले तर रोग्यांचं जीवन आणि त्यांच्या घरचं वातावरण इतकं दारुण आणि भयंकर राहील कीं आधीच होणाऱ्या रोग्याच्या यातना वाढतील आणि आधीच संत्रस्त असलेली त्यांच्या घरची मंडळी काळजीनं जास्तच होरपळून निघेल.

कांही दिवसांपूर्वी मीं एका इंग्रजी मासिकांत अशी माहिती वाचली: एका जिल्ह्यामध्ये तेथील कांही संस्थांनी असा विचार केला कीं सबंध जिल्हाभर उत्तमोत्तम रुग्णालयांची स्थापना करायची, निष्णात डॉक्टरांची या हॉस्पिटलांत नेमणूक करायची आणि एकंदर लोकांची या ठिकाणीं कोठल्याहि रोगावर सोय होईल अशी आदर्श व्यवस्था करायची. ह्या व्यवस्थेमुळं फॅमिली डॉक्टरांचा वर्गच नाहीसा होणार होता. पण लोकमत ज्या वेळीं

अजमावण्यांत आलं त्या वेळीं लोकांनी अशी स्पष्ट घोषणा केली कीं, रुग्णालयं कितीहि चांगलीं असलीं, तेथील डॉक्टर कितीहि निष्णात असले, तेथील परीक्षा कितीहि शास्त्रीय आणि यथायोग्य असली तरी तिथला सगळा कारभार यांत्रिक असणार तिथले डॉक्टर थंड वृत्तीचे असणार, तिथे कडक शिस्त असणार, माणसाच्या भावना आणि वृत्ति यांच्याकडे कमी लक्ष असणार; म्हणून फॅमिली डॉक्टर कितीहि दोषपूर्ण असला तरी तोच आम्हांला पाहिजे; तो आमचा मित्र आहे, तो आमच्या भावना जाणतो. तो आमच्याकडे येतांना नुसतं वैद्यकशास्त्रच घेऊन येत नाही, तर सहानुभूति, भूतदया आणि मानवजातीवरील निर्व्याज प्रेम घेऊन येतो. शास्त्रीय रोग-निरोधन शाळांपेक्षा हा घरोघरीं रोगनिर्दालन करीत फिरणारा देवदूत किती तरी पटींनी श्रेष्ठ आहे.

या इंग्लंडमधील जिल्ह्यानं फॅमिली डॉक्टरबद्दल जें मत दिलं तोच निर्वाळा, मला वाटतं, जगभर दिला जाईल. कारण हॉस्पिटलची व्यवस्था कितीहि शास्त्रीय आणि सुखावह असली तरी तेथील आदर्श व्यवस्थेंतहि Human touch नाही, प्रेम नाही, गोडवा नाही. हें सर्व फॅमिली डॉक्टरचं धन आहे; ती त्याची जादू आहे, किमया आहे. त्याच्या जोरावरच तो रोगी, त्रस्त, पीडित मानवी जीवांचा आधार आहे, त्राता आहे—जीवनदाता आहे. आणि तो अखेरपर्यंत तसाच रहाणार. रोगांशी झुंजतांना प्रत्यक्ष भगवान् म्हणून ज्याचं भजन आम्ही करतों तो फॅमिली डॉक्टर चिरायु होवो असं अभीष्ट कोण चिंतणार नाही ?

ऑक्टोबर १९४२, यशवंत

★

## रा मा ग डी : ९

एकदा आमचा गडी आपल्या गांवाहून आला. त्याच्या सोबत भलं मोठं बोचकं होतं. तें त्यानं जेव्हा सोडलं तेव्हा त्याच्यांत दोन कोहळे, दोन डांगर, चार शेर तरी भरतील एवढे काजू, सहा सुपं, दोन हिराचे झाडू, एवढं सामान होतं. ही त्याची भेट होती त्याच्या मालकाला. गांवीं गेलं की मालकांसाठी कांही तरी घेऊन यायचं हा बऱ्याच कोकणी रामा लोकांचा धर्मच दिसतो. कारण त्यानंतर मी बऱ्याच नातेवाईकांकडे आणि मित्रमंडळीकडे चौकशी केली तर मला कळून आलं की, त्यांचेही रामा त्यांना 'गांवची भेट' आणल्याशिवाय राहत नाहीत.

कौतुक वाटतं मला या रामाचं आणि त्याच्या भेटीचं. बिचाऱ्याचा पगार असतो फार तर दहा पंधरा रुपडे, फार फार म्हणजे वीस. पण काय ही मालकावर भक्ति! स्वतःची नसती पदरमोड करून, न विसरतां, आपण ज्याची भाकरी खातों त्याच्यासाठीं अल्पस्वल्प कां होईना, पण कांही तरी घेऊन यायचं!

या कोकण्या रामांचं हें मोठं वैशिष्टय आहे की त्यांची एकदा तुमच्यावर भक्ति जडली कीं वर्षानुवर्षं तुमच्याकडे झिजतील.

अतिशय उद्योगी, प्रामाणिक आणि प्रेमळ जात आहे ही. घरकाम्या नोकरवर्गांत इतकी चांगली जात सबंध हिंदुस्थानांत मिळायची नाही.

पंजाबांत 'पहाडी' लोक घरगुती कामं करतात. पण सारे एकजात हरामखोर. अतिशय हेंद्रे बेंद्रे आणि घरांत केव्हा डल्ला मारतील तें सांगणं कठीण. संयुक्तप्रांत आणि मध्यप्रांतांत घरीं काम करणारे गडी बुरसट आणि आडमुठे हमखास असायचेच. बंगाल–सिंधकडेहि हीच परिस्थिति आहे. गुजराथेंतहि गड्यामाणसांचा दुष्काळ असला पाहिजे; किंवा घरकामासाठी माणसं अर्धवट तरी मिळत असणार. एरवी, मुंबईचे गुजराथी लोक आमच्या कामाळू रामाला अगत्यानं आपल्या घरीं कामासाठी ठेवते ना!

हा कोकण्या रामा म्हणजे अविश्रान्त श्रम करणारं एक यंत्र आहे. सकाळीं पांच वाजल्यापासून तों रात्रौ अकरा वाजेपर्यंत हा सारखा राबत असतो. सकाळीं दूध घेणं तापविणं, आंघोळीला गरम पाणी मिळावं म्हणून बंब पेटविणं, पडतील तेवढीं धुणीं बडविणं, भांडीं धुणं, घरांत पोरं कोकलूं लागलीं कीं त्यांना सांभाळणं, घराची साफसफाई राखणं, मिरच्या–कोथिंबिरीपासून लागेल तो जिन्नस बाजारांतून आणून देण्यासाठी शेपन्नास फेऱ्या करणं, चिठ्याचपाट्या पोहोचविणं–अशीं अगणित कामं तो सारखीं करत असतो. आणि एवढ्या या अवाढव्य कामांसाठी पगार किती, तर कमींत कमी चार आणि फार फार म्हणजे वीस!

ह्या कोकण्या रामाचा आणखी एक सद्‌गुण म्हणजे त्याचा प्रामाणिकपणा. कित्येकांच्या घरीं रामाच्याच हातांत जामदार-खान्याच्या किल्ल्या असतात. गृहस्थ एक पैसा जरी सापडला

तरी आणून देईल मालकाकडे. मग मालकानं पानासाठी दिला तर राजीखुषीनं घेईल, पण बाहेरच्या बाहेर कधी मारणार नाही. एकवेळ १००—१५० मिळविणारा त्याचा मालक ऑफिसांतून पेन्सिल, कागद, वगैरे मारून आणत असेल, पण हा रामा गडी—सचोटी त्याच्या जणू-पाचवीला पुजलेली आहे.

याला अपवाद असे रामा नसतीलच असं माझं म्हणणं नाही. परवाच माझ्या एका मित्राकडे नवीनच राहिलेल्या रामानं त्याचं सोन्याचं घड्याळ लांबविलं. आमच्याकडे एक नोकर होता. त्यानं आमच्या घरांतील बऱ्याच लहान लहान वस्तु अशा बेमालूम पळविल्या कीं आमच्या तें लक्षांतहि आलं नाही. पण तो नोकरी सोडून जाऊं लागला त्या दिवशीं त्याचं बोचकं फुगीर दिसलं म्हणून सोडून पाहिलं, तर त्यांत मुलांच्या चांदीच्या खुळखुळ्या-पासून तों सुताच्या रिळापर्यंत अनेक वस्तु सापडल्या. माझ्या एका ब्रह्मचारी मित्राकडे तर त्याच्या गड्यानं आपल्या मालकाच्या राजशाही बिछान्यांत ताणून दिली. इतकी बिचाऱ्याला गाढ झोप लागली कीं मालकानं नूप दार ठोठावलं तरी कांही याला पत्ता नाही. शेवटीं या ब्रह्मचारी दोस्तांनं शेजारच्या ग्यालरींतून उडी मारून प्रवेश केला. आणि पाहतात तों नोकर मालक झालेला. लगेच त्यानं सोडचिट्ठी दिली त्या दुसऱ्या 'मालका'ला.

रामा गडी नव्यानं मुंबईला आला कीं त्याच्या खेडवळी भोळसरपणामुळं मजा मजा उडवून देतो. मुंबईला हा नवीनच असल्यामुळं 'दिवा लाव' म्हणून याला आज्ञा फर्माविली कीं बटण दाबण्याऐवजीं हा काड्यांची पेटी घेऊन येतो. जणू याच्या जळत्या काडीनं विजेचा दिवा पेटणार! सोडा आण म्हणून

सांगितलं कीं हा इराण्याच्या दुकानीं जाऊन पिण्याचा सोडा आणण्याऐवजीं किराण्याच्या दुकानांतून खाण्याचा सोडा घेऊन येईल. गरम पाण्याची पिशवी आण म्हणून सांगितलं तर द्राक्षासवाची बाटली आणून तुमच्यापुढं ठेवील. 'रामा तुझं हें चुकलं' म्हणून सांगितलं म्हणजे 'अरे तिच्च्या' म्हणून एवढी मोठी जीभ काढून हसेल. 'ऑ' करून तुम्ही काय काय करतां ते सारखं न्याहाळत राहील. मालकाच्या घरीं तेल फुकट मिळतंय म्हणून डोक्यावर वाहती गंगा थबथबून ठेवील. कामासाठी घराबाहेर पाठविला तर 'आ' वासून रस्त्यावर जाणाऱ्यायेणाऱ्या गाड्या–माणसांकडे पाहात तब्बल तासचे तास घालवील. रस्त्यांतून चालायला लागला तर मोटारवाल्यांना आणि गाडीवाल्यांना सळो का पळो करून टाकील. जिन्यावरून वर–खाली जातांना पायऱ्या चुकल्यामुळं अनेकदा नमस्कार घालील—

'कुठलं हें सोंग आणून ठेवलं!' असं तुम्हांला वाटेल प्रथम. पण मुंबईच्या पाण्यानं जसजसा त्याचा काळाकुट्ट कोकण्या रंग निवळत जातो तसतसा त्याचा भोटपणा नाहीसा होतो. आणि मग मात्र या रामाची चपळाई, कामाची तडफ, टापटीप, अखंड कारभार, पाहून घ्यावा.

रामाचीं व्यसनं दोन. विडी आणि पान. दिवसांतून चार दोन थोटकं तोंडांत पाहिजेत. पण तीं कशीं गपचूप ओढून टाकायचीं. दोन शौचकूपांत ओढण्यासाठी राखीव, दुसरीं दोन घरांतील कोणी बघत नाही असं पाहून फुरफुर फुंकून टाकायचीं. पानाची रवंथ मात्र दिवसभर चालू असायची. एक संपलं कीं दुसरा तोबरा भरलाच. नेहमी तोंड चबराट झालेलं; आणि मग

सारखं थुंकायचं जिथं कोनाडा मिळेल तिथं. कुत्रा जसा हुंगून मुततो तसा रामा जागा शोधून थुंकतो. ज्या ज्या ठिकाणीं रामा कामाला आहे, त्या त्या ठिकाणीं जिन्यावरून उतरतां-चढतांना कोपरे पहा—लाल लाल झालेले सापडतील रामाच्या तोंडांतील रसामुळं. रामा मला कितीहि आवडत असला तरी लोकांचीं घरं अशीं बेजबाबदार रीतींनं खराब करण्याबद्दल मात्र मी त्याला कधीहि माफ करणार नाही.

रामा एकदा मुंबईला राबला की त्याला आपल्या माघारणीची, असलीं तर मुलांबाळांची, आठवण होतेशी दिसत नाही. तो आपला सतत काम करत राहील. फुरसत असली तर आपल्या गांववाल्यांत जाऊन सुखदु:खाच्या गोष्टी करील. फक्त शिमग्याला मात्र त्याच्या मनाची चलबिचल होते; आणि तेव्हा काय ती गांवाला जाण्याची त्याला उत्सुकता असते. पण दरवर्षी गांवीं जाणं कुठं असतं त्याच्या नशिबांत? बिचारा तीन चार वर्षांत एखादा महिना जातो आपल्या गांवीं, आणि भेटतो आपल्या माघारणीला आणि कुरवाळतो आपल्या बाळगोपाळांना.

खरंच, किती अल्पसंतुष्ट आहे हा बाल्या गडी—हा रामा! वीस रुपयांपर्यंत जास्तींत जास्त पगार मिळाला कीं झाला याला परमानंद. तीन वर्षांतून एक महिना घरच्या मंडळींच्या सहवासाचा लाभ झाला कीं मिळालं याला संपूर्ण संसारसुख. धन्याच्या अंगावरचे चार दोन फाटके कपडे घालायला मिळाले कीं याला वाटतं आपण सरदार दरकदारच!

आणि बिनपगारी एक महिन्याची रजा घेऊन गांवीं गेल्यावर स्वारी परत येतांना भली जब्बर भेट घेऊन यायची धन्यासाठी. आणि पुनश्च रहाटगाडगं चालू—धन्याची इमानें इतबारें सेवा!

मला याच गोष्टीचं फार नवल वाटतं कीं मरमरून या रामानं तुमची सेवा केलेली असते, मग त्याला तुम्ही तीन वर्षांनी कां होईना, एक महिन्याची भरपगारी सुट्टी कां देऊं नये? ऑफिसमधून तुम्हांला जर महिना पंधरवाड्याची दरवर्षी हक्काची भरपगारी रजा मिळते तर मग तुमच्या रामाकडेच 'बदली दे' म्हणून बळजबरी कां?

त्याचप्रमाणें, रामाकडून पहाटे पांचपासून रात्रौ अकरा वाजे-पर्यंत दडपून काम करून घ्यायचं, यांत तरी माणूसकी आहे का? तुम्ही जसे विश्रांतीची वेळ वगैरे सवलती उपभोगतां तशा त्याच्याहि कामाच्या वेळा ठरवा, त्यालाहि थोडी विश्रांति द्या, त्यालाहि थोडी फिरण्यासवरण्यास सवड द्या. रविवारीं तुम्ही मात्र मजेंत सुट्टीचा दिवस घालवतां; पण रामाला त्या दिवशीं आणखी जास्त राबवतां. त्या दिवशीं त्याला सुद्धा अर्धा दिवस सुट्टी दिली तर—बिचारा जिवाची मुंबई करून दुसऱ्या दिवशीं जास्त जोमानं पुनश्च कामाचा बोजा उचलूं लागेल. पण मिळालाय ना सुतासारखा सरळ! कर त्याला लंबे!–ही मुळीं मालकी वृत्तीच आहे.

मला हें कबूल आहे कीं, आमच्या ह्या बाले लोकांत–कोकण्या गड्यांत–अथवा जें नांव जास्तींत जास्त यांच्यात सापडतं त्या नांवानं संबोधायचं म्हणजे– 'रामा' लोकांत अजून खूप सुधारणा करतां येतील. उदाहरणार्थ, ते मुंबईत प्रथम येतात त्या वेळीं आल्याबरोबर त्यांना एखाद्या संस्थेनं थोडी फी घेऊन घरगुती कामं कशीं करावीं याची सप्रयोग माहिती करून दिली आणि नोकरी मिळवून दिली तर किती बरं होईल? एक तर या रामा लोकांस घरगुती काम कसं करावं याची माहिती मिळाल्यामुळं काम

धरल्यावर ते बिचकणार नाहीत, त्यांचं हसं होणार नाही; आणि या संस्थेतर्फेंच नोकरी मिळणार असल्यामुळं वणवण दहा घरं फिरण्याची जरूरी नाही.

अहोरात्र काम, तीन चार वर्षांनंतर बिनपगारी रजा आणि अपुरं वेतन. या दृष्टीनं विचार केल्यावर वाटतं कीं विसाव्या शतकांतहि गुलामांची चाल बंद झालेली नाही. रामा हा खरोखरीच आमचा बंदा गुलाम आहे. त्यांत सुख हेंच आहे कीं तो ही गुलामी आनंदानं सोसतो, सुखासमाधानानं तो तुमची सेवा चाकरी करतो.

पण समजा, या बाले लोकांनी एकच दिवस–त्यांच्यावर जे आम्ही अत्याचार वर्षानुवर्ष करीत आलों आहोंत त्याचा निषेध करण्यासाठी–एकच दिवस–बैठा संप केला तर—तर आमची काय त्रेधा उडेल !—

पहाटे पांच वाजतां ट्रण ट्रण करून बेल वाजली कीं झक्कत उठून शिव्याशाप देत देत मला दूध घ्यावं लागेल. जीव जाईपर्यंत फुंकर मारून बंब पेटवावा लागेल. माझ्या बायकोला झोळी घेऊन बाजारहाट करण्यासाठी बाहेर पडावं लागेल. आणि तिच्या या नवीन कामगिरीमुळं स्वयंपाक-घरांतील व्यवहार बंद पडून मला उपाशीं कचेरींत जावं लागेल. पोरांना शाळेंत कोणीं पोहोचवावं याबद्दल आम्हां नवराबायकोंत भांडण लागेल. मग कपडे धुणं, भांडीं घासणं, घर साफ करणं, वगैरे कामं सौभाग्यवतीवर पडतील. शिवाय तांदूळ निवडणं, कपडे वाळत घालणं, धुतलेलीं भांडीं जागच्या जागीं लावणं, मुलांना शाळेंत चहा आणि खाणं पिणं पोहोचविणं, त्यांना सायंकाळीं परत आणणं, फिरायला

नेणं, त्यांचे कपडे बदलणं, त्यांना सांभाळणं, इत्यादि अगणित कामं मीं कामावर गेल्यावर आमच्या बाईसाहेबांनाच करावीं लागणार !

छे, छे, छे ! नुसत्या कल्पनेनंच शहारे येतात एवढा कामाचा डोंगर अंगावर कोसळणार म्हणून. काय हा कामांचा रगाडा ! काय ही अनेक छोट्या मोठ्या कामांची गिचमिड !

रामाच ती करूं जाणे ! आणि रामाच त्यांना पुरा पडूं शकेल. त्यासाठीं रामाच्या कोणत्याहि अटी मला मान्य ! मात्र त्या अटी त्यानं होऊन माझ्यासमोर सादर केल्या पाहिजेत.

पण गुलामी वृत्तींतच आनंद मानणारा अल्पसंतोषी रामा कधी आपल्या हक्काची मागणी करील का ?

जानेवारी १९४२, यशवंत

★

## श्री. विठ्ठलराव घाटे : १०

त्या दिवशीं ‘ चंद्रिका ’ हा श्री. चंद्रशेखर कवींचा कविता-संग्रह प्रसिद्ध व्हायचा होता. तन्निमित्त कर्नाटक पब्लिशिंग हाऊसचे श्री. मंगेशराव कुळकर्णी यांनी प्रकाशक या नात्यानं एक गोड समारंभ ‘मुंबई ग्रंथसंग्रहालयां’त जुळवून आणला होता. कै. माधवराव पटवर्धन व श्री. घाटे यांचीं ‘चंद्रशेखर यांची कविता’ या विषयावर भाषणं होणार होतीं. कै. पटवर्धनांचं विद्वत्ताप्रचुर व ठसकेबाज भाषण झालं. त्यानंतर श्री. घाटे भाषण करण्यास उठले. त्यांचं भाषण अतिशय चुरचुरीत, खुशखुशीत झालं. त्यांत घरगुती प्रसंगांचीं खुमासदार वर्णनं होतीं, चंद्रशेखरांचं व्यक्तिदर्शन अति गोड शब्दांत केलं होतं, आणि विनोद भरपूर भरला होता. श्री. घाटे यांचं त्या दिवशींचं वक्तव्य म्हणजे भोजनोत्तर भाषणाचा एक उत्कृष्ट नमुना मला वाटला. इन्स्पेक्टर या नात्यानं मुंबईंत आल्यानंतर जाहीर रीत्या बोलण्याचा, मला वाटतं, हा त्यांचा पहिलाच प्रसंग. सभागृहांत त्या दिवशीं हजर असणाऱ्या सगळ्या शिक्षणप्रेमी लोकांचं मन त्यांनी हिरावून घेतलं. श्री. घाट्यांचं तें भाषण बरेच जण अजून विसरले नाहीत. मी त्यांपैकी एक आहे.

श्री. घाटे यांना पाहण्याचा हा माझा पहिला प्रसंग. त्यानंतर लवकरच माझ्या ऑफिसच्या कामानिमित्त मला त्यांना भेटावं लागलं. शिपायाबरोबर मीं माझं कार्ड आंत पाठविलं. निरोप आला 'बसा' म्हणून.

बसलों. तब्बल दीड तास बसलों. कंटाळलों, रागावलों, अगदी जायला निघालों. एवढ्यांत आमंत्रण आलं 'आंत या' म्हणून. रागारागांतच आंत गेलों मी.

'अहो भेंडे, माफ करा हं. मी फार कामांत होतों. हं, आता सांगा पाहूं तुमचं काम.' श्री. घाटे बोलले. नंतर चांगले अर्धा तास ते माझ्याशी बोलले, अगदी आपला अधिकार विसरून बोलले. आणि ज्या वेळीं मी खोलीच्या बाहेर पडलों त्या वेळीं तर मुद्दाम मला थांबवून म्हणाले, 'हें पहा, मी इथं नेहमीच फार कामांत असतों. तेव्हा विशेष कांही असल्यास तुम्ही माझ्या घरीं भेटत चला.' एकतर माझ्याशी फारच चांगल्या रीतीनं ते बोलल्यामुळं माझा राग विरून गेला होता. पण त्यांच्या शेवटच्या वाक्यानं तर रागाचा राहता राहिलेला अंशहि निघून गेला.

त्यानंतर त्यांच्या घरीं व ऑफिसांत सुद्धा कामानिमित्त मला बऱ्याच वेळां जावं लागलं. केव्हा पुस्तकासंबंधी, तर केव्हा कांही खाजगी शाळांच्या समितींचा सदस्य म्हणून अनेक वेळां मला त्यांच्याकडे जावं लागलं. प्रत्येक वेळीं त्यांनी माझ्या पुस्तकांचे गुणदोष मला दाखविले आहेत व ज्या शाळांच्या कार्यकारी मंडळांचा सदस्य म्हणून मी गेलों असेन त्या त्या शाळेच्या परिस्थितीसंबंधी त्यांनी मोकळ्या मनानं चर्चा करून योग्य तो सल्ला दिला आहे.

मला वाटतं, श्री. घाटे हे शिक्षक, मुख्याध्यापक, प्रकाशन संस्थेचा प्रतिनिधि—शिक्षणाशी संबंध असलेल्या कुणीहि इसमाची गाठभेट घ्यायला केव्हाहि तयार असतात. ऑफिसांत आणि घरीं जवळ जवळ आपलं दार त्यांनी सगळ्यांना मोकळं ठेवलं आहे. इतक्या मोकळेपणानं वागणारे हे पहिले शिक्षणाधिकारी, असं म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. सरकारी शिक्षणाधिकारी म्हणजे त्याच्यांत तुटकपणा भरपूर. श्री. घाटे यांनी हा शिरस्ता मोडला व शिक्षण व्यवसायांतील सगळ्यांशी ते स्नेहभावानं वागायला लागले.

श्री. घाटे यांना मी 'नवमतवादी' इन्स्पेक्टर म्हणतों. याचं कारण, पूर्वींचे इन्स्पेक्टर आणि श्री. घाटे यांच्या व्यक्तित्वांत, व्यासंगांत आणि दृष्टिकोनांत जमीनअस्मानाचा फरक आहे. पूर्वींचे बहुतेक इन्स्पेक्टर 'जड' असत. त्यांचा व्यासंग दांडगा, विद्वत्ता मोठी, शैक्षणिक ज्ञान श्रेष्ठ, आणि गांभीर्य जास्त; बोलायला ते मितभाषी, वर्गांत जाऊन संगमरवरी पुतळ्यासारखे बसणारे आणि यांची शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना भलतीच दहशत. यांची तपासणी म्हणजे शिक्षकांना आणि मुलांना एक दिव्यच.

उलट श्री. घाटे हे विद्वान्, व्यासंगी असूनहि 'जड' नाहीत. ते शिक्षकांबरोबर आणि विद्यार्थ्यांशी समरस होऊन त्यांच्याशी हितगुज करूं शकतात. ते वर्गांत पुढं बसून शिक्षकांना बिच-काविण्याऐवजीं आणि विद्यार्थ्यांना भेडसावण्याऐवजीं, मागल्या बाजूला गुपचूप येऊन बसतात, सर्व वर्गाचं योग्य तें निरीक्षण करतात, शिक्षकाचा पाठ लक्ष देऊन ऐकतात आणि आपलं मत ठरवितात. श्री. घाटे यांचं राज्य मुंबईच्या शाळांत सुरू

६३०८



झाल्यापासून पूर्वीची सुलतानशाही बंद होऊन तपासणी एका विशिष्ट शास्त्रीय पद्धतीनं होऊं लागली. श्री. घाट्यांचा दृष्टिकोन स्वतंत्र आणि क्रांतिशील असा आहे. त्यामुळं त्यांची तपासणी जास्त शास्त्रशुद्ध व शैक्षणिक तंत्राला धरून अशी होते. ते शाळांचे मार्गदर्शक आहेत, त्यांची भूमिका उपदेशकाची आहे, त्यांची वृत्ति फार सहानुभूतिमय आहे. त्यामुळंच शिक्षकांना त्यांच्याबद्दल आदर वाटतो, भीति वाटत नाही. त्यामुळंच शाळांना त्यांची तपासणी हवीशी वाटते. श्री. घाटे यांनी दोष–दर्शन केलं तरी कोणाला वाईट वाटत नाही. कारण ते छिद्रान्वेषी दृष्टीनं केलेलं नसतं.

श्री. घाटे हे साहित्यिक आहेत, शैक्षणिक विषयांवर अधिकारवाणीनं लिहिणारे लेखक आहेत, बालवाङ्मयाचे निर्माते आहेत. ते उत्कृष्ट क्रमिक–पुस्तकांचे कर्ते आहेत. 'कांही म्हातारे व एक म्हातारी' हें त्यांचं पुस्तक मराठी वाङ्मयांत केव्हाहि अविस्मरणीय ठरेल. या म्हाताऱ्यांत एका म्हातारीनं वयोवृद्धांना, बालकांना–सगळ्यांना मनस्वी हसवलं आहे. 'Teaching of History in Indian Schools' हा त्यांचा इतिहास हा विषय कसा शिकवावा या संबंधीचा शास्त्रीय ग्रंथ आहे. शिक्षणशास्त्रावर आपल्याकडील लेखकांनी फारच कमी ग्रंथ लिहिले आहेत. आमच्याकडे शिक्षणशास्त्रावर खोलवर विचार केलेलीं माणसं नाहींत अशांतला भाग नाही. पण अशा व्यासंगी माणसांत लेखनशक्ति कमी. श्री. घाटे यांनी आपल्या या ग्रंथांत इतिहास शिकविण्याचा नवीन दृष्टिकोन काय असावा, आधुनिक पद्धति काय आहेत, यांसंबंधी विचार प्रकट केले आहेत. श्री. घाटे यांनी पुरस्कृत केलेलीं सर्वच तत्त्वं शास्त्रज्ञांना पसंत पडतील असं माझं

म्हणणं नाही. पण या त्यांच्या ग्रंथावरून एक गोष्ट निर्विवाद दिसते. ती म्हणजे श्री. घाटे यांचा या विषयाचा व्यासंग. साधारणतः भक्कमशा अधिकाराची जागा मिळाली कीं माणूस आळशी बनतो. I. E. S. मधील कित्येक माणसं मला माहीत आहेत कीं ज्यांनी या भक्कम पगाराच्या जागा मिळाल्यावर आपलं वाचन–मनन सोडून दिलं. श्री. घाटे यांनी मात्र आपला व्यासंग अजूनहि चालू ठेवला आहे. याबद्दल खरोखरच त्यांची प्रशंसा केली पाहिजे. कारण इन्स्पेक्टर या नात्यानं त्यांना अतिशय काम असतं. यापुढेहि शिक्षणशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहून ते हिंदुस्थानच्या शिक्षणशास्त्राच्या दालनांत मौलिक भर घालतील अशी आशा आहे.

श्री. घाटे यांना मीं 'उत्कृष्ट क्रमिक पुस्तकांचे कर्ते' असं म्हटलं आहे. क्रमिक पुस्तकं संपादणं म्हणजे एक साधी गोष्ट आहे असं बऱ्याच जणांना वाटतं. पण वाटते तितकी कांही ती सोपी गोष्ट नाही. क्रमिक पुस्तकं लिहून श्री. घाटे यांनी थोडं फार धन जवळ केलं असलं तरी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारचं वाङ्मय दिल्याबद्दल पालक या नात्यानं आपण सर्वांनी त्यांचे आभारच मानले पाहिजेत. आपलं प्राथमिक शाळांतील, दुय्यम शाळांतील क्रमिक–पुस्तकरूपी वाङ्मय अतिशय जुनाट व हल्लीच्या परिस्थितीशी विषम असं असायचं. श्री. घाट्यांनी आपल्या पुस्तकांत आधुनिकत्व आणलं आहे. त्यांचीं क्रमिक पुस्तकं आजच्या परिस्थितीला धरून आहेत, बाल–बुद्धि-विकस-नाला योग्य अशीं आहेत, शिक्षणशास्त्राच्या सिद्धांतांना अनुसरून आहेत.

आम्ही गतानुगतिक लोक असल्यामुळं जुनं तें आम्हांला सोनं वाटतं. बापानं वाचलेलीं पुस्तकं मुलानं वाचलीं पाहिजेत हा आमचा आग्रह. विजेवर चालणाऱ्या गाड्या सुरू झाल्या तरी आम्ही पूर्वींच्या आगगाड्यांसंबंधी धडा वाचणार. युद्धाचं तंत्र संपूर्ण बदललं असलं तरी आम्ही पुरातन काळच्या युद्धाचं वर्णन वाचणार. पण ही दुराग्रही दृष्टि सोडली पाहिजे. जगांत जसा झपाट्यानं बदल होत आहे तसा बदल आमच्या क्रमिक पुस्तकांतहि झाला पाहिजे. आमच्या शालेय–वाङ्मयाला एक प्रकारचं प्रातिनिधिक व आधुनिक स्वरूप आलं पाहिजे. श्री. घाटे यांनी जें क्रमिक पुस्तकांचं वाङ्मय निर्माण केलं आहे तें असं प्रातिनिधिक व आधुनिक स्वरूपाचं आहे. आजचा जमाना श्री. घाटे यांनी त्यांत आणला आहे. त्यांची सर्वांत बहुमोल कामगिरी जर कोणती असेल तर हीच. पुढील पिढीला त्यांनी त्या दृष्टीनं योग्य मार्गदर्शन केलं आहे यांत शंका नाही.

मला श्री. घाटे यांची सर्वांत उत्कृष्ट कृति कोणती म्हणून विचारलं तर मी त्यांच्या ‘ कांही म्हाताऱ्यां ’कडे बोट दाखविणार नाही, किंवा Teaching of History या ग्रंथाकडेहि अंगुलीनिर्देश करणार नाही. मी त्यांचं ‘ माझें पुस्तक ’(बालवर्ग) हें सर्वांत उत्तम पुस्तक म्हणेन. तें एक अतिशय गोड पुस्तक आहे. चार सहा वर्षांच्या मुलांना मराठी भाषा तुम्हांला शिकवायची असेल तर या पुस्तकाइतकं सुंदर पुस्तक तुम्हांला सापडणं कठिण. कित्येक छोट्या बालकांना मीं तें शिकविलं आहे. त्यांना तें इतकं आवडलं कीं कांही पुसूं नका. या ‘ माझ्या पुस्तकां ’ ची मांडणी इतकी छान आहे, धडे इतके आकर्षक आहेत, चित्रं इतकीं मोहक आहेत आणि भाषा इतकी सोपी, साधी, गोड नि बालबोध

आहे कीं ती पांच मिनिटांत लहानग्या बाळाच्या जिभेवर बसते. वाङ्मयाच्या प्रांतांत श्री. घाट्यांची योग्यता काय ठरेल ती ठरो; पण 'माझें पुस्तक' ह्या क्रमिक पुस्तकाच्या निर्मितीनं श्री. घाटे यांनी बालकांना जो मेवा दिला आहे त्याची माधुरी मुलं कधींहि विसरणार नाहीत. 'माझें पुस्तक' ही त्यांची महनीय कामगिरी आहे. 'उत्कृष्ट क्रमिक पुस्तकांचे श्रेष्ठ निर्माते' हीच पदवी श्री. घाटे यांना या छोटेखानी पुस्तकाबद्दल बहाल करावी लागेल.

कांही वर्षांपूर्वीं श्री. घाटे यांनी बोर्डी येथे Refresher Course भरविला. हा कोर्स भरविण्यांत त्यांचा मुख्य हेतु हा होता कीं शिक्षक मंडळी एकत्र यावी, त्यांनी शैक्षणिक प्रश्नांची चर्चा करावी व त्यांना शिक्षणतज्ज्ञांकडून शैक्षणिक विषयांवर शास्त्रीय माहिती सुलभ व्हावी. हा Course फारच गाजला. फार परिश्रम घेऊन श्री. घाटे यांनी सर्व कार्यक्रम आखला होता. ही गोष्ट खरी आहे कीं बाई सोनाबाई हकिमजी हायस्कूलची उत्साही मंडळी हरेक कामांत मदत देत होती; तरी पण प्रत्येक गोष्टीची प्रेरणा श्री. घाटे यांच्याकडून होत असे. सगळ्या व्यवस्थेकडे श्री. घाटे यांचं जातीनं लक्ष असे.

आपल्याकडे Social Contacts फार कमी होतात. त्याचं कारण संमेलनं किंवा एकत्र बैठकी एकाच पेशाच्या लोकांतहि फार कमी होतात. त्या दृष्टीनं श्री. घाटे यांची ही योजना फारच उपयुक्त होती. सहा सात दिवस एकत्र राहणं झाल्यामुळं साहजिकच शिक्षकांची एकमेकांशी ओळख झाली व त्यामुळं त्यांच्यांत स्नेहभाव उत्पन्न झाला. त्याचप्रमाणें शिक्षणशास्त्र विशारदांनी आपले विचार शिक्षकांसमोर मांडल्यामुळं व प्रत्यक्ष

पाठ घेऊन दाखविल्यामुळं त्यांच्या ज्ञानांत भर पडली. प्रत्येक विषयावरचे आधुनिक विचार त्यांना कळले. आपण काय केलं पाहिजे याचं त्यांना चांगलं आकलन झालं.

ही योजना श्री. घाटे यांनी दरवर्षी चालू ठेविली असती तर शिक्षक वर्गाचा अतिशय महत्त्वाचा फायदा झाला असता. पण पैशाच्या मदतीच्या अभावीं त्यांची ही अपूर्व आणि उपयुक्त अशी योजना पहिल्या वर्षाच्या यशस्वी कार्यक्रमानंतर बंद पडली.

दुसरी त्यांची कामगिरी 'मुंबई भौगोलिक संघा'चे अध्यक्ष या नात्यानं. ह्या संघातर्फेहि, दरवर्षी एक Coure व Summer School हीं भरतात. त्या वेळीं हजर राहणाऱ्या शिक्षकांना भूगोल या विषयासंबंधी सांगोपांग माहिती दिली जाते. या विषयाकडे शाळांतून फारच दुर्लक्ष होतं. पण या संघानं जें कार्य चालविलं आहे त्यामुळं भूगोल विषयाला महत्त्व येऊन, त्याबद्दल शिक्षकांत व मुलांत जास्त आवड व कुतुहल उत्पन्न झाल्यावाचून राहणार नाही. श्री. घाटे यांच्या प्रोत्साहनामुळंच हें कार्य संघातर्फे उत्तम रीतीनं पार पडत आहे. कारण इतिहास हा जसा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे तसा भूगोल हा विषयहि त्यांचा अतिशय आवडता आहे. आणि मला भीति वाटते कीं ते मुंबई सोडून गेल्यानंतर जरी हा संघ बंद पडणार नाही–कारण संघाचे कार्यकर्ते उत्साही लोक आहेत–तरी पण त्यांत पूर्वीचं चैतन्य आणि जोम राहणार नाही.

मुंबई–शिक्षक-संघाला सुद्धा श्री. घाटे यांनी सारखी मदत केली आहे. ते महत्त्वाच्या सर्व कार्यक्रमांना हजर असतात. इतकंच

नव्हे तर वेळोवेळीं चालकांना निरनिराळ्या कार्यांत त्यांनी सक्रिय सहानुभूति दाखविली आहे.

थोडक्यांत मला एवढंच श्री. घाट्यांबद्दल म्हणतां येईल कीं, मुंबई डिव्हिजनमधील शैक्षणिक क्षेत्रांतील प्रत्येक लहान मोठ्या कार्यांत त्यांनी आपल्या अमदानींत अंतःकरणपूर्वक, झीज सोसून, हातभार लावला आहे. शाळांची तपासणी हेंच आपलं कार्य अशी संकुचित दृष्टि न ठेवतां आणि आपली पूर्वाश्रमींची 'शिक्षक' ही भूमिका न विसरतां, जी कांही विधायक शैक्षणिक कामगिरी करतां येईल ती श्री. घाटे यांनी केली आहे व त्याबद्दल मुंबई–डिव्हिजन-शिक्षकवर्ग त्यांचा केव्हाहि ऋणी राहील.

श्री. घाटे यांजकडे वर वर पाहिलं असतां वाटतं कीं ते गंभीर वृत्तीचे गृहस्थ असावेत. पण जरा जास्त काळजीपूर्वक त्यांचं अवलोकन केलं तर ते विनोदप्रिय, मिष्कील, दिलदार आणि उदार अंतःकरणाचे गृहस्थ आहेत असं पटल्यावाचून राहत नाही. माझा त्यांचा दाट परिचय नाही; पण जो कांही संबंध आलेला आहे त्यावरून मात्र मला असं वाटतं. कोणत्याहि गोष्टीची वा इसमाची विनोदपूर्ण बाजू त्यांना लवकर दिसते. बोलतांना सहज त्यांच्या तोंडून खोडसाळ टीका निघून जाते. थोड्या अंशीं ते लहरी असावेत अशी माझी कल्पना आहे. पण कोणाचंहि नुकसान करायचे नाहीत, कुणालाहि उगाच त्रास द्यायचे नाहीत, कुणाच्याहि उगाच वाटेला जायचे नाहीत, असा त्यांच्या मनाचा कल असतो असा माझा कयास आहे.

'श्री. घाटे यांना माणसांची चांगली पारख आहे. त्यांच्या आयुष्यांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीबद्दल त्यांनी आपल्या मनांत

खूणगाठ बांधलेली असते. पण त्यांचा असा मात्र बाणा आहे कीं प्रत्यक्ष शत्रूवरहि उपकार करायचे. होतां होईल तों लोककल्याणासाठी झटायचं ही आपली भूमिका त्यांनी जवळ जवळ ठरवून टाकली आहे.' असं 'त्यांचे एक निकटचे स्नेही मला नुकतेच म्हणाले होते. त्यांच्या मुद्रेवरहि हें स्पष्ट दिसतं.

श्री. घाट्यांचे अनेक मित्र माझ्या परिचयाचे आहेत. ते मला नेहमी सांगत असतात कीं घाट्यांसारखा मित्र मिळणं कठीण. लहानमोठा हा भेद् श्री. घाटे यांच्याजवळ नाही. सर्व मित्र त्यांना सारखे. सर्वांवर त्यांची सारखी भक्ति. सर्वांशी स्नेहसंबंध कायमचा.

श्री. घाटे, सौ. घाटे व त्यांचीं मुलं यांना दोन तीन वेळां मीं एकत्र पाहिलं आहे. सौ. घाटे यांचा प्रसन्न पण अधिकारी चेहरा, सार्वजनिक कार्यक्रमप्रसंगीं आत्मविश्वासपूर्ण आणि सोज्वळ वागणूक पाहून कोणालाहि त्यांच्याबद्दल आदर वाटेल. त्यांचीं मुलं सुद्धा इतकीं खेळकर दिसतात कीं सौ. घाटे यांनी 'माता' आणि 'शिक्षिका' या नात्यानं त्यांची फारच चांगली जोपासना केली असावी असा तर्क केल्यास अयोग्य होणार नाही. सुविद्य पत्नीचा लाभ झाल्यामुळं श्री. घाटे यांना घरच्या जबाबदारींतून बरीचशी मोकळीक मिळत असावी. व त्यांच्या शैक्षणिक कार्यांत सुद्धा त्यांना सौ. वत्सलाबाईंची मदत मिळत असली पाहिजे.

श्री. घाट्यांच्या जीवनाकडे सर्व बाजूंनी दृष्टि टाकली तर ते एक सुदैवी आणि कर्तृत्ववान् गृहस्थ आहेत असंच म्हणावं लागेल. शिक्षणखात्यांत अतिशय महत्त्वाचा हुद्दा, सुविद्य, सुशील आणि कर्तृत्ववान् अशी पत्नी, आणि गोड मुलं; महाराष्ट्रीय,

गुजराथी, पारशी, मुसलमान अशा अनेक समाजांतील मित्र, वाङ्मयांत चांगलं स्थान, शिक्षण-शास्त्रज्ञांत वरचा दर्जा आणि लोकप्रियतेचा अपूर्व वर्षाव—म्हणूनच मीं म्हटलं कीं श्री. घाटे सुदैवी आहेत आणि कर्तृत्ववानहि आहेत. लोकोत्तर गुण असल्याशिवाय माणसाला लोकप्रियता मिळणं कठीण. श्री. घाटे यांनी जी लोकप्रियता मुंबई डिव्हिजनमध्ये मिळविली आहे तिला त्यांच्या आंगचे हिऱ्यामोत्यांसारखे गुणच कारण आहेत.

ता. १ जूनला श्री. घाटे गुजराथला जाणार. श्री. घाटे जितके मुंबई डिव्हिजनला प्रिय आहेत तितकेच ते गुजराथेंतहि लोकप्रिय होतील. श्री. घाटे जितके महाराष्ट्रीयांशी समरस होतात तितकेच गुजराथी बंधूंशीहि समरस होऊं शकतात. याचं कारण, ते जातीनं महाराष्ट्रीय असले तरी, गुजराथशी त्यांचा पूर्वीपासून निकट संबंध आला आहे, गुजराथी भाषा ते चांगल्या रीतीनं बोलूं शकतात व गुजराथी वाङ्मयांतील कांही लेखक त्यांचे जिवाभावाचे मित्र आहेत. मुंबईची त्यांची कारकीर्द यशस्वी झाली आहे, व गुजराथेंतहि ते उत्तम रीतीनं यशस्वी होतील अशी माझी खात्री आहे.

शिक्षणक्षेत्रामध्ये अनुभवी आणि वयोवृद्ध अशा एका शिक्षण-शास्त्रज्ञांना मीं एवढ्यांतच प्रश्न केला, 'का हो, श्री. घाटे यांनी शिक्षणक्षेत्रांत जें यश मिळविलं आहे त्याचं इंगित काय?'

ते म्हणाले—मला वाटतं, श्री. घाटे हे मुळांत शिक्षक आहेत. मोठा अधिकार मिळाला म्हणून ते हुरळून गेलेले नाहीत. हातांत सत्ता आहे म्हणून ते सुलतानशाही करीत नाहीत. त्यांच्या लोकप्रियतेचं इंगित हेंच कीं ते 'शिक्षक' ही आपली भूमिका

कधीहि विसरलेले नाहीत व विसरणार नाहीत. शिक्षणासंबंधी त्यांना अतिशय कळकळ आहे. आणि सरकारी नोकरी असून सुद्धा त्यांची वृत्ति एका निस्सीम समाजसेवकाची आहे.'

मला वाटतं, वरील शब्दांत श्री. घाटे यांच्या यशाचं मोठं मार्मिक पृथक्करण करण्यांत आलं आहे. हो, हें अगदी खरं आहे कीं, श्री. घाटे यांचा जन्म शिक्षणकार्यासाठीच झालेला आहे आणि त्या क्षेत्रांत ते बहुमोल, भरीव आणिं दांडगी कामगिरी केल्याशिवाय कधीहि राहणार नाहीत.

१ मे १९४१, समीक्षक

★

## श्री. माडखोलकरांचं रमणीय गृहजीवन

माझे स्नेही प्रो. विठ्ठलराव कुळकर्णी यांची चिठी घेऊन प्रथमतः मी श्री. माडखोलकरांच्या घरीं उतरण्यासाठी गेलों. त्या वेळीं चिटणीसपुऱ्यांत चाळीवजा घरांत चार खोल्यांच्या ब्लॉकमध्ये ते राहात असत. मी त्यांच्या घरीं पोहोचलों तेव्हा श्री. माडखोलकर कामावर गेले होते. सौ. शांताबाई माडखोलकर घरीं होत्या. त्यांनीच मला उतरवून घेतलं व माझी व्यवस्था लावून दिली. दुपारीं १२ वाजतां श्री. माडखोलकर 'महाराष्ट्र' कचेरींतून जेवणासाठी आले तेव्हा आमची पहिली भेट झाली. औपचारिक प्रश्नावली दोन्ही बाजूनं पुरी झाल्यावर त्यांनी माझ्याशी निरनिराळ्या विषयांवर किती तरी बातचीत केली. मोठ्या कौशल्यानं माझा पेशा, नागपूरला येण्याचा माझा उद्देश वगैरे इत्थंभूत माहिती काढून घेतली; व मी कशा रीतीनं माझ्या कार्यास प्रारंभ करावा, शिक्षणक्षेत्रांतील वऱ्हाड-मध्यप्रांताकडचा रागरंग, नागपूर हायस्कूल बोर्ड व विश्वविद्यालयांतील राजकारण यांसंबंधी मला साद्यंत माहिती दिली. 'माझ्याकडून सर्व प्रकारची मदत तुम्हांला मिळेल' म्हणून त्यांनी मला अश्वासनाहि

दिलं व तें शब्दशः खरं केलं. मी नागपूरला गेलों तेव्हा अनोळखी गृहस्थ या नात्यानं श्री. माडखोलकरांकडे गेलों. पण प्रथमपासून त्यांनी इतकं जिव्हाळ्यानं मला वागविलं व इतकी मला मदत केली कीं त्यामुळं आमची चांगलीच गट्टी जमली, व ती दिवसें-दिवस सारखी वृद्धिंगत होत आहे.

आमची पहिली भेट चाळीवजा घरांत झाली. दुसऱ्या खेपेस श्री. माडखोलकरांनी घर बदललं होतं. ते नव्या शुक्रवारींत 'गणेश-भवन' या प्रशस्त इमारतींत राहायला आले होते.ही दुमजली इमारत टुमदार होती. खालच्या बाजूस जुन्या पद्धतीची बैठक, जेवणघरं, देवघर, स्वयंपाकघर, आंघोळघर आणि मागल्या बाजूस एक प्रशस्त सामानघर होतं; व दिवाणखाना, श्री. माडखोलकरांची खोली, मुलांची व सौ. शांताबाईंची खोली, त्या पलीकडे गच्ची व गच्चीला लागून पाहुण्यांची खोली होती.

श्री. माडखोलकर मला या 'पाहुण्यां'च्या खोलीकडे घेऊन आले व हसत हसत म्हणाले, 'कवि यशवंत नुकतेच या खोलींत सहकुटुंब राहून गेले आहेत. तुम्ही माझे दुसरे मित्र या खोलींत उतरणारे.' मी नुसता हसलों. माझ्या मनाला मात्र सहज विचार चाटून गेला—श्री. माडखोलकर चाळीवजा घरांतून प्रशस्त भवनांत आले आहेत; पुढल्या खेपेस त्यांच्या मालकीच्या घरांत उतरण्याचा मोका यायचा.

आणि खरोखरीच त्यानंतर मी पुनश्च नागपूरला गेलों आणि मॉडेल मिल्स रोडवर, शुक्रवार तलावाजवळ, श्री. माडखोलकरांच्या मालकीचं बंगलीवजा घर मला पहायला मिळालं. भाडोत्री घरांत राहाणारे श्री. माडखोलकर 'घरवाले' बनलेले दिसले. जसे

वाङ्मयांत आस्ते आस्ते मानमान्यता मिळवून आज ते एक प्रभावी लेखक गणले जात आहेत तसेच त्यांनी आपल्या आयुष्यांतील आर्थिक उर्जितावस्थेचे टप्पे पायरी पायरीने गाठले आहेत.

लहानपणीं ते गर्भश्रीमंतींत लोळले. तरुण वयांत उपजीविकेसाठी त्यांची धडपड सुरू झाली. नागपूरस्थ झाल्यावर ' महाराष्ट्र ' चे सहसंपादक म्हणून त्यांनी प्रतिष्ठा मिळविण्यास प्रारंभ केला. याच काळांत ते एक खंदे लेखक म्हणून पुढे आले व त्यांच्या वाङ्मयीन यशाबरोबरच त्यांच्या आर्थिक उत्कर्षास प्रारंभ झाला. श्री. माडखोलकरांच्या भरभराटीच्या काळास या त्यांच्या मालकीच्या घरानं सुरवात झाली आहे. त्यांचं जीवन वाङ्मयीन असून सुद्धा व्यवहार ते विसरलेले नाहीत; आणि सरस्वतीच्या गळ्यांतले ताईत बनून सुद्धा लक्ष्मीचा त्यांच्यावर वरदहस्त आहे.

लेखक आणि दारिद्र्य यांचं सख्य जास्त. पण श्री. माडखोलकरांनी लेखनबहाद्दरीनं जसा वाङ्मयीन जगांत उच्च दर्जा मिळविला आहे, तसाच नागपुरांत स्वतःचं घर बांधून ' सुसंपन्न रहिवाशी ' अशी संज्ञा आपणास प्राप्त करून घेतली आहे.

श्री. माडखोलकर हे घरजावई आहेत. स्वतःच्या घरचे एकटेच असल्यामुळं लग्न झाल्यानंतर ते श्वशुरगृहीं राहूं लागले. नव्याजुन्याचा सुंदर मिलाफ त्यांच्या घरीं दिसून येतो. खाली सारं बाळबोध वळण तर वर सगळा आधुनिक प्रकार. शेतावर गेलेले नसले तर त्यांचे श्वशुर व सासूबाई, सौ. शांताबाईच्या आत्याबाई, चंद्रशेखर व मीनाक्षी आणि सौ. शांताबाई खाली वावरत असतांना दिसतील, तर श्री. माडखोलकरांचा सारा वावर वर.

जेवणापुरते ते खाली उतरतात. खाली संकष्टी, पोळा, महालक्ष्म्या वगैरे धर्मकृत्यं अखंड चालू असायचीं तर वर त्यांची माहितीहि नसायची. श्री. माडखोलकर या धर्मकृत्यांस हातभार लावतात तो फक्त सुग्रास अन्नावर ताव मारण्याचा. ते अधार्मिक नाहीत, पण धर्मकृत्यांपासून मात्र पूर्ण अलिप्त असतात. नवल वाटतं तें हेंच कीं एकाच घरांत हे 'सनातनी' आणि 'आधुनिक' प्रकार चालतात तरी कसे? याला कारण सौ. शांताबाई आहेत. खालच्या 'जुन्या' कारभारांत त्या जुन्या आहेत तर वर त्या शंभर टक्के नवमतवादी म्हणून वागतात. सोवळं नेसून ब्राह्मणांना वाढणाऱ्या या सनातनी बाई वर आल्या कीं स्त्री-पुरुषांच्या संमिश्र समाजांत बसून नाना विषयांवर मनमुराद गप्पा मारतील, आपलीं प्रागतिक मतं निर्भयपणें तुम्हांसमोर मांडतील आणि प्रसंगीं आपल्या पुरोगामी विचारांनी तुम्हांला आश्चर्यचकित करून सोडतील.

श्री. माडखोलकरांच्या या आधुनिक-सनातनी वातावरणांत छद्मीपणाचा मात्र लवलेश नाही. सारा खुला कारभार. खालच्या सनातनी कारभारांत वरची मंडळी मन घालायची नाही, वरच्या आधुनिक वातावरणांत खालची मंडळी फिरकायची नाही.

सौ. शांताबाई बाळबोध वळणांतल्या असल्या तरी श्री. माडखोलकरांच्या सहवासामुळं नवमतवादी बनल्या आहेत. माडखोलकरांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळं त्यांच्यांत हें स्थित्यंतर होणं साहजिकच आहे; पण माडखोलकरांना इतकं श्रेय दिलं पाहिजे कीं सौ. शांताबाईंचं स्वतंत्र व्यक्तित्व त्यांनी बिलकूल लोपूं दिलेलं नाही. उलट त्यांनी त्यांच्या व्यक्तित्वाचं काळजीपूर्वक संगोपन केलं आहे. स्वयंपाकघराच्या पलिकडे जग नाही, ही

संकुचितता श्री. माडखोलकरांच्या घरीं नाही. स्त्रीविकासास योग्य अशी स्वतंत्रता व समता त्यांनी सौ. शांताबाईंस बहाल केली आहे. केव्हा केव्हा श्री. माडखोलकर व सौ. शांताबाई यांच्या विचारांत विसंवादी सूर तुम्हांला ऐकूं येतील. पण त्यामुळं त्यांच्या सुखी संसारांत दुःखाची सावली मात्र कधींहि पडलेली नाही.

श्री. माडखोलकर स्वतः मॅट्रिकपलिकडे शिकलेले नाहीत. पण सौ. शांताबाई बी. ए. झाल्या पाहिजेत हा त्यांचा कटाक्ष. अजूनहि 'बाईसाहेबांनी बी. ए. झालं पाहिजे' असं सारखं ते घोकीत असतात. विश्वविद्यालयीन शिक्षण त्यांना स्वतःला घेतां आलं नाही तर पत्नीला त्यांनी तें दिलं आहे, आग्रहानं घ्यायला लावलं आहे. तेवढ्याच आग्रहानं ते बाईसाहेबांना वाद्यं वाजवायला उत्तेजन देतात, बॅड्मिंटन खेळायला प्रोत्साहन देतात, बोटींग शिकवितात, भारतीय महिला परिषदेला, प्रांतिक महिला परिषदेला पाठवितात, अनेक सामाजिक चळवळींत भाग घ्यायला लावतात; हेतु हा कीं त्यांच्याहि हातून कांही तरी विधायक कामगिरी व्हावी; सौ. शांताबाईंचंहि एक स्वतंत्र क्षेत्र असावं नि त्या क्षेत्रांत काम करून त्यांनी नांव कमवावं.

आज सौ. शांताबाई एका मुलींच्या इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका आहेत. त्यांची बुद्धि तीव्र आणि ग्राहक आहे. त्या शांत, सुस्वभावी, अंतर्मुख व थोड्याशा हट्टी आहेत. सगळ्यांशीच त्या मोकळेपणानं बोलतील कीं नाही हें सांगणं कठीण. पण आवडीच्या माणसांशी मात्र त्या मोकळेपणीं बोलतात. शिक्षणाची त्यांना फार आवड आहे. स्वतंत्र कार्य करण्याची फार हौस आहे. त्या खूप वाचतात, खूप श्रवण करतात. श्री. माडखोलकरांच्या लिखाणावर त्या मार्मिक टीका करतात. श्री. माडखोलकरांनी लिहिलेला शब्द न्

शब्द त्यांनी वाचलेला आहे, आणि जिथं जिथं त्यांची विचारसरणी, कल्पना अगर विशिष्ट प्रसंग सौ. शांताबाईंना पसंत पडलेला नाही तिथं तिथं त्यांनी श्री. माडखोलकरांना तसा इषारा दिला आहे. श्री. माडखोलकरांचे व्यवहार योग्य वा अयोग्य याचं त्यांना पूर्ण आकलन असतं. त्यांचे कोठले मित्र सच्चे व कोठले भोंदू याची त्यांनी अगोदरच खूणगांठ बांधलेली असते. आणि त्यांचे तर्क व भाकितं हरहमेश खरीं ठरतात. श्री. माडखोलकरांनी आपला बंगला, 'शांता-निवास' हें नांव देऊन, सौ. शांताबाईंच्या नांवावर चढविला आहे, याचं कारण हेंच कीं आपल्या पत्नीच्या बहुमोल मदतीचं कांही तरी सदैव दृष्टीसमोर असणारं प्रतीक असावं.

जी आस्था श्री. माडखोलकर 'बाईसाहेबां'च्या स्वतंत्र भवितव्याबद्दल दाखवितात तीपेक्षा कांकणभर जास्त काळजी ते आपल्या मुलांच्या शिक्षणाबद्दल घेत आहेत. श्री माडखोलकरांचे लहानपणीं अति लाड झाले. या प्रेमामुळं ते पंगु व परावलंबी बनले आहेत. त्यांच्यांतील हे व इतर दोष आपल्या मुलांत उतरू नयेत म्हणून जबाबदार पालक या नात्यानं ते मुलांना अतिशय जपतात. या बाबतींत सौ. शांताबाई सुद्धा आपली जबाबदारी अतिशय कसोशीनं पार पाडतात. नागपूरच्या माझ्या दर सालच्या वारींत गांठी-भेटी झाल्या कीं पुष्कळ वेळां आम्ही 'संसारी' गोष्टी बोलतों. त्या वेळीं ते एकदा तरी हटकून म्हणतीलच— 'उमाकांत, आमचा बबड्या (चंद्रशेखर) आणि मीनाबाई (मीनाक्षी) यांना उत्तम शिक्षण देण्याची तीव्र इच्छा मला आहे. अहो, आपण जे इतके धडपडतों, झगडतों, पैसे मिळविण्यासाठी जीवाची आटापीट करतों, त्याचा सदुपयोग मुलांना सुशिक्षण देण्यासाठी करायचा नाही तर मग या खटाटोपाचा उपयोग काय ?'

चि. चंद्रशेखर व मीनाक्षी नागपूरच्या अत्युत्तम शाळेंत जातात. यामुळं श्री. माडखोलकरांना फार खर्च पडतो, पण तो ते आनंदानं सोसतात. मुलांचे सगळे योग्य लाड ते राजीखुषीनं पुरवितात. त्यांच्या बुद्धीचं योग्य विकसन व्हावं म्हणून पुस्तकी विद्या शाळेंत चालू असतां त्यांना व्यवहारी ज्ञान ते भरपूर देत असतात. गांव-परगांवचीं सुंदर स्थळं दाखविणं, सर्कसला नेणं, त्यांच्या कुतुहलपूर्ण प्रश्नांस समर्पक उत्तरं देणं, खेळ खेळण्यास उत्तेजन देणं, गाणं-बजावणं शिकविणं, सर्वसाधारण विषयांची मनोरंजक माहिती देणं, चांगल्या सवयी लावणं, अशा अनेक गोष्टी ते व सौ. शांताबाई आपल्या चिरंजीव-चिरंजीवीसाठी करीत असतात. त्या दोघांनीहि घेतलेल्या काळजीमुळं बाळ चंद्रशेखर मोठा बहुश्रुत व मीनाक्षी मोठी चुणचुणीत बनलीं आहेत. श्री. माडखोलकरांचं दोघांवरहि अमर्याद प्रेम. मीनाताईला ते दिवसांतून कितीक वेळां कुरवाळतात, पापे घेतात, तिच्यासाठी ससा बाळगतात, त्याचं कौतुक करतात. चिडतातही ते मुलांवर त्यांनी हुल्लड केली म्हणजे. हाकलून लावतात त्यांना खाली. पण ही चिडाचिड ते लगेच विसरतात, आणि पुन्हा मुलांशी समरस होतात. आत्याबाई मुलांना सांभाळतात, आजोबा व आजी नातवंडांचं कोडकौतुक करतात, सौ. शांताबाई त्यांची देखभाल ठेवतात; पण श्री. माडखोलकर अहोरात्र त्यांचा बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक विकास योग्य पद्धतीनं होत आहे कीं नाही याकडे डोळ्यांत तेल घालून पाहात असतात. वाङ्मयीन जीवन म्हणजे अविश्रांत श्रम; पण आपली पालकाची भूमिका ते कधीहि विसरत नाहीत.

चार वर्षांपूर्वीचा प्रसंग. श्री. माडखोलकरांच्या घरीं श्री. डांगे, निंबकर, कर्णिक आणि मी एकाच वेळीं उतरलों होतों. तत्पूर्वी

सौ. शांताबाई कशाळकर तिथं येऊन गेल्या होत्या. कवि यशवंत व त्यांच्या पत्नी यांनीहि कांही दिवस त्यांचा पाहुणचार घेतला होता. तेंहि जोडपं निघून गेलं होतं. आम्हां चौघांचाहि दृष्टिकोन निरनिराळा. डांगे, निंबकर व कर्णिक यांच्यांतहि तीव्र मतभेद. पण तरीहि श्री. माडखोलकर या सर्वांचं आदरातिथ्य इतक्या प्रेमळपणें करीत होते कीं आम्हांपैकी एकालाहि असं वाटणं शक्य नव्हतं कीं ते अमुक एका व्यक्तीबद्दल जास्त तत्पर आहेत. सर्वांशी सारखाच मोकळेपणा. सर्वांना सारखाच आदरसत्कार.

मी त्यांना एकदा विचारलंहि, 'का हो, इतक्या निरनिराळ्या धंद्यांतील लोकांना घरीं उतरवून घेऊन त्यांच्याशी तुम्ही समरस तरी होऊं कसे शकतां? तुमच्या मागे कामाचा लकडा असूनसुद्धा ही पाहुण्यांची ब्याद सारखी तुमच्या मागे कां लावून घेतां?'

'मला सर्व जातींचे व निरनिराळ्या धंद्यांतले मित्र असावेत म्हणजे माझ्या एकांगी जीवनाला पूर्णता येईल असं मला सारखं वाटतं,' असं त्या वेळीं मला श्री. माडखोलकरांनी गंभीरपणें उत्तर दिलं होतं.

श्री. माडखोलकरांच्या घरीं सदा न् कदा पाहुणे हे असायचेच. घरीं उतरायला नसले तरी चहाला, नाही तर जेवायला, रोज नवीन लोक हमखास येतात. साहित्यिक, समाजसत्तावादी, व्यापारी, राजकारणी, धार्मिक, नास्तिक, समाजसुधारक, हिंदुसभावाले, कॉंग्रेसवाले–अठरापगड लोक तुम्हांला त्यांच्याकडे उतरायला अथवा जेवायला आलेले सापडतील. तुम्ही साहजिक म्हणाल कीं, वर्तमानपत्राच्या धकाधकीच्या धंद्यांत पडलेल्या, लेखनांत सदैव मग्न असलेल्या या गृहस्थास पाहुण्यांच्या व्यवस्थेसाठी वेळ तरी कसा मिळतो? पण गम्मत ही आहे कीं आपलं एक

मिनिटहि फुकट न दवडतां ते पाहुण्यांच्या सुखसोयीकडे बारकाईनं पाहतात, त्यांना शक्य होईल तेव्हा खूप गप्पा मारतात आणि आपल्या आग्रही आतिथ्यानं अतिथींना जर्जर करतात.

बिनडौलाची राहणी, सुग्रास अन्न, काव्यशास्त्रविनोद आणि मोकळं वातावरण, हें श्री. माडखोलकरांच्या आतिथ्याचं वैशिष्ट्य होय. ते सकाळीं ५॥-६ ला उठतात व तुम्हांलाहि प्रेमळपणें हाक मारून उठवितात. सकाळीं लवकर न उठणाऱ्या माझ्यासारख्या माणसास ही हाक बऱ्याच वेळां जाचक झाली आहे. तरी पण श्री. माडखोलकरांच्या गोड व खुसखुशीत संवादामुळं आणि गरम गरम चहामुळं माझी झोप सव्याज भरून निघाली आहे. घरांत असतां त्यांचा कांहीहि उद्योग चालू असो, ते तुमच्याशी नाना विषयांवर पुष्कळ गप्पा मारतील. जेवतांना, दूरवर फिरतांना, रात्रौ स्वच्छ चांदण्यांत शुक्रवार तलावाच्या काठीं, ते आपल्या रसाळ गप्पांनी तुम्हांला रिझवतील. श्री. माडखोलकरांच्या संवादांत बुद्धीची चमक, त्या त्या विषयाची प्रगल्भ माहिती, अनेक गौप्यांचा स्फोट, विनोद, उपरोध आणि अतिशयोक्ति असते. त्यांच्या गप्पांचा ओघ सुरू झाला म्हणजे तुम्ही अगदी रंगून जाल. श्री. माडखोलकरांना गप्पा मारण्यास mood लागत नाही. गप्पांसाठी ते केव्हाहि ताज़ेतवाने असतात.

श्री. माडखोलकर जसे स्वत: खूप बोलतात, तसे तुम्हांलाहि बोलायला लावतात. ब्लॉटींग पेपर अथवा स्पंज जशी शाई व पाणी शोषून घेतो तद्वत् ते तुम्हांला शोषून घेतात. तुमचीं सगळीं गुह्यं काढून घेतात. तुमच्या हृदयाचा ठाव घेतात. यांत त्यांचा वाईट हेतु नसतो. केवळ आपल्याला मनुष्यस्वभावाचं योग्य दर्शन, अभ्यसन आणि आकलन व्हावं म्हणूनच ते तुमच्या

पोटांत शिरतात. त्यांच्या या अभ्यासाचे त्यांच्या लेखनांत कुठं तरी ठसे उमटत असतील, नाही असं नाही; पण नक्की कुठं तुमचा उपयोग झाला हें मात्र कळणं कठीण.

कितीहि पाहुणे घरीं असले तरी श्री. माडखोलकर आपला आखीव कार्यक्रम सोडीत नाहीत. त्यांचं वाचन, मनन, लेखन, व्यायाम, आसनं–सर्व कांही बिनविरोध चालू असतं. कार्यक्रमांत फेर एवढाच कीं तुमच्या संगतींत खूप फेरफटका करतील व रात्रौ तासन् तास शुक्रवार तलावावर बसून हितगुज करतील. केव्हा केव्हा पहाटेपर्यंत सुद्धा ते माझ्याशी बोलत बसले आहेत. हीं जागरणं त्यांना सहन कशीं होतात याचंच मला नवल वाटतं. रात्रौ दोन तीन वाजतां झोपलेले श्री. माडखोलकर पुनश्च सकाळीं सहा वाजतां गप्पांची फेर उडविण्यासाठी ताजेतवाने असतातच.

मित्रमंडळीशी गुजगोष्टी आणि पाहुण्यांशी संवाद हे श्री. माडखोलकरांच्या आयुष्यांतील सुखाचे क्षण आहेत. बाकी त्यांचं आयुष्य म्हणजे धकाधकीचा मामला.

एकदा लाहोरच्या मुक्कामांत एल्फिन्स्टन हॉटेलमध्ये एका फ्रेंच बाईचा व माझा परिचय झाला. ती वेळ असला कीं गप्पा मारण्यासाठी माझ्या खोलींत येऊन बसे. एके दिवशीं माझा आल्बम तिच्या हातीं लागला. फोटो चाळतां चाळतां तिनं चेहरेपट्टीवरून एकेकाचं स्वभावचित्र सांगायला सुरवात केली. वेळ मजेंत जावा म्हणून शक्कल काढली होती तिनं. चुरचुरीत वर्णन करायची एकेकाचं.

श्री. माडखोलकरांचा फोटो पाहिल्यावर ती म्हणाली–' सुंदर चेहरा आहे हा. चित्रकार, गवई आणि तत्त्वज्ञानी यांचा त्रिवेणी संगम ह्या चेहऱ्यांत दिसतो. या गृहस्थानं केसांच्या बाबतींत

हलगर्जीपणा दाखविला असता, हवे तसे त्यांना वाढूं दिले असते तर यांचे काव्यमय भव्य डोळे आहेत त्यापेक्षा जास्त उठावदार होऊन शेले, बर्न्स, स्टीवनसन् सारखे ते दिसले असते–म्हणजे कवीचा चेहरा झाला असता त्यांचा. त्यांनी केसांना मागे वळण दिलं असतं, थोडा कुरळेपणा आणला असता तर एखाद्या आधुनिक ऑपेराचे Music Director ते शोभले असते; पण आजच्या त्यांच्या क्लोज क्रॉपमुळं ते एक तत्त्वज्ञानी वाटतात मला. तत्त्वज्ञानी म्हणजे गूढ तत्त्वं शोधून काढणारे, असंच कांही नव्हे. कोणत्याहि प्रकारची त्यांची कलाकृति असली तरी त्यांत तात्त्विक विचार हा असणारच. त्यांची कादंबरी असली तरी तींत कांही तरी विशिष्ट तत्त्वाचा पुरस्कार त्यांनी केलेला असायचा. पण मला हें सांगा–खरोखरी ते कोण आहेत ? मोलमजुरीवाले कीं मालगुजार ? Mechanic कीं Modernist ? '

मीं म्हटलं, ' ते Modernist आहेतच, त्याबद्दल शंका नाही. त्यांचा खरा पेशा मात्र वर्तमानपत्रकाराचा. चांगले कादंबरीकार आहेत मराठींतले ते.'

गम्मत म्हणून ती बाई म्हणाली होती कीं श्री. माडखोलकरांच्या चेहरेपट्टींत ' Artist, Musician and Philospher ' असा त्रिवेणीसंगम सापडतो. वास्तविक तेंच श्री. माडखोलकरांचं वर्णन करतां येईल. त्यांच्या चेहऱ्यांत सारा त्यांचा मोठेपणा दिसून येतो. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलं कीं त्यांच्यांत एक प्रकारचा निराळेपणा दिसतो. 'असामान्य व्यक्ति' म्हणून कोणीहि त्यांना सहज म्हणेल त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर. केस नीटनेटके विंचरलेले, विस्तृत भालप्रदेश, टप्पोरे काव्यमय डोळे, सदा गंभीर वृत्ति, रेखीव टोकदार नाक, वळणदार गाल आणि महत्त्वाकांक्षा

सुचविणारे ओठ--सूक्ष्म अवलोकन केल्यास साधारणत: अशा प्रकारचं श्री. माडखोलकरांच्या चेहरेपट्टीचं वर्णन करतां येईल. बाकी त्यांच्या शरीराकडे पाहिल्यावर, एक बेडौल साधा सुधा माणूस, असंच म्हणावं लागेल. पोषाखाच्या बाबतींत ते अतिशय निष्काळजी आहेत. औपचारिक वर्तनांत ते अतिशय ढिले व गांगरून जाणारे आहेत. त्यांचं आधुनिकत्व त्यांच्याकडे पाहून ठरवायचं असेल तर मात्र बऱ्याच जणांची निराशा होईल. त्यांच्या कादंबरींत जी कलात्मकता दिसते, त्यांच्या गद्यांत केंव्हा केंव्हा काव्याचे जे पडसाद ऐकूं येतात आणि मानव जातीच्या करामतीचं सूक्ष्म अवलोकन करून जे जे सिद्धान्त ते आपल्या कादंबरींत प्रच्छन्न रीतीनं गुंफत असतात त्या सगळयांचं सारसर्वस्व त्यांच्या चेहऱ्यांत भरलेलं दिसतं, इतका तो प्रभावी चेहरा आहे. चेहरा झाका, श्री. माडखोलकर एक गांवढळ, बेंगरूळ माणूस वाटतील.

यंत्रासारखं त्यांचं सारं आखीव काम आहे. एकदा कधी तरी त्यांनी आपल्या आयुष्याचा आराखडा करून ठेवला आहे. त्याबरहुकूम सर्व कार्यक्रम त्यांनी यशस्वी रीतीनं पार पाडला आहे. 'अमुक वेळेला मी अमुक अमुक कादंबरी लिहिणार' म्हणून ते मला सांगतात, आणि बरोबर सांगितल्या वेळीं ते ती पुरी करतात. हा जो त्यांच्यामध्ये यांत्रिक आखीवपणा आला आहे त्याचं कारण त्यांची academic वृत्ति आणि महत्त्वाकांक्षा. त्यांच्या ह्या वृत्तीमुळं त्यांच्या वाचनांत, अवलोकनांत व मानवी स्वभावाच्या सखोल अभ्यासांत कधींहि खळ पडत नाहीं. त्यांची महत्त्वाकांक्षा कीर्तिशिखर गाठण्यासाठी त्यांना अविश्रांत श्रम घ्यायला लावते.

कोठल्याहि गोष्टीकडे ते अभ्यासू वृत्तीनं पहात असतात. दारुड्यांच्या अड्डयांत ते जाऊन बसतील; Dance-halls मध्ये ते रात्रीच्या रात्री घालवतील; ब्रँडन, माऊंट, एम्पायर, या नागपूरच्या प्रमुख हॉटेलांत इंग्रजी पद्धतीचा खाना घेतील; बदफैली लोकांच्या संगतींत वेळ घालवतील; या नाही त्या कामासाठी प्रवास करून निरनिराळीं स्थळं पाहून घेतील. हेतु हा कीं या सर्वांचा आपल्या कादंबऱ्यांत उपयोग करतां यावा. त्यांच्या स्वभावाची अशी कांही विशेष ठेवण आहे कीं ते व्यसनाधीन होऊंच शकत नाहीत. कोठल्याहि वस्तूची त्यांना आसक्ति वाटत नाही. त्यामुळं मी त्यांना विनोदानं नेहमी म्हणतों, 'तुम्ही एखाद्या विषयांत रंगणं कठीण. दारू कशी पितात याची माहिती तुम्हांला होईल, पण तुम्ही त्यांत दर्दी बनणार नाही. नृत्याचं वर्णन तुम्ही कराल पण तुम्ही स्वत: नाचूं शकत नाही. तुमची भूमिका म्हणजे सीमेवर बसणाऱ्या बघ्याची, प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या रंगेलरावाची नव्हे.'

श्री. माडखोलकरांच्या मनाची ठेवण त्यांना आधुनिकत्वाकडे ओढीत असली तरी त्यांचा पिंड एकंदरींत सनातनीच. विचारांनी जरी ते नवे वाटले तरी आचारांनी ते जुनेच आहेत. सामाजिक नवसंकेतांनी ते बुजून जाणार नाहीत; पण नवसंकेतांचे प्रणेते मात्र ते होणार नाहीत. ज्या संस्कृतींत ते लहानपणीं वाढले त्या संस्कृतीचा हा परिणाम असेल. त्यांची बौद्धिक उत्क्रांति जितक्या झपाट्यानं झाली आहे तितका त्यांचा इतर रीतीनं विकास झालेला नाही. त्यांना पत्ते खेळतां येत नाहीत, टेनिसची माहिती नाही, सायकल चालवितां येत नाही, आधुनिक थाटाचा पोषाख करतां येत नाही, गाणं-बजावण्याचा नाद नाही—एकूण काय कीं, त्यांना hobbies अशा कांही नाहीतच. आधुनिक माणसाला

अवगत असणाऱ्या कला त्यांच्या गावच्या नाहीत. दूरवर फिरायला जाणं आणि खूप बोलणं याच काय त्या त्यांच्या मोठ्या hobbies. स्वादिष्ट पदार्थावरहि त्यांची फार भक्ति आहे.

मैत्रीला ते फार उत्तम. पण त्यांच्या बाबतींत मित्रांपेक्षा शत्रूच जास्त. योग्य समज असण्याऐवजीं गैरसमज जास्त. म्हणूनच वेळीं अवेळीं त्यांच्यावर धूळफेक झाली आहे. टीकेच्या बॉम्ब-गोळ्यांनी त्यांना जर्जर करून सोडलं आहे. त्यांच्याविरुद्ध वावटळी उठल्या अशा एक दोन प्रसंगीं मी त्यांच्या वागणुकीकडे विशेष कटाक्षानं पाहिलं आहे. ते मला शांत दिसले. या वावटळी आल्या आणि गेल्या. त्यांना प्रत्येक वेळीं आपल्या लेखणीचं पाणी दाखवावं लागलं आणि ती एखाद्या तरवारीप्रमाणं त्या त्या वेळीं चमकली आहे. हें जें त्यांनी तेज दाखविलं आहे याचं कारण म्हणजे त्यांचा युद्धप्रिय स्वभाव. एखादं वाङ्मयीन द्वंद्वाचं आव्हान ते सहजगत्या स्वीकारतात; निकरानं हल्ल्यांवर प्रतिहल्ले चढवितात. प्रसंगीं वार देतात–घेतात. पण युद्ध संपलं कीं ते शत्रुत्व विसरून मित्रत्व पत्करायला आनंदानं तयार असतात. त्यांचे कित्येक पूर्वकालीन शत्रु घनिष्ट मित्र बनले आहेत आणि नाक मुरडणारे निंदक स्तुतिपाठक बनले आहेत.

मानवजात, मानवधर्म, मानवी राजकारण, मानवी उत्क्रांति हे त्यांचे आवडीचे विषय, असं मला तरी वाटतं. ते उथळ पुष्कळ बोलत असले तरी त्यांच्या गंभीर विचारांचा केव्हा केव्हा सुगावा लागल्याशिवाय राहात नाही. ते कोठलीहि कृति करीत असतां विचारतंद्रींत आहेतसे वाटतात. आणि कित्येक वेळां आपल्या विचारतंद्रींत एक सेकंदभर कां होईना, ते आसपासच्या जगाला विसरतात. ह्या विचार–चैतन्यामुळंच त्यांच्या लेखनांत एक प्रकारचं

गांभीर्य सापडतं, तेजस्वीपणा असतो, उदात्तता असते. ते मोठे नसले तरी लहान मात्र खास नाहीत; आणि जागतिक किंवा भारतीय संदेश जरी ते देऊं शकले नाहीत तरी महाराष्ट्रांत त्यांचं वाङ्मय अमर राहील यांत शंका नाही.

मला त्यांच्यांत दोन दोष दिसतात—अतिशयोक्ति आणि एकांगी विचार. पुष्कळदा त्यांच्या बोलण्यांत भडकपणा फार वाटतो. पण त्याचं कारण बहुधा त्यांची कल्पनाशक्ति असावी, असं वाटतं. जी गोष्ट साधारण माणसाला समजायला थोडा वेळ लागतो तीच यांना समजली कीं यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते. कल्पनाशक्तीनं तयार केलेल्या सर्व वातावरणावर, तें खरंच आहे असं समजून, त्यांचा विश्वास बसतो. आणि मग तें सत्य म्हणूनच ते सगळ्यांना कथन करतात. म्हणजे खरोखर पाहतां हा दोष त्यांचा नसून त्यांच्या कल्पनाशक्तीचा आहे. प्रभावी कल्पनाशक्तीमुळं ज्या गोष्टी मंद बुद्धीच्या माणसाला आकलन होण्यास कठीण त्या गोष्टींचं अथपासून इतिपर्यंत सगळं चित्र यांच्या डोळ्यांसमोर उभं राहातं. ते प्रामाणिकपणें या काल्पनिक चित्रावर विश्वास ठेवून त्याचं मग भडक वर्णन करतात.

मी त्यांच्यांत एकांगीपणा आहे असंहि म्हटलं आहे. तो येण्याचं कारण त्यांचं शिक्षण विवक्षित पद्धतीनं झालं नाही. पायरी पायरीनं ज्या माणसाच्या बुद्धीचा विकास झालेला असतो, पद्धतशीर ज्याचं शिक्षण झालेलं असतं, त्याच्यामध्ये एक प्रकारचा समतोलपणा आणि तुलनात्मक अभ्यास करण्याची सवय दिसून येते. श्री. माडखोलकरांचा बुद्धि-विकास स्वतंत्ररीत्या स्वयंप्रेरणेनं घडून आलेला आहे. विश्वविद्यालयीन शिक्षण त्यांच्या वाट्याला आलेलं नाही. त्यामुळं त्यांच्यांत मला तरी समतोलपणाचा व तुलनात्मक

पद्धतीनं अभ्यास करण्याच्या सवयीचा अभाव वाटतो. कांहीं विशिष्ट विषयांवर त्यांचे जे आग्रही विचार केव्हा केव्हा दिसून येतात त्याचंहि हेंच कारण असावं काय ?

मला स्वतःला श्री. माडखोलकर प्रिय आहेत ते त्यांच्या संवाद-कुशलतेमुळं. ते जर कादंबरीकार झाले नसते तर एक उत्तम संवाद–पटु झाले असते. त्यांच्या संवादांत तेजस्विता, गांभीर्य, विनोद, उपहास, उथळपणा, विविधता, माहिती–काय वाटेल तें सापडेल. म्हणूनच एका मित्रानं त्यांच्याबद्दल काढलेले उद्गार मला समर्पक वाटतात–'Everything about him is commonplace except his face and talk.' श्री. माडखोलकरांची आणि तुमची ओळख होऊं द्या, तुम्हीहि तसंच म्हणाल.

फेब्रुवारी १९४१, धनुर्धारी

★

## गफारबाबा–सरहद्द गांधी : १२

लाहोर स्टेशनवर मी अगदी जिकिरीला आलों. पेशावरची गाडी ५ नंबरच्या प्लाटफॉर्मवर येणार म्हणून तिथं माझं अवाढव्य सामान हमालानं नेऊन उतरविलं. पांच दहा मिनिटं प्लाटफॉर्मवर फिरून पंजाबी सौंदर्यलतिकांकडे पाहात मी माझ्या डोळ्यांचं पारणं फेडतों न फेडतों तोंच गाडी ४० मिनिटं उशिरा येणार म्हणून समजलं. लवकरची गाडी म्हणून संध्याकाळीं न जेवतां मी स्टेशनवर आलों होतों. उगाच उपासमार! ही बातमी आगाऊ समजली असती तर स्वादिष्ट पंजाबी अन्नावर चांगला हात मारून तरी निघालों असतों. चाळीसच मिनिटं एक्स्प्रेसची जास्त वाट पाहावी लागणार म्हणून मी मनाचं समाधान करतों–कारण त्या दिवशीं मुंबईच्या वादळामुळं सकाळीं येणारी फ्रांटियर मेल संध्याकाळीं ७ ला आली–तोंच हमालानं गजर केला कीं गाडी लवकर येत आहे, पण ती ८ नंबरच्या प्लाटफॉर्मला लागेल. नको जीव झाला अगदी. पुन्हा सगळं सामान घेऊन आम्ही एकदाचे ८ नंबरच्या प्लाटफॉर्मवर येऊन ठेपलों. ८ नंबरच्या प्लाटफॉर्मला पोहोचून ४-५ मिनिटं झालीं असतील नसतील तों पुन्हा गर्जना

ऐकली कीं गाडी ९ नंबरच्या प्लाटफॉर्मलाच लागणार. पुन्हा सगळं सामान घेऊन ९ नंबरचा प्लाटफॉर्म गाठावा लागला. माझा पाय प्लाटफॉर्मला लागायला आणि गाडी स्टेशनांत यायला एक गाठ. धावतच डबा गाठला व एक म्हातारं युरोपियन जोडपं उतरलं तिथं सामान लावलं. जिकिरीला आलेल्या जिवाला आता कुठे निवाऱ्याची जागा मिळाली. भूक लागली होती. ऑमलेट, ब्रेड, इत्यादि खाद्यसाहित्य बरोबर आणलंच होतं. त्याच्यावर ताव मारायला सुरवात केली.

एक दोन फके मारल्यावर जरा तळिराम गार झाला. व डब्यांत आणखी कोण प्रवासी आहेत म्हणून इकडे तिकडे पाहिलं तों दाराकडे बरीच गर्दी दिसली. असेल कसली तरी झुंबड म्हणून दुसरीकडे नजर फिरविणार, तोंच त्या गर्दींत उंचच उंच, लालबुंद, हसऱ्या चेहेऱ्याची व्यक्ति दिसली. तिच्याकडे नजर लागली मात्र, लगेच वेधून घेतलं तिनं माझं मन. त्या जनसमुदायांत प्रभावी व्यक्तित्व त्या एकाच व्यक्तींत दिसत होतं. एका सेकंदांत मीं ताडलं कीं ही व्यक्ति दुसरी तिसरी कोणी नसून अब्दुल गफार खान–सीमा प्रांताचे गांधी होत. अलभ्य लाभ होता तो मला असल्या असामान्य व्यक्तीच्या दर्शनाचा. मीं मनान त्यांना वंदन केलं.

अब्दुल गफारखान डब्यांत आले. बरोबर आलेल्या मंडळींनं त्यांचं अंथरूण पसरविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनी कोणाचीहि सेवा घेतली नाही. त्यांनी अलगत आपलं बेडींग वरच्या बर्थवर ठेवलं व स्वतःच्या हातानं तें आंथरलं. बरोबर आणलेली फळांची टोपली त्यांनी बिस्तऱ्याकडे ठेविली; डब्यांतील सगळ्या लोकांकडे पाहून मंदस्मित केलं; व पुन्हा प्लाटफॉर्मवरच्या गर्दीत जाऊन

ते मिसळले. एवढी गर्दी जमली होती, तरी पण गफारबाबांचं (ह्या नांवानंच सरहद्द प्रांतांत ते ओळखले जातात) सर्वांना दर्शन होत होतं. चांगली ६–७ फूट त्यांची उंची आहे. चेहरा लालबुंद आहे. डोळे बारीक पण तेजस्वी आहेत. नाक एखाद्या टेकडीच्या तुटलेल्या कड्यासारखं पण नीटस आणि रुबाबदार आहे. कोणत्याहि स्वतंत्र देशांत अब्दुल गफारखान बडे लष्करी अम्मलदार झाले असते अशी त्यांची शरीरयष्टी आहे. खरंच, परतंत्र हिंदुस्थानांत गांधीजींच्या एकनिष्ठ शिष्यांतील ते आघाडीचे सरसेनापति नाहीत काय ?

प्लाटफॉर्मवरून जाणाऱ्या येणाऱ्या युरोपियन, हिंदी माणसांना थोडा वेळ तरी त्यांच्याकडे पाहिल्यावाचून पुढे जाणं अशक्य होतं. गरीब खेडुत पठाण मंडळी तर देवदर्शन झाल्यासारखं समजून, मुग्ध होऊन, जागच्या जागीं खिळून उभी होती.

गाडी सुरू झाल्यावर अब्दुल गफारखान डब्यांत आले. अतिशय नम्रतेनं त्यांनी एका युरोपियन-वेषधारी हिंदी गृहस्थाला 'थोडीशी बसण्यापुरती जागा घेऊं का ?' म्हणून विचारलं. संमति मिळाल्यावर त्या गृहस्थाचं बेडिंग थोडंसं बाजूला केलं, व जी थोडीशी जागा मिळाली तीवर ते विराजमान झाले. आपले लांबच लांब हात दोन तीनदा एकमेकांवर घासले व डोळे मिटून जणूं कांही ध्यानस्थ होऊन ते बसले. त्यांची या वेळची खरोखरीच मनोज्ञ होती. त्या त्यांच्या विशिष्ट बैठकींत त्यांची सुसंस्कृतता, सात्त्विकता व ध्येयवादित्व पूर्णपणें प्रतीत होत होतं. जातीनं पठाण म्हणजे त्याच्यांत क्रौर्य, आडदांडपणा, बेईमानपणा, रानटी वृत्ति दिसायला पाहिजे होती. पण त्यांच्या ध्यानस्थ मूर्ती–कडे पाहून कोणालाहि वाटलं असतं कीं ते एक संत पुरुष आहेत.

'इंग्रजींत तुमची स्वाक्षरी द्यायला इतके कां तुम्ही आढेवेढे घेतां?' चालत्या गाडींत उडी मारून आमच्या डब्यांत आलेल्या एका जवान मुसलमानानं गफारबाबांना प्रश्न केला. त्याच्या हातांत उघडं फाउन्टन पेन होतं व हरदयाळांच्या Hints on Self Culture या पुस्तकाचं पहिलं पान स्वाक्षरीसाठीं त्यानं गफारबाबांपुढं केलं होतं.

गफारबाबांनी डोळे उघडले. त्या तरुणाकडे पाहून त्यांनी स्मित केलं व ते म्हणाले, 'इंग्रजींत स्वाक्षरी द्यायला माझी तयारी नाही. माझ्या भाषेंत पाहिजे असेल तर देतों. माझी ना नाही.' पुन्हा गफारबाबांनी डोळे मिटले.

'तुम्हांला इंग्रजी येत नाही का?' त्या मुसलमानानं दुसरा प्रश्न केला.

गफारबाबांनी डोळे उघडले व ते नुसते हसले. एक जाडजूड शीख गृहस्थ आमच्या शेजारीं बसले होते, ते उद्गारले, 'या प्रश्नाचं उत्तर मी देतों. आमच्या आलम् सरहद्दप्रांतांत इंग्रजी जाणणारे जे कांही विद्वान् लोक आहेत त्यांत गफारबाबांची गणना होते. तुम्ही त्यांना, इंग्रजी येतं काय, असा प्रश्न विचारण्याची जरूरीच नाही मुळीं.'

गफारबाबांनी डोळे साफ उघडले. डब्यांतील सर्व प्रवाशांकडे पाहून मंद स्मित केलं. व ते म्हणाले, 'मला काय येतं आणि काय नाही याचा पाढा मी कशाला वाचूं? मी या गृहस्थांना एवढंच म्हटलं कीं, मी स्वाक्षरी राजीखुशीनं देईन पण माझ्या भाषेंत. ते इंग्रजींत पाहिजे असा हट्ट धरताहेत. तरुण आहेत ते. हट्ट त्यांना शोभून दिसतो.'

गफारबाबांच्या शेवटच्या वाक्यामुळं डब्यांत हास्याची खसखस सुरू झाली. तो पंजाबी तरुण होता. थोडासा निर्ढावलेलाच होता तो. त्याला गफारबाबांनी काढलेल्या चिमट्याचं कांहीच वाटलं नाही.

त्यानं दुसऱ्याच विषयाला हात घातला--

'गांधीजी व त्यांचे जे वृद्ध अनुयायी आहेत त्यांची सद्दी आता संपली आहे, असं नाही तुम्हांला वाटत ?'

'स्वाक्षरी प्रकरण' आता बाजूला राहिलं. सरहद्द गांधींना आता त्या तरुणानं छेडायला सुरवात केली.

डब्यांतील इतर प्रवाशांना हा प्रश्न तितकासा रुचला नाही. गफारबाबांच्या मनावर या प्रश्नाचा काय परिणाम झाला असेल तो देव जाणे. पण त्यांनी उत्तर मात्र निर्विकारपणें दिलं.

ते म्हणाले, 'आपल्या म्हणण्याप्रमाणं गांधीजी आणि त्यांचे अनुयायी वल्लभभाई पटेल, पट्टाभिसितारामय्या, मौलाना अबुल कलाम आझाद, राजगोपालाचारी, सरोजिनीदेवी व स्वतः मी या सर्वांची सद्दी संपली। असेल. पण सद्दी संपली अशी हाकाटी झाली म्हणून आमचं काम आम्ही थोडंच सोडणार आहोंत ? आम्ही सेवाधर्म पत्करला आहे. आमचं कार्य अविरत चालू राहणार, मरूं त्या दिवशीं तें खतम् होणार. असं कधीच होत नाही, कीं एखाद्याचं युग संपलं असं तुमच्यासारख्यांनी म्हटलं कीं तो आपल्या कामाला पूर्णविराम देतो आणि 'हरि हरि' म्हणत स्वस्थ बसतो. पसंत पडो अगर न पडो, तो आपली सेवा आपल्या अंतःकरणाच्या प्रेरणेप्रमाणें करीतच असतो.'—

आणखी कांही तरी गफारबाबा बोलणार होते. पण मध्येच त्या तरुणानं दुसरा प्रश्न टाकला.

‘ शिस्तीच्या नांवाखाली कॉँग्रेसमधून बोस, रॉय, नरीमन यांसारख्या लोकांची उचलबांगडी होत आहे, हें तरी तुम्हांला पटतं का ? ’

मला वाटलं, आता गफारखां गप्प बसतील, नव्हे गोंधळतील. पण अशा प्रश्नांची त्यांना संवयच दिसली. कारण त्यांनी पटकन् उत्तर दिलं, ‘बोस, रॉय यांच्या उचलबांगडीची गोष्ट सध्या बाजूला ठेवा. पण मला आपण एक उत्तर द्या. एखाद्या संस्थेस अथवा व्यक्तीस शिस्तीची आवश्यकता आहे कीं नाही ? तुम्ही एखाद्या विद्यालयांत शिकत आहां तर तेथील नियम, कायदेकानू तुम्ही पाळाल कीं नाही ? कॉँग्रेससारख्या महान् संस्थेचे कांही नियम, कायदे आहेत. त्या संस्थेशी संलग्न असणाऱ्या सर्व मंडळींनी आणि विशेषतः पुढाऱ्यांनी ते नियम पाळायला नकोत का ? बोस, रॉय ही नेते मंडळी आहे. त्यांना कॉँग्रेसची शिस्त कबूल नाही. मग त्यांनी कॉँग्रेसबाहेर राहून काम करावं हें योग्य नाही का ? कोठल्याहि पुढारलेल्या राष्ट्रांत तेथील राष्ट्रीय संस्थांचे नियम असायचेच. जे सभासद ते नियम पाळीत नाहीत त्यांना या संस्था आपलं सभासदत्व कायम ठेवूं देतील का ? अफाट कार्याला कॉँग्रेसमध्ये अथवा कॉँग्रेसबाहेर देखील हवा तेवढा वाव आहे. मग या अद्वितीय पुढाऱ्यांना मतभेदामुळं बाहेर पडावं लागलं तर त्याबद्दल एवढी हुल्लड कशाला उडवायला पाहिजे ? कॉँग्रेसनं आपलं कार्य करावं; या पुढाऱ्यांनी आपल्या रस्त्यानं जावं. पुन्हा केव्हा तरी ही सर्व मंडळी एकत्र येतील अगर अशीच अखेरपर्यंत विभक्त राहतील. त्यांचा रस्ता बरोबर असेल तर लोक त्यांची कास धरतील. कॉँग्रेसचा मार्ग योग्य असेल तर जनता कॉँग्रेसला

पाठिंबा देईल. आजच्या ह्या हुल्लडीमुळं देशकार्याला मात्र बराच फाटा मिळत आहे.'

गफारबाबा संथपणें, विचारपूर्वक बोलत होते. त्यांच्या हातांची चुळबूळ सारखी चालू होती. अंगावरचं उपरणं ते वरखाली करीत होते.

त्या पंजाबी तरुणाच्या मनांत विचारांचं काहूर माजलेलं दिसत होतं. कारण गफारबाबांचं त्याच्या पूर्वीच्या प्रश्नाला उत्तर पुरं होण्यापूर्वीच त्यानं आणखी एक प्रश्न गफारबाबांना केला– 'गांधीमार्ग निःसत्व, नेभळट आणि शेळपट वाटत चालला आहे लोकांना. त्यांचं तें सत्य, अहिंसा–थोतांड आहे सर्व. गांधींनी हिंदी राजकारण बेचव करून टाकलं आहे. सशस्त्र क्रांतीनंच जगांत स्वराज्य स्थापन झालं आहे. पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या देशांत तोच खरा मार्ग आहे स्वराज्यप्राप्तीचा.'

पुन्हा आम्हां सर्वांना वाटलं, गफारबाबा घुटमळणार, घोटाळणार. पण ते नुसते हसले व म्हणाले, 'मला तुम्हां तरुणांची गम्मत वाटते. तुम्ही सीमेवर बसतां आणि नुसत्या पंडिती बाता करतां. टीका करायला कुणाचं काय जातं ? पण मी म्हणतों, तुम्ही कार्यप्रवृत्त कां होत नाही ? तुमचं मन सांगतं ना तुम्हाला क्रांतिमार्ग योग्य म्हणून ? करा मग कार्याला सुरवात. थांबतां कां ? हिंद-राष्ट्रापुढे स्वराज्य–संपादनाचे दोन मार्ग आहेत. एक गांधीमार्ग, दुसरा क्रांतिमार्ग. ज्याला जो पसंत आहे त्यानं त्या मार्गानं कार्याला लागावं. उगाच बक्‌बक् नको. आम्हांला आमचा अहिंसा-मार्ग प्रिय आहे. ह्या मार्गानं स्वराज्य मिळायला वेळ लागला तरी आम्हांला खात्री वाटते, तें अखेर याच मार्गानं मिळणार. तुमच्या क्रांतिमार्गानं कदाचित् स्वराज्य ताबडतोब

मिळणार असेल तर जरूर तें मिळवा. नको कोणाला तें स्वराज्य ? हा निष्ठेचा प्रश्न आहे. निष्ठेमुळं आम्ही कार्यप्रवण झालों आहोंत. गांधीजींनी, बरी वाईट कशी का असेना, पण भरीव देशसेवा केली आहे. तुम्ही तुमची सेवा क्रांतिमार्गानं करा. मी अकारण टीकेच्या मात्र विरुद्ध आहे. तुम्ही दोन वेळ मजेनं घरचं चमचमीत अन्न खातां, बरींचशीं नवनवीन राजकीय पुस्तकं चाळतां आणि त्यांवर सखोल विचार न करतां तुमचीं अपक्व मतं मोठमोठ्यानं जाहीर करतां. मी म्हणतों, हीं मतं तुम्ही कृतींत उतरवा, हिंदी क्रांतियुगाचे संस्थापक व्हा, स्वराज्य मिळवा; मी तुम्हांला वंदन करीन.'

आणि खरोखरीच गफारबाबांनी त्या तरुणाला हात जोडले. तो थोडासा खजील झाला. डब्यांतील प्रत्येकाला त्याच्या छेड-ण्याच्या वृत्तीचा राग आला होता. पण त्याच्या बेदरकार प्रश्न विचारण्याच्या कसबाबद्दल त्याचं कौतुक वाटत होतं आम्हां सर्वांना.

'हिंदु-मुसलमानांची तेढ वाढवायला कॉंग्रेस कारणीभूत झाली आहे, असं बऱ्याच जणांचं मत आहे. त्याबद्दल तुमचं म्हणणं काय आहे ? ' पुन्हा त्या तरुणानं चमत्कारिक प्रश्न विचारला. मला वाटलं, गफारबाबा आता तरी गप्प बसतील, असल्या जातीय प्रश्नाबाबत मौन स्वीकारतील. पण त्यांचे ओठ हलूं लागले, हाताची चुळबुळ पुन्हा सुरू झाली. माझी खात्री झाली ते या प्रश्नाला उत्तर देणार म्हणून.

नेहमीप्रमाणे ते हसले. व आपले डोळे किलकिले करत त्या तरुणाला उद्देशून ते म्हणाले, ' तुम्ही एखाद्या रांगत्या मुलासारखे आहांत. तें कसं खेळतांना अगर चालतांना आपल्या बापाचे कधी हात धरतं, कधी पाय धरतं, तर कधी डोक्यावर चढून बसतं, तसे तुम्ही एकदा एक प्रश्न विचाराल तर दुसऱ्यांदा भलताच

प्रश्न टाकाल. एकाचा मेळ नाही दुसऱ्याला. हिंदु-मुसलमानांच्या तेढीबद्दल मी एवढंच म्हणतों—ती एक विशिष्ट परिस्थितीमुळं उत्पन्न झालेली बाब आहे. तें एक हिंद-राष्ट्राचं सध्याचं दुर्दैव आहे. पण तें पार नाहीसं होईल. हिंदु-मुसलमानांची एकी होणार यावर माझा अढळ विश्वास आहे. स्वार्थी हिंदु वा मुसलमान पुढाऱ्यांनी लोकांना गांगरून टाकलं आहे. त्यामुळं त्यांना स्व-विचार आणि सु-विचार सुचेनासा झाला आहे. आज या जातीय पुढाऱ्यांचा वर्चस्वाचा दाब वाढलेला आहे. पण आपापसांत यादवी होऊन जेव्हा डोकीं फुटतील आणि रक्ताचे पाट वाहूं लागतील, तेव्हा जनतेचा आजचा मद उतरून पुन्हा ती ताळ्यावर येईल. व मग हिंदु-मुसलमानांच्या एकीची काय भलाई आहे तें त्यांना नीट कळेल. जनतेला चांगला जबर फटका बसल्याशिवाय तिचे डोळे उघडत नाहीत. पण एकदा ते उघडले कीं मग मतपरिवर्तन व्हायला वेळ लागत नाही. हा परिवर्तन-काळ जवळ येत चालला आहे. म्हणूनच मला वाटतं, हिंदी जनतेला सध्या अवदसा सुचत आहे. लाळ घोटीत ती स्वार्थसाधु पुढाऱ्यांच्या मागे लागली आहे. एकदा स्फोट होऊं द्या, म्हणजे मग हिंदु-मुसलमानांना कळून चुकेल कीं तेढींत तोटा आहे, एकींत फायदा आहे.'—

एवढं गफारबाबांचं बोलणं होत आहे, तोंच गाडी गुजराण-वाला स्टेशनला आली. त्या पंजाबी मुसलमान तरुणाला तिथं उतरायचं होतं. तो उठून उभा राहिला व म्हणाला, 'माफ करा. मला इथं उतरायचं आहे. मग मला स्वाक्षरी देतां ना?'

गफारबाबांनी त्याच्या हातांतील ग्रंथ व फाउन्टन पेन घेतलं. गुपचूप स्वाक्षरी केली. व तो ग्रंथ व फाउन्टन पेन त्या तरुणाला दिलं. आम्हां सर्वांना आता उत्कंठा लागली होती,

स्वाक्षरी इंग्रजींत आहे कीं पुस्तूंत ? आमची उत्कंठा त्या जवानाला समजली की काय न कळे, पण तो आम्हां सगळ्यांकडे बघून उद्गारला, ' गफारबाबा हट्टी आहेत. त्यांनी शेवटीं स्वाक्षरी आपल्या मातृभाषेंत केली आहे. '

आम्हां सर्वांना त्यानं गफारबाबांना हट्टी म्हटल्यामुळं हसूं कोसळलं. गफारबाबा सुद्धा मनःपूर्वक हसले.

गाडी चालू झाल्यावर गफारबाबा टुणकन चढून आपल्या बर्थवर पडले. किती लांबच लांब त्यांचा तो देह ! त्यांना एक बर्थ कमीच पडत होता. त्यांनी डोळे मिटून घेतले होते व त्यांचं कसलं तरी चिंतन चाललं होतं. गाडींत आता सर्वत्र स्तब्धता पसरली होती. बहुतेक मंडळी आपापल्या बिस्तऱ्यावर लवंडली होती. तरी पण पडल्या पडल्या सर्वांचं लक्ष वर बर्थवर झोपलेल्या गफारबाबांकडे होतं. ते कसे झोपतात, काय करतात, याबद्दल सर्वांना कुतूहल वाटत होतं.

प्रातःकाळीं चार वाजतां एका लहानग्या स्टेशनवर गाडी उभी राहिली. गफारबाबा तोंड धुण्यासाठी खाली उतरले. त्यांनी स्टेशनवर दोन चार फेऱ्या मारल्या. गार्ड, स्टेशनमास्तर, वगैरे मंडळींनी Good morning ची त्यांना सलामी दिली. त्या सर्वांना स्पष्ट शब्दांत ' Good morning to you !' म्हणून त्यांनी उलट सलामी दिली. गाडी सुरू होतांच ते आपल्या बर्थवर चढले. त्यांनी आपलं फ्रुटबास्केट काढलं. प्रथमतः त्यांतील चांगलीं फळं काढून जागे असणाऱ्या मंडळीस ' आपण घेतां का ' म्हणून त्यांनी विचारलं. कराचीहून आलेल्या एका हिंदु गृहस्थास व रावळपिंडीला चढलेल्या एका मुसलमान गृहस्थास त्यांनी कांही फळं घेण्यास फारच आग्रह केला व तीं घेण्यास त्यांना

भाग पाडलं, व मग आपला फलाहार त्यांनी केला. ते दिवस 'रोज्या'चे असल्यामुळं इतक्या लवकर गफारबाबा आपला आहार करीत असावेत अशी मीं अटकळ बांधली. खाणं संपल्यावर ते डब्यांतील जाड़ जूड शीख गृहस्थाकडे आले व 'आपल्या शेजारीं बसूं का?' म्हणून अत्यंत नम्रतेनं त्यांनी विचारलं. त्या शीख गृहस्थाला गफारबाबांबद्दल अतिशय आदर वाटत असावा असं त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं. त्यानं लगेच आपला बिछाना झटकून एक पांढरी चादर हातरून गफारबाबांना आसन तयार करून दिलं. थोडा वेळ डब्यांत स्तब्धता नांदत होती. सर्वांचं लक्ष गफारबाबांवर खिळलं होतं.

'सरहद्दीवर टोळ्यांशी संघटण करण्यासाठी नुकतेच भुलाभाई देसाई व आसफअल्ली पेशावरला येऊन गेले. ब्रिटिशांना आज दीडशे वर्षांत या टोळ्यांच्या बाबतींत यशस्वी धोरण स्वीकारतां आलेलं नाही आणि अजूनहि हा सरहद्दीकडचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न भिजतच पडलेला आहे. या कॉंग्रेस पुढाऱ्यांना या टोळ्यांशीं सल्ला-मसलत करण्यास इंग्रज सरकारनं परवानगी दिली नाही ही अत्यंत दिलगिरीची गोष्ट आहे. पण जी गोष्ट इंग्रजांना करतां आली नाही ती कॉंग्रेसला हातांत सत्ता नसतां शक्य आहे, असं तुम्हांला वाटतं?' त्या बलभीम शीख गृहस्थानं मोठ्या अदबीनं गफारबाबांना प्रश्न विचारला. त्या प्रश्नांत रात्रीच्या मुसलमान तरुणाचा ताठरपणा नव्हता. उलट आपणांस योग्य तें ज्ञान व्हावं याच दृष्टीनं तो विचारला गेला होता.

गफारबाबांनी विचार करायला जास्त वेळ घेतला नाही. सरहद्द प्रांतांतून आमची गाडी चालली होती. उजाडल्यामुळं बाहेर फारच सुंदर दृश्यं दिसत होतीं. त्यांकडे गफारबाबांनी निश्चल

दृष्टीनं पाहिलं. आकाशांत हळू हळू वर येणाऱ्या सूर्याप्रमाणें तांबूस अशा त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीचं हास्य विलसलं. व ते उद्गारले—'शक्याशक्यतेच्या गोष्टी आपण सध्या बाजूला ठेवूं. पण आपणाला असं वाटत नाही की, जी कॉंग्रेस आज हिंदुस्थानांत सर्व राजकीय पक्षांत श्रेष्ठ आहे तिनं या टोळ्यांच्या वायव्य सरहद्दीकडील या विशिष्ट प्रश्नाचा विचार करून आपलंहि धोरण ठरवून टाकलं पाहिजे ? ज्या बाबतींत इंग्रजांचं धोरण यशस्वी ठरलं नाही त्याबाबतींत कॉंग्रेसनं काढलेली तोड यशस्वी कशावरून ठरणार नाही ?'

'पण या बाबतींत कॉंग्रेसनं कांही विशिष्ट धोरण आखलेलं आहे का ?' तो शीख गृहस्थ मध्येच म्हणाला.

'छे, छे !' गफारबाबा म्हणाले, 'अहो! अजून कॉंग्रेसनं तसं कांहीच धोरण आखलेलं नाही. पण मला वाटतं, जिथं ब्रिटिशांची मति खुंटली तिथं कॉंग्रेसनं कांही प्रगति केली तर त्यांत वाईट काय आहे ? प्रयत्न करायला कोणती हरकत आहे ? कदाचित् कॉंग्रेसच्या धोरणानं या टोळ्यांतील लोकांत कांही बदल झाला तर आज सरहद्दीवर जो लाखो रुपयांचा खर्च होत आहे त्याचा विनियोग इतर ठिकाणीं फार चांगल्या रीतीनं करतां येईल.'

त्या शीख गृहस्थाचं या उत्तरानं समाधान झालेलं दिसलं. कारण, आणखी पुढे त्यानं कांही पृच्छा केली नाही. पुन्हा आम्हां सर्वांचं लक्ष बाहेरच्या प्रसन्न वातावरणाकडे वळलं. गफारबाबांनीं आपल्या बिस्तऱ्यांतून Ajanta Caves नांवाचं एक लहानसं चोपडं काढलं व बाहेरच्या निसर्गाचा आस्वाद घेत घेत ते त्या पुस्तकाचीं पानं चाळूं लागले.

•

'माफ करा. काल माझ्या मुसलमान भाईनं विचारलेल्या प्रश्नाचीच पुनरावृत्ति होत आहे. पण कालपासून तोच तो प्रश्न माझ्या मनांत मळमळत आहे, म्हणून विचारण्याचा हिय्या करीत आहें. इच्छा नसल्यास आपण उत्तर देऊं नका हवं तर.' नखशिखांत इंग्रजी पोशाख केलेल्या एका हिंदी गृहस्थानं अचानकपणें बोलायला सुरवात केली होती. 'शांति–मार्गानं स्वराज्य मिळेल अशी अगदी सोळा आणे तुम्हांला खात्री वाटते का? हिंदुस्थानांत जी क्रांति केव्हा ना केव्हा होणार आहे ती शंभर टक्के शांतिमार्गानं, क्रांतीशी सदा संलग्न असा रक्तपात झाल्याशिवाय, होईल का?'

गफारबाबांनी हातांतलं पुस्तक खाली ठेवलं. पाय बाकावर घेऊन त्यांनी मांडी घातली. हात एकमेकांवर घासायला सुरवात केली. नेहमीप्रमाणें हसले थोडेसे. पण गंभीर झाली त्यांची मुद्रा लगेच. क्षणभर एक सुरकुती येऊन गेली त्यांच्या भव्य कपाळावर. त्यांनी अगदी सावकाश बोलायला सुरवात केली—

'शांतिमार्गानं क्रांति घडवून आणणं हा मानवी प्रयत्न आहे. सुसंकृत मानवाचं तें अत्युच्च ध्येय असावं असं माझ्यासारख्या शांतिमार्गावर संपूर्ण विश्वास असलेल्याला सदैव वाटतं. पण या मानवी प्रयत्नाला ईश्वराचं सहाय्य मिळालं पाहिजे. माझ्या मनांत जेव्हा जेव्हा खूप विचारांची वावटळ उठते तेव्हा तेव्हा असा संशय मनांत डोकावतो कीं ईश्वरी संकेत निराळा तर नसेल ना? रक्तपातमयच क्रांति कशावरून होणार नाही? मानवी प्रयत्न फोल कशावरून ठरणार नाही? विश्वाच्या मागे जी अदृश्य अशी प्रभावी शक्ति आहे तिची तर इच्छा नसेल ना रक्तपातच घडवून आणण्याची? पण माझी अंत:प्रेरणा मात्र मला सारखी

ग्वाही देते कीं, शांतिमार्गानं जा. माझा धर्म, माझं मन, माझी संस्कृति मला या मार्गाकडे बोट दाखवीत आहे. शांतिमार्गावर माझी अढळ निष्ठा आहे. माणूस सुंदर शहरं वसंवतो, ~~सुंदर सुंदर~~ घरं बांधतो, सुंदर बगीचे तयार करतो; पण एक दिवस धरणीकंप होतो आणि हें सर्व बेचिराख होतं. आम्ही शांतिमार्गानं एक नवयुग निर्मिण्याचा प्रयत्न करीत आहोंत. ह्या नवयुगाची आमची कल्पना अतीव सुंदर आहे. पण ईश्वरी संकेत निराळाच असेल तर आमचं मनोहर स्वप्न कुठल्या कुठं विरून जाईल आणि हिंदुस्थानांत रक्ताचे पाट वाहतील. पण धरणीकंप होईल म्हणून माणूस शहर वसविण्याचं काम सोडत नाही. तसंच मानवानं शांति–मार्गाचीही कास सोडून चालणार नाही. मात्र रक्तपात-रहित राज्यक्रांति यशस्वी झाली तर मानवाच्या सांस्कृतिक इतिहासांत मौलिक भर पडेल.'—

गफारबाबा आणखी बोलत राहिले असते. पण पेशावर स्टेशन आलं व स्टेशनच्या गजबजाटांत गफारबाबांच्या वक्तृत्वाचा ओघ थांबला. ते जागेवरून उठले व त्यांनी बिस्तरा नीट बांधला डब्याचा एक कोपरा रिकामा झाला होता. तिथं त्यांनी आपली वळकटी लावली व ते थोडेसे रेलून बसले. त्यांच्या मुलुखांत आता ते आले होते. बरेच पठाण त्यांना अभिवादन करीत होते. त्यांचा ते अत्यंत नम्रतेनं स्वीकार करीत होते.

गाडी मध्येच उभी राहिली. सिग्नल दिली नव्हती. गफारबाबांनी आपली वळकटी अलगत उचलली, सर्वांना सस्मित अभिवादन केलं, आणि ते गाडींतून खाली उतरले. वळकटी खाकोटीस, उपरणं मानेभोवती, पायांत पठाणी चपला, पठाणी पद्धतीचा घोळदार वेष–सरहद्दीवरील लढाऊ जीवनाचं सारसर्वस्व त्यांच्यांत

दिसत होतं या वेळीं. फक्त त्यांच्यांतील नम्रता आणि शालीनता मात्र सरहद्दीच्या वातावरणाला अगदी विसंगत होती.

शेताच्या कडेकडेवरून ते चालले होते. सकाळच्या सोनेरी किरणांमुळं वातावरण अतिशय प्रसन्न होतं. शेतांत एक दोन गाई इकडे तिकडे फिरत होत्या. पलीकडच्या पुलावर कांही पठाण या वळकटी काखोटीला मारून शेतांतून वाट काढणाऱ्या अजब व्यक्तीकडे आदरपूर्वक कुतुहलानं पहात होते. त्यांनी आपल्या गफारबाबांना ओळखलं होतं. गाडी चालू झाली. गफारबाबा पांच सहा ढेंगा टाकून पुलापलिकडे अदृश्य झाले.

माझ्या शेजारीं बसलेले एक पठाण गृहस्थ उद्गारले, 'मंगल-बाबांचे (सरहद्दीवरील लोक गांधीजींना या नांवानं ओळखतात.) सच्चे शांतिदूत आहेत ते. पठाणांचं मंगल करतील ते, हें नक्की.'—

एवढ्यांत पेशावर क्यान्टोन्मेंट स्टेशनला गाडी पोहोचली.माझी उतरण्याची धडपड, हमालाशी हुज्जत व टांगेवाल्याशी कटकट सुरू झाली. नेहमी पेशावरला उतरतांना मी गांगरून जात असे. पण आज गफारबाबांच्या सान्निध्यानं मी पेशावरी वातावरणाशी इतका तन्मय झालों होतों कीं पठाणांशी बोलतांना बिचकणारा मी मोकळेपणानं बोलत होतों. त्यांच्याबद्दल एक स्निग्ध भाव माझ्या मनांत उत्पन्न झाला होता. त्या आडदांड, अवजड शरीरां तहि सात्त्विक सुंदर आत्मा असूं शकतो याची गफारबाबांना बघून मला खात्री पटली होती.

१ डिसेंबर १९४०, समीक्षक

६३७

REFBK-0006378